आव्हान आणि आवाहन

रेन्द्र पाटील

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. 3200



REFBK-0025214

संपादन:
सुरेश नगरसेकर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :–खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, असे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे दादा वर्गणी भरावी लागेल.

15 JUL 1987

(क्र. मा. पहा)
५०००–११–८६

REFBK-0025214

: सुरेश नगर्सेकर । आव्हान आणि आवाहन ।

ग : नीळकंठ खाडिलकर । आव्हान आणि

संदर्भ निबंध
3200
25214
उनायटेड




REFBK-0025214

: सुरेश नगर्सेकर । आव्हान आणि आवाहन ।

ा : नीळकंठ खाडिलकर । आव्हान आणि

आव्हान आणि आवाहन

नरेन्द्र पाटील

: संपादन :

सुरेश नगर्सेकर

सर्वाधिकार : श्री. नरेन्द्र पाटील

मुखपृष्ठ : श्री. प्रभाकर पाटील
आतील मांडणी : श्री. प्रसाद सावंत
निर्मिती साहाय्य : श्री. सुरेश पाटील, श्री. बबन कांबळे, कु. मेघा मेंगळ

प्रकाशन काळ : जून १९८६ : प्रथमावृत्ती

प्रकाशक : श्री. नितिन न. पाटील
विद्यानंद प्रकाशन
६-अ, कामगार नगर,
कुर्ला (पूर्व), मुंबई ४०० ०२४

मुद्रक : श्री. प्रभाकर दोंदे
स्टार प्रिंटर्स
गुर्जरवाडी, बाजारपेठ,
अलिबाग-रायगड

ब्लॉक्स : आदर्श ब्लॉक्स
५३, खेतवाडी १० वी गल्ली
मुंबई ४०० ००४

मुखपृष्ठ छपाई : सर्वोदय प्रिंटर्स,
मुंबई ४०० ००४

किंमत : रुपये तीस फक्त






प्रिय कै॰ आऊ (आई)
आणि
प्रिय कै॰ अण्णा
(कर्मवीर भाऊराव पाटील)
यांच्या स्मृतीस ...

तुमचा,
नरेंद्र

दोन शब्द



पुस्तकाची निर्मिती होत असताना माझ्या जीवनात आलेल्या अनेक मित्र, सहकाऱ्यांची मला प्रकर्षाने आठवण होत आहे. अनेक घटना डोळ्यांसमोर येतात. अनेक प्रसंग आठवतात आणि भूतकाळाच्या आठवणींत मी गढून जातो. ज्यांनी ज्यांनी माझ्यावर संस्कार केले त्यांना विनम्र अभिवादन करून नव्याने उभे राहून पुनश्च त्याच तडफेने कार्याला लागावे असे मला अलिकडे प्रकर्षाने जाणवू लागले आहे.

हे पुस्तक मी माझी आई व माझे काका कर्मवीर भाऊराव पाटील यांना अर्पण केले आहे. आम्ही सर्व कुटुंबीय माझ्या आईला 'आऊ' संबोधित होतो. आऊला विवाहापूर्वी केवळ दोन इयत्तांपर्यंतचे शिक्षण मिळाले होते. विवाहानंतर वडील पुणे, मुंबई, कारंजा (विदर्भ) येथे कांही वर्षे होते. त्यावेळी आऊही तेथे होती. वडील नोकरीबरोबरच शिक्षण घेत होते, म्हणून आऊलाही अधिक शिक्षित व्हावे असे वाटू लागले. पुण्यात महर्षी कर्वे यांच्या शिक्षण संस्थेत कै. आदीराज उपाध्ये यांनी चालविलेल्या विभागात ती कांही महिने होती. नंतर कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांच्या भगिनी जनाक्का यांनी चालविलेल्या उपक्रमात वास्तव्य केले. मुंबईच्या ताडदेव येथील श्राविकाश्रमातही कांही महिने ती होती. कारंजा येथे पूज्य गुरुदेव समंतभद्र यानी 'गुरूकूल' सुरु करताच वडिलांनी तेथील काम स्वीकारले. तेथेही आऊचे वास्तव्य होते. या काळात तिच्यावर जे संस्कार झाले ते तिच्या जीवनावर कायम प्रभाव टाकून राहीले. माझ्या जन्मापूर्वीच तिने भारी वस्त्रे व सुवर्णालंकार यांचा त्याग केला होता. थोडी बऱ्यापैकी मलमल काळ्या अगर चॉकोलेट रंगात रंगवून ती साडी म्हणून वापरत असे. या साड्याही फक्त दोनच जोड ती संग्रही ठेवायची.

दुसऱ्याच्या श्रमावर ऐषारामी जीवन जगणाऱ्या व्यक्तीबद्दल तिला मनस्वी



तिरस्कार होता. ती एक क्रियाशील शेतकरी होती. एक शेतकरी या नात्याने तिने भाई माधवरावजी बागल व दे. भ. रत्नाप्पाण्णा कुंभार यांच्या नेतृत्वाखालील 'प्रजा परिषदे' च्या अंकली पुलाजवळच्या सर्व सभा, कुपवाड येथील 'प्रजा परिषदे' चे भव्य अधिवेशन व कोल्हापूरला गेलेले शेतकरी मोर्चे यात भाग घेतला होता. मी त्यावेळी १२–१३ वर्षाचा होतो व आऊबरोबर या सर्व ठिकाणी जात होतो.

महात्मा ज्योतीराव फुले, कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे व घरातील पुढे कर्मवीर म्हणून मान्यता पावलेले माझे काका कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांचा प्रभाव तिच्यावर होता. ती मुद्दाम देवदर्शनास जात नसे, घरीही देवदेवतांची पूजा नसे, त्यामुळे ती नास्तिक आहे असे समजले जात असे. वयोमानाप्रमाणे पुढे तिचे शेतीचे काम बंद झाले. पण घराभोवती भाजीपाला व कांही फळझाडे लावून हातात झाडू घेऊन साफसफाईचे काम आयुष्याच्या शेवटच्या कांही महिन्यापूर्वीपर्यंत चालू होते.

आऊच्या निधनानंतर कांही जुनी मंडळी भेटायला आली. त्यांच्याकडून तिच्या करारीपणाचे, निर्भयतेचे, शेतकऱ्यांच्या चळवळीबद्दल तिला असलेल्या आस्थेचे त्या काळातील काही ठळक प्रसंग समजले. ते प्रसंग डोळ्यासमोर ठेवून तिच्या जीवनाकडे मागे वळून विचार केला तर आऊ म्हणजे एक अज्ञात देशभक्त, समाजसुधारक, श्रमप्रतिष्ठेची उपासक असे तिच्या जीवनाचे सार स्पष्टपणे जाणवते.

२२ सप्टेंबर १९८६ या दिवसापासून कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जन्मशताब्दीचे वर्ष सुरू होत आहे. त्या पार्श्वभूमीवर हे पुस्तक प्रकाशित होत आहे. हे या पुस्तकाचे भाग्य आहे. १९५८ साली प्रीमियरमध्ये दीर्घकाळ संप झाला. त्याकाळातच मी काही दिवस त्यांच्याजवळ राहिलो होतो. एरवी प्रासंगिक

गाठ-भेट व्हायची.

छत्रपती शिवाजी कॉलेजच्या स्वीमींगपूलचे काम विद्यार्थ्यांच्या श्रमदानाने चालू होते. तेथे मी त्यांच्याबरोबर जाऊन बसत असे. देशात संपाचे वारे वहात होते. मी संप करण्याच्या विरोधी होतो. पण कर्मवीर अण्णांना माझे विचार मान्य नव्हते. त्याच सुमारास केरळमध्ये काँग्रेसचा पराभव झाला होता. त्याबद्दल त्यांना आनंद झालेला दिसला. मी निष्ठावान काँग्रेस कार्यकर्ता होतो पण त्यावेळेपासून मी काँग्रेसविरोधी पक्षांच्या विचारांकडे वेगळ्या व चिकित्सक दृष्टिने पाहू लागलो. तटस्थपणे राहून सत्य शोधण्याची दृष्टी निर्माण झाली. सजगता आली. त्याचा उपयोग मला माझ्या कार्यात क्षणोक्षणी झाला.

महाराष्ट्रातील बहुजन समाजाला ज्ञानाचे दरवाजे बंद होते अशा काळात कर्मवीर अण्णांनी भगिरथ व अथक प्रयत्नांनी बहुजन समाजाला ज्ञानाचे दरवाजे उघडून दिले. रयत शिक्षण संस्थेचे जाळे साऱ्या महाराष्ट्रभर विणून शिक्षणाची नवी दृष्टी दिली. आज बहुजन समाजातही मुले शिकून सन्माननीय पदे व महत्त्वाच्या जबाबदाऱ्या, राष्ट्रीय कर्तव्य पार पाडताना जेव्हा दिसतात तेव्हा माझ्यासारख्याचा ऊर अभिमानाने भरून जातो. आणि प्रेरणांची स्फुल्लींगे मला सतत प्रज्वलीत ठेवतात.

कर्मवीर अण्णा व माझी आई यांना हे पुस्तक अर्पण करीत असताना मला सर्वश्री इंद्रवदन ओझा, डॉ. धनंजयराव कीर, ग. दे. आंबेकर, नानासाहेब कुंटे, रत्नाप्पाण्णा कुंभार यांचीही आठवण होत आहे. त्यांच्याकडून कळत नकळत मी बरेच कांही शिकलो. त्यांच्या ऋणातून मला मुक्त होताच येणार नाही.

माझे सहकारी कै. आदिनाथ दुग्गे, कै. एस्. जी. लोणी, सर्वश्री गलगली, फताटे, मूर्ती, जी. सी. कल्याणशेट्टी, आर. के. शाह, सुरेश शाह, बाबूराव

भापसे, विश्वनाथराव वाबळे व निष्ठावान कार्यकर्ते सर्वश्री आनंद मरगजे, बिठ्ठल मांढरे, यशवंत गरुड, जेधे यांनाही मला विसरता येणार नाही. 'नवाकाळ'चे झुंजार व विचारवंत संपादक श्री. नीळकंठ खाडिलकर यांची माझ्या पुस्तकाला मिळालेली प्रस्तावना म्हणजे माझ्या लेखनाला व जीवनाला मिळालेले 'मानपत्र' समजतो. तरुण पत्रकार सुरेश नगर्सेकर यांनी संपादनाची जबाबदारी आनंदाने स्विकारून या पुस्तकातला महत्त्वाचा वाटा उचलला. या पुस्तकाच्या निर्मितीची प्रेरणा त्यांचीच. या पुस्तकामुळे आम्ही इतके जवळ आलो आहोत की सामाजिक उत्तरदायित्व मानणाऱ्या त्यांच्यासारख्या पत्रकाराचे आभार मानणे त्याना आवडणार नाही. कारण सामाजिक कर्तव्य म्हणून त्यांनी पुस्तकाच्या संपादनाचे काम स्विकारले. या पुस्तकाचा उपयोग आजच्या व उद्याच्या समाज-परिवर्तनाच्या चळवळीला थोडा जरी झाला, तर ते माझे भाग्य समजेन.

आज देश मोठ्या संकटातून वाटचाल करीत आहे. स्वातंत्र्यालाही ३९ वर्षांचे तरुणपण लाभले आहे. अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, नोकरी, औषधोपचार हे प्रश्न अजुनही सुटलेले नाहीत. नवे प्रश्न तर दररोज उभेच रहात आहेत. फुटीरतावादी, देशद्रोही कारवायांना ऊत आला आहे. परकीय आक्रमणांचा धोकाही स्पष्ट दिसतो आहे. अशा वातावरणात माझ्यासारखे कार्यकर्ते अस्वस्थ आहेत. काळाची गरज व निश्चित कर्तव्य ओळखण्याची आता खरी गरज आहे. देशाला आता पुन्हा एकदा निष्ठावान, देशप्रेमी, त्यागी कार्यकर्त्यांची गरज आहे. माझ्यासारखा कार्यकर्ता या कामात आघाडीवर असेल. काळाची गरज ओळखून असे असंख्य कार्यकर्ते पुढे येतील अशी आशा व्यक्त करून मी तूर्त थांबतो.

नरेन्द्र पाटील

प्रस्तावना

श्री. नरेंद्र पाटील यांनी स्वातंत्र्यानंतरच्या काळात वेळोवेळी लिहिलेल्या लेखांचा हा संग्रह आहे. नरेंद्र पाटील जसे आहेत तसेच त्यांचे लेख आहेत. त्यांचा पारदर्शक प्रामाणिकपणा आणि सामाजिक हिताची तळमळ या लेखांत आरपार उतरली आहे. त्यांनी बिघडत चाललेले राजकरण आणि समाजकारण सुधारावे यासाठी रहावत नसल्याने लेखणी चालविली आहे.

भारताला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी राजकारण त्यागाचे होते. त्या परतंत्र काळात राजकारणातून फायदा मिळण्याचा प्रश्नच नव्हता. पण स्वातंत्र्यानंतर सत्ता हाती आली आणि राजकारण किफायतशीर झाले. राजकारण म्हणजे त्याग हे समीकरण नाहीसे होऊ लागले. राजकारणात स्वार्थी संधीसाधू उतरू लागल्याने आणि प्रमुख पुढाऱ्यांना घेरण्यात यशस्वी होत गेल्याने पूर्वीच्या प्रामाणिक कार्यकर्त्यांचा गुदमरा होऊ लागला. पुढाऱ्यांनाही अशा प्रामाणिक सडेतोड कार्यकर्त्यांची अडचणच वाटू लागली. खुषमस्करे आणि कोणतेही काम मुकाटपणे करणारे उपयोगी ठरू लागले आणि कोंडाळे करू लागले. पुढाऱ्याची चार कामे करावीत आणि आपले एक आडवळणाचे काम करून घ्यावे असा न बोलता हिशोब चालू झाला. यामुळे आता तर राजकारण हा धंदाच झाला आहे. राजकारण आणि त्याग, राजकारण आणि वैचारिक इमान, राजकारण आणि कटु कर्तव्य यांच्यात 'जुबानी तलाक' झाला आहे.

भारताच्या आर्थिक–सामाजिक– राजकीय जीवनात असा बदल होऊ लागला त्याच वेळी नरेंद्र पाटील यांनी सडेतोड लेख लिहून जागे करण्याचा प्रयत्न केला. लेखाद्वारे पुढाऱ्यांचे लक्ष वेधण्याचा प्रयास केला. पण त्यांचे प्रयत्न फलदायी झाले नाहीत. कारण पुढाऱ्यांनी झोपेचे सोंग घेतले होते तर सर्वसामान्य जनतेला जागे होण्यास वेळ लागतो. जेव्हा समाजात दोष शिरकाव करीत असतात तेव्हा सामान्य जनतेच्या लक्षात येत नाहीत. या दोषांमुळे कोणती

दु:स्थिती ओढवणार ते उमजत नाही. अर्थातच नरेंद्र पाटील यांच्या इषाऱ्यांकडे दुर्लक्ष झाले. त्यांच्या दूरदर्शी चिंतनाची उपेक्षा झाली.

त्या लेखांचा संग्रह आता योग्यवेळी प्रसिद्ध होत आहे. कारण नरेंद्र पाटील यांनी इषारा दिलेले दोष आता भयानक स्वरूप धारण करून सामान्य माणसाला भरडत आहेत. अर्थातच हे लेख आज वाचकांच्या मनाला सरळ भिडतील.

सट्टेबाजारी भांडवलशाही

नरेंद्र पाटील यांनी आपल्या लेखात बड्या मक्तेदार भांडवलदारांची सट्टेबाजारी वृत्ती वेशीवर टांगली आहे. युरोपातील भांडवलदारांनी उत्पादनाची नवनवीन तंत्रे विकसित केली. कमीत कमी खर्चात जास्तीत जास्त उत्पादन वाढविले, एकमेकाशी खुली जीवघेणी स्पर्धा केली आणि नवनवीन बाजारपेठा धुंडाळल्या भारतात भांडवलदारांनी अशी कोणतीही कामगिरी केली नाही. त्यांनी सरकार दरबारी भ्रष्टाचाराचा वापर करून मक्तेदारी मिळविली आणि उत्पादनवाढीची धडपडही न करता टंचाईच्या बाजारपेठेत वारेमाप भावाने माल विकून पैसा कमावला. कर चुकवून काळा पैसा पेरून सर्व कायदेकानू तोडले. कंपनी कायद्याचा गैरफायदा घेऊन धंदा बुडाला तरी फिकीर केली नाही. कंपनी बुडूनही भांडवलदार मालक गब्बर झाले. कारखान्यातील उत्पादनवाढ उत्पादनाचा दर्जा, कार्यक्षमता व शिस्त याकडे लक्ष देण्याऐवजी कर चुकविण्यावर सर्व लक्ष केन्द्रीत केले. जास्तीत जास्त उत्पादन करून कमी भावात विकण्याऐवजी टंचाईचा फायदा घेऊन कमीत कमी उत्पादन जास्तीत जास्त भावात विकण्याचाच हेतु बाळगला. हे लोण पसरत गेले आणि काहींजणांनी पक्का माल न बनविता कच्चा मालच विकून वारेमाप फायदा केला, कारण कच्चा माल दुर्मिळ होता ! स्टेनलेस स्टीलच्या पत्र्यासारख्या वस्तुंचे लायसेन्स काळा पैसा

देऊन मिळवावे आणि त्याहून अधिक काळा पैसा घेऊन विकावे असे प्रकारही सुरू झाले आणि सुरू आहेत. बड्या खाजगी भांडवलदारांच्या कारखान्यांतील हा सावळा गोंधळ आणि सट्टेबाजारी वृत्ती यांचे चित्रण आपल्या लेखात श्री. नरेंद्र पाटील यांनी केले आहे.

भ्रष्टाचाराने पोखरलेले शासन

'उद्योगधंद्यांच्या वाढीत अडथळे कोणते?' या १९६५ सालच्या लेखात ते म्हणतात– "सरकारी यंत्रणेत भ्रष्टाचाराची जी बिळे आहेत त्यांची तोंडे लिंपत पुढे गेले तर ठीक, नाहीतर या बिळांतील प्राणी सरळपणे काम करणाऱ्याच्या कामाचा दुवा कुरतडत राहून तो कमकुवत करीत राहतील. जर सचिवालयाच्या सहाव्या मजल्याचा दुवा बळकट असेल तर अशा माणसाची कदाचित या चक्रातून सुटका होईल. या वरच्या मजल्यालाही अडचणीत ठेवू शकणारे प्राणी मधल्या बिळांत आहेत. ही सारी बिळे, भगदाडे बंद करण्यास काही साधनसंपत्ती लागतेच आणि या साधनसंपत्तीचा खर्च काही व्यापार उद्योगांच्या हिशोबी नोंदता येत नाही. मग न नोंद होणाऱ्या या खर्चाला काही नोंद न होणारी आवकही पाहिजेच! ज्या माणसाजवळ न नोंद होणारी आवक करण्याची पूर्वापार कुवत, कौशल्य, बुद्धी आहे, त्यालाच हा न नोंद होणारा खर्च झेपणार! शिवाय योग्य पद्धतीनेच कौशल्याने ही बिळे बंद करता आली पाहिजेत, नाहीतर बिळे बंद होण्याऐवजी स्वतःचा हात अडकून पडणार. तेव्हा अशा या वातावरणात नव्या प्रागतिक विचाराने भारावलेले सचोटीचे लोक उद्योगधंद्याच्या क्षेत्रांत कसे उतरणार? अगर जुन्यापैकी कोणाचे परिवर्तन होऊन आपला नवा विचार कृतीत कसा आणणार? तेव्हा असे योग्य वातावरण निर्माण करणे हे सरकारचे कर्तव्य आहे. सहावा मजला जेवढ्या तडफेने, चोखपणे कारभार करेल त्यावरच हे अवलंबून आहे."

पुढाऱ्यांचे दलाल झाले

राजकीय नेते हे बड्या भांडवलदारांचे दलाल कसे झाले त्याची हकिगत श्री. नरेंद्र पाटील यांनी निर्भीडपणे सांगितली आहे. ते म्हणतात– "पुढाऱ्यांना देशहिताची तळमळ आणि गरिबांची कळकळ बेताचीच आहे. त्यांना आपली पक्ष संघटना बळकट करणेही महत्त्वाचे वाटत नाही. त्यांना आपल्या राजकीय उलाढालीच्या खर्चासाठी एकादा शेठजी अथवा संचालक हाताशी हवा असतो. शेठजीलाही असा राजकीय दलाल हवा असतो. पुढारी म्हणतो की, आपल्यामागे फिरायला चार कार्यकर्ते व कामगार हवेत. चार लोकांना नोकऱ्या लावल्या की चाळीस लोक मागे फिरतात. काही वर्षांत सत्ता व मत्ता त्यांना जमवायची असते. लोकप्रिय व्हायचे असते. त्यासाठी ओठात जनहित व पोटात भांडवलदारांचा मलिदा घेऊन ढोल बडवित मोर्चे, निदर्शने, धरणे यांची सर्कस चालविली जाते. त्यांच्यापासून सावध राहिले पाहिजे."

म्हणजे सरकारी यंत्रणेबरोबरच पुढाऱ्यांची अधोगती कशी झाली त्याचेही भेदक चित्रण नरेंद्र पाटील यांनी या लेखांत सादर केले.

सुपारी घेणाऱ्यांचे कामगार-नेतृत्व

श्री. नरेंद्र पाटील यांनी विविध लेखांत कामगारांच्या नेतृत्वाच्या अधोगतीबद्दल अत्यंत खेदपूर्वक टीका केली आहे. साथी एस. एम. जोशींवरही त्यांनी ठपका ठेवला आहे की, कामगारांना हक्क मिळवून देतानाच कर्तव्याची जाणीव करून दिली नाही. कामचुकारपणा आणि गैरशिस्त पाठीशी घालून कामगार नेत्यांनी सवंग लोकप्रियता मिळविली. यामुळे अधोगती सुरू होऊन इतकी झाली की आता तर गुंडांची पलटण पदरी बाळगून दहशतीने कामगार




नेतृत्व करण्यात येत आहे. श्री. नरेंद्र पाटील यांनी प्रीमियरमधील अनुभवाच्या आधारे या साऱ्या अधोगतीचा आपल्या लेखांतून वेळीच इषारा दिला होता. त्यांच्या दूरदर्शी चिंतनाची ही साक्ष आहे.

श्री. नरेंद्र पाटील यांचा प्रयत्न राजकारणातील धुरिणांना आवाहन करण्याचा आहे. अधोगतीकडे नेत्यांचे लक्ष वेधावे आणि ही अधोगती थांबविण्यास आवर्जून विनवावे, सरकारला वेळीच हस्तक्षेप करण्याचा आग्रह करावा असा मन वळविण्याचा मार्ग त्यांनी या लेखात स्वीकारला आहे. ज्यांचा हितसंबंध निर्माण झालेला नाही त्यांचेच मन वळविता येते पण भांडवलशाहीतून भ्रष्टाचार आणि भ्रष्टाचारातून धनिक– राजकीय नेते– नोकरशहा आदींची अभद्र युती निर्माण झाली होती. हितसंबंधांची सांखळी तयार झाली होती. अर्थात मन वळविण्याचा आणि आर्जवांचा मार्ग अपयशी ठरणार होता. प्रत्यक्षात तोच अनुभव श्री. नरेंद्र पाटील यांना आला. श्री. नरेंद्र पाटील लिहित होते तेव्हा आशा वाटावी असे असे काही नेते होतेही, पण आज त्यांच्या लेखांचा संग्रह प्रसिद्ध होताना आशादायक नेतृत्त्वही सहसा दिसत नाही. 'ग्रामीण तरूणांनो, सत्यशोधन करा' या लेखात ते म्हणतात की, "बहुतेक साऱ्या नेत्यांनी सत्ता स्वार्थासाठी अनेक अपप्रवृत्तीना जोपासले आहे. त्यांना धक्का लावण्याचे सामर्थ्य या नेत्यांजवळ नाही. अशा या परिस्थितीत देशातील नव्या पिढीनेच मार्ग काढण्यासाठी पुढे आले पाहिजे." या लेखात त्यांची नेत्यांबद्दलची आशा संपलेली दिसते.

मुळावर घाव घातला पाहिजे

पण नेत्यांची स्थिती अशी का झाली? या मुळाकडे श्री. नरेंद्र पाटील वळले नाहीत. मूठभर मक्तेदारांना अमाप काळा व गांढरा पैसा कमावता येईल



अशी अर्थव्यवस्था चालू दिल्याने भ्रष्टाचार सर्वत्र पसरून शिष्टाचार झाला आहे. एक टक्का वर्गाची हितसंबंधी टोळी तयार झाली. हे मूळ शोधले म्हणजे मूळावर प्रहार करण्यासाठी एक टक्का विरूद्ध ९९ टक्के असा संघर्ष अटळ असल्याचे दिसू लागते. या संघर्षाची उद्दिष्टे दुहेरी हवीत. १) अन्न-वस्त्र-निवारा-शिक्षण नोकरी-औषधोपचार या सहा मूलभूत गरजांची हमी बिली असता सामान्य माणसाला लाचारीची पाळी येणार नाही. आणि २) मोठमोठ्या नेत्यांना, नोकरशहांना विकत घेता येईल इतका पैसा कुणाजवळही असता कामा नये. वेगळ्या शब्दांत सांगायचे तर स्वतःच्या पायावर उभे रहाण्याइतका पैसा प्रत्येकाकडे हवाच, पण नेत्यांना-नोकरशहांना खरेदी करण्याइतका पैसा कुणाजवळही असता कामा नये.

श्री. नरेंद्र पाटील यांनी सोप्या शब्दांत समर्पकपणे आणि आत्यंतिक कळवळीने परिस्थिती मांडली आहे. त्यांनी समाजाला झुलविणाऱ्या व फसविणाऱ्या पुढाऱ्यांविरूद्ध चळवळ करण्याचे आवाहन एका लेखात केले आहे. पण अशा पुढाऱ्यांची निर्मिती ज्यातून होते ती मक्तेदारी भांडवलशाही तोडल्याशिवाय हितसंबंधांच्या युतीचा विषवृक्ष उन्मळून पडणार नाही. घाव मुळावरच घातला पाहिजे. त्यांनी प्रत्यक्ष अनुभवाने प्रभावी शैलीत विपरित वास्तव मांडले आहे. त्यांचे मी मनःपूर्वक अभिनंदन करतो. या लेखसंग्रहाचे स्वागत होणार यात शंका नाही. या लेखांमुळे वाचक विचार करण्यास प्रवृत्त होतील. म्हणून मूलग्राही विचारांची दिशा या प्रस्तावनेत सुचविली आहे.

– नीळकंठ खाडिलकर

संपादक नवाकाळ

श्री. एस्. एम्. जोशी यांना अनावृत पत्र

कोल्हापूर भागात १९३९ साली राष्ट्रसेवादलाच्या कामास सुरूवात झाली. तेव्हापासून १९४७ पर्यंत सेवादलाशी संबंध असलेल्या सामान्य माणसाच्या खालील विचारांची दखल घ्याल अशी अपेक्षा करीत आहे.

नव्यानेच स्वतंत्र झालेल्या भारतीय बालकांना व तरुणांना जबाबदार नागरिक बनविण्यास जरूर असलेल्या सेवादलासारख्या संघटनेच्या विघटनास देश स्वतंत्र झाला त्याच सालापासून सुरवात झाली. गावागावांतून मिळून हजारो तरुण दलाच्या झेंड्याखाली रोज जमून राष्ट्रीयत्वाचे धडे घेत असत. पण आपल्यासारखे सेवादल कार्यास वाहून घेतलेले श्रेष्ठ नेते व कार्यकर्ते पक्षीय राजकारणात शिरले व सेवादलाची वाताहत होऊन मार्गदर्शनाअभावी हजारो तरुणांची शक्ती वाया गेली. रोज सायंकाळी सेवादलाच्या मैदानावर जमणारे तरुण सार्वजनिक बागेत अगर देवळाभोवती घिरट्या घालू लागले व विड्या, सिगरेटी फुंकत फिरू लागले.

आपणासारख्या तरुणांच्या नेत्याने पक्षीय राजकारणात प्रवेश केला नसता व राष्ट्र सेवादल पक्षीय गाडग्याला जुंपले नसते, त्याची स्वतंत्र जोपासना केली असती तर महाराष्ट्रातूनच काय पण इतर प्रांतांतूनही लोकशिक्षण देणारे हजारो निष्ठावंत कार्यकर्ते तयार झाले असते. लाखो लोकांना त्यांनी देशाच्या उत्थापनास कार्यप्रवण केले असते. राजकीय पक्षांना सचोटीचे कार्यकर्ते लाभू शकले असते. पण आपण पक्षीय राजकारणासाठी फोफावलेल्या संघटनेची वाताहत केलीत. आता फक्त कॅलेंडर छापून, कला पथके चालवून इतर राजकीय पक्षाची हेटाळणी करणारे प्रचाराचे कार्य रखडत चालले आहे. केवळ सवंग लोकप्रियतेसाठी आपण पक्षीय राजकारणाकडे आकर्षिले गेलात की काय अशी अत्यंत दाट शंका येण्यासारख्या घटना प्रांत रचनेच्या चळवळीपासून घडत गेल्या आहेत. ज्या मौलिक तत्त्वांसाठी काँग्रेसपासून अलग झालात त्या सर्व तत्वांना आपणच हरताळ फासला हे स्पष्ट झाले.

कर्तव्य फळ कोणते ?

नोव्हेंबर १९५५ मध्ये फ्लोरा फाऊंटन येथे लाख दीड लाख जनता मोर्चाचे स्वरूपात जमली होती. मोर्चाचा आदेश समितीत असलेल्या नेत्यांनी दिला होता. सरकारच्या निर्णयाने जनता प्रक्षुब्ध झाली होती. सर्वसाधारण माणसे जरी विध्वंसक वृत्तीची नसली तरी काही समाजकंटक व लालभाईंच्यासारखे संधीसाधू राजकारणी परिस्थितीचा फायदा उठविण्यासाठी टपलेले असताही ध्यानी ठेऊन आपणासारख्या जबाबदार व्यक्तींनी मोर्चाला मार्गदर्शन करण्यासाठी जातीने हजर राहाणे जरूर होते. पण जे व्हायचे तेच झाले. काही लोकांनी आगळीक केली व दंगलीस सुरवात होऊन होऊन बसेस व स्टेट ट्रान्सपोर्टच्या ट्रक्सना आगी लागल्या. शेकडो खाजगी मोटारींची भयंकर नासधूस झाली. रस्त्याच्या कडेला सोडल्या गेलेल्या एका बसमध्ये आपला बचाव करण्यासाठी लपून बसलेल्या एका होमगार्डाला बाहेर खेचून त्याच्याच हातातील बंदुकीच्या दस्त्याने रक्तबंबाळ केलेले मी स्वत: पाहिले. अशा घटना झाल्या, गोळीबार झाला. हे सर्व होऊन गेल्यावर आपण श्री. साने, श्री. अमूल देसाई, श्री. नौशिर भरूचा आदी मंडळी जनतेसमोर आलात. आपण आलेले पाहून झालेल्या प्रकाराबद्दल नापसंती दर्शवून लोकांना चार मार्गदशनात्मक शब्द सांगाल या आशेने माझ्यासारखी माणसे कान टवकारून ऐकू लागली. पण आश्चर्य काय ? झाल्या प्रकाराबद्दल नापसंती तर राहोच पण म्हणालात, "बधूंनो, तुम्ही तुमचे कर्तव्य केले, आम्ही राजीनामा देण्याचे ठरविले आहे." चारी बाजूला जे उध्वस्त दृश्य दिसत होते त्याला आपण लोकांचे कर्तव्य फळ समजावे, यापेक्षा आपण जनतेला मार्गदर्शन करण्याऐवजी

प्रवाहपतित बनलांत असे म्हणणे चूक ठरणार नाही.

जर आपणासारख्या पुढाऱ्यांनी जातीने मोर्चाला मार्गदर्शन केले असते व कोणताही अनुचित प्रकार न घडता जर जमलेला जनसागर मोर्चा अडविला जाण्याच्या जागेअलिकडेच फर्लांगभर जर तास दोन तास शांत घोषणा करीत बसला असता, तर त्याचा केवढा मोठा परिणाम दिसला असता ? पण ती निदर्शने म्हणजे दंगल ठरली व संयुक्त महाराष्ट्राच्या मार्गातली पहिली व मोठी धोंड ठरली. जर त्यादिवशी जनतेला योग्य समज दिली असती तर त्यानंतर मुंबईत व महाराष्ट्रात झालेल्या दंगली कमी प्रमाणात झाल्या असत्या. पण तसे झाले असते तर पोलीस अधिकाऱ्याला जमावाकडून वाचविण्याचा प्रयत्न करून आपल्या सालस व सोज्वळपणाची चुणूक दाखविण्याची संधी आपणास प्राप्त झाली नसती. १०५ हुतात्म्यांच्या नावांवर मते मिळविता आली नसती हे मात्र खरे. लोकांच्या प्रक्षुब्ध भावनांची प्रतिक्रिया आहे, ही चळवळ जनतेची आहे असे म्हणून आपली जबाबदारी टाळायची हे एक नवे तंत्र आपण निर्माण केले. साधनशुचितेची घोषणा करून काँग्रेस बाहेर पडणाऱ्यांपैकी आपणांसारख्या श्रेष्ठ लोकांकडूनही या मार्गाचा अवलंब केला जावा ही दुर्दैवाची गोष्ट आहे. राष्ट्रसेवादलाची आपण वाताहत केली नसती तर जनतेच्या प्रक्षुब्ध भवनांना वळण लावणारी सेना प्रसंगी खडी झाली असती.

साधनसुचितेचे वस्त्रहरण

एक वर्षापूर्वी झालेल्या प्रीमियर ऑटोमोबाईल्स संपाच्या वेळीही आपल्या साधन शुचितेचे जवळून दर्शन झाले. प्रीमियर कामगारांचे नेतृत्व करणाऱ्यांना कारस्थानी माणसाने संपाच्या सुरवातीसच आपल्या अध्यक्षतेखाली घेतलेल्या सभेत त्याला म्हणजे संपाला विरोध करणाऱ्याचे पाय तुटतील अशा प्रकारची दमदाटीची, दहशतीची भाषा वापरून केलेले भाषण आपण शांतपणे ऐकून घेतले. आपल्याबद्दल आदर असलेल्या माझ्यासारख्या अनेकांना वाटले की आपण सदर दमदाटीच्या भाषेबद्दल नापसंती व्यक्त कराल. पण तसे काही घडले नाही व आपल्या स्वस्थ रहाण्याच्या मोबदल्यात सदर नेत्याने एस्. एम्. जोशी झिंदाबादच्या घोषणा देऊन आपणास खूष राखले. सदर सभेत २१ दिवसांची नोटीस देण्याचा व नंतर संप करण्याचा निर्णय घेण्यांत आला असताना त्या मुदतीपूर्वीच संपाचा आदेश नेत्याने दिला ते पाहून नेत्याच्या कारस्थानी व बेजबाबदार वृत्तीबद्दल व कारखान्यातील एकंदर परिस्थितीबद्दल माहिती सादर करणारे पत्र आपणास लिहिले गेले होते. आपणासारख्या वरिष्ठ नेत्यांनी या प्रश्नात बारकाईने लक्ष न घातल्यास कामगारांचे अतोनात नुकसान होणार असल्याची शक्यताही व्यक्त केली होती. पण आपण

त्याची यत्किंचीतही दखल घेतली नाही. इतकेच काय पण काही कामगारांनी आपणास स्वतंत्रपणे भेटण्याची इच्छा व्यक्त केली असता, भेटणारे लोक आर. जे. मेहतानिर्मित फॅक्टरी कमिटीचे सभासद असतील तरच भेट होऊ शकेल असे त्यांना सांगण्यात आल्याचे समजते. आपल्यासारख्या सालस व सोज्वळपणाबद्दल प्रसिद्ध असणाऱ्या व्यक्तीकडून हे उत्तर मिळाले, हे लोकांनाही खरे वाटणारे नाही.

आपल्या साधनशुचितेच्या झेंड्याखाली काम करणारे नेत्यांनी आपल्या भाषणाप्रमाणे संपाच्या सुरवातीच्या दिवसापासून गुंडगिरीचे उपाय योजून कामगारांना दडपून टाकले. कंपनीच्या आवारात राहणाऱ्या लोकांना, अधिकाऱ्यांना व कंपनीच्या कॅन्टीनला होणारा दूधपुरवठा करणाऱ्या लोकांना सा. शु. वाल्या नेत्याच्या अनुयायांनी अडविले. सदर दूधवाल्यानी आपल्या धंद्याच्या आड न येण्याबद्दल सांगितले. पण मस्तवाल पुढाऱ्याच्या हस्तकांनी त्याचे ऐकले नाही व भांडण मारामारी होऊन त्यात एक कामगार घायाळ झाला. (नंतर तो वारला.) त्यावेळीही आपण तेथे घाईघाईने येऊन पोलीसांना दमदाटी केल्याचे ऐकण्यास मिळाले. पण या प्रकरणाची निर्मिती होण्यास व एका कामगाराच्या मृत्यूस जबाबदार असणाऱ्या आपल्या अनुयायांना एका शब्दानेही दुखविले नाही. सदर संधीचा फायदा घेऊन आपल्या नादानपणामुळे घडलेल्या प्रकाराचे खापर काँग्रेस, इंटक व मालक यांच्यावर फोडण्याचा निंद्य व नीच प्रयत्न आपल्या साधशुचितावाल्यांनी केला.

प्रिमीयर संपाचे समकालीन म्युनिसिपल कामगारांच्या संपात कोठेही दहशत व गुंडगिरीचे प्रकार घडल्याचे ऐकण्यात आले नव्हते, तरीही आपण दडपून सांगितले की बहुसंख्य कामगार कामावर येऊ इच्छितात पण गुंडागिरीमुळे ते दबलेले आहेत. पण प्रीमीअरच्या परीसरात संपाच्या सुरवातीपासून अनेक गुंडगिरीचे प्रकार आपले अनुयायांनी केले तिकडे मात्र आपण सफाईने दुर्लक्ष करीत होता. मध्यंतरी खासदार अशोक मेहता यांनी काही तडजोड शोधून काढली पण ती तडजोड कारस्थानी नेत्याची मानहानी करणारी होती म्हणून ती तडजोड कामगारांना पसत नसल्याचा देखावा त्यांनी निर्माण केला. या वेळेपर्यंत प्रिमीयर कामगारांचे व्यासपीठ हे संयुक्त महाराष्ट्र समितीचे व्यासपीठ बनले होते. आपल्या पुढारीपणाला आणखी उंचपणा आणण्यासाठी हे व्यासपीठ आणखी काही काल उपयोगी पडावे म्हणून आपण या कारस्थानी पुढाऱ्याला साथ दिली व प्रिमीअर कामगारांना पुरेपुर लोळवून लाक्षाणिक संप घडवून आणला. आपल्या पुढारीपणाची पताका मिरवली त्यावेळी संप मागे घेण्याची ना. यशवंतरावांची सूचना

आपण विचारात घेतली नाही.

चामडी बचाव एस. एम.

प्रिमीयर कामगारांना तुम्ही नेतेलोकांनी आपल्या राजकीय लढ्यातील हत्यार बनविले आहे हे अनेक कामगार ओळखून होते. पण दहशतीमुळे ते स्वस्थ होते. पण चार महिने होत आले तरी तुम्हा नेते मंडळीची तृप्ती होत नाही हे पाहून व सामान्य कामगारही पूर्णपणे हवालदील झाल्यामुळे काही लोकांनी कारखाना सुरू करण्यासाठी हालचाली केल्या. त्यांना जबरदस्त धोक्याला तोंड देऊन हे करावे लागले. या मंडळीनी कारखाना दिनांक २९ जुलै रोजी चालू होणार असे जाहीर करताच धाडसाने पुढाकार घेणाऱ्या या मंडळीच्या मागे हवालदील कामगार कारखान्यात घुसतील व मग आपल्या अब्रूचे खोबरे होईल या भीतीने घाईघाईने दिनाक ३० ला संप मागे घेतला जाणार असे आपण दिनांक २९ च्या वर्तमानपत्रात जाहीर केले. पण चार महिने व्याख्यानमाला चालू ठेवून झुलवत ठेवलेल्या कामगारांना कामावर जाण्याचा आदेश देतानाही आपण त्यांना फसविले. ना. यशवंतराव चव्हाणांच्याशी चर्चा झाल्याचे जाहीर केले, त्या अगोदर दोन दिवस ना. चव्हाण मुंबई बाहेर होते. तेव्हा आपली व त्यांची भेट केव्हा झाली, कोठे झाली व त्यांनी काय आश्वासन दिले याचा उल्लेख झाला नाही. शिवाय जर ना. चव्हाणांनी आश्वासन दिले होते तर मग सुमारे १११ लोकांना बाहेर बसण्याचा प्रसंग का आला ? व आता एक वर्ष झाले तरी सुमारे २०-२५ कामगार बाहेर का आहेत ? कामगारांच्या मागण्यांचे काय झाले ? जर ना. चव्हाणांनी आश्वासन दिले असते तर आपण व कारस्थानी नेता एक वर्षभर शांत बसलाच नसता. ना. चव्हाणांचे वाभाडे केव्हाच काढले गेले असते. पण चार महिने लोळवून जर सपशेल पराभव पत्करून कामावर जाण्याचा आदेश दिला गेला असता तर निराळीच प्रतिक्रिया झाली असती. आपली चामडी वाचविण्यासाठीच ना. चव्हाणांचे गळी पडण्याचा उद्योग केला गेला आहे. असे अनेक कामगारांचे मत आहे.

दांभिकतेचे दुसरे नाव एस. एम.

प्रिमीअरच्या संपाच्या शेवटच्या काळात आपण नवोदित लेबर ऑफिसर मंडळीपुढे भाषण करताना कामगार कार्यकर्ते कामगारांना त्यांच्या फक्त हक्काचीच जाणीव करून देतात. कर्तव्याची देत नाहीत असे आपण बोलल्याचे वाचण्यात आले होते. पण माझ्या अल्प माहितीप्रमाणे आपण स्वतःही कामगारांसमोर अगर कार्यकर्त्यांसमोर बोलताना त्यांचे कर्तव्याबद्दल बोलल्याचे ऐकलेही नाही व वाचलेही

नाही. या उलट स्वतःच्या मस्तवालपणामुळे कामगारांना संकटात आणणाऱ्या व खा. अशोक मेहतांसारख्या जबाबदार व्यक्तीने घडवून आणलेली तडजोड उधळून लावणाऱ्या माणसाला आपण पाठीशी घातलेत याचा विचार करता लेबर ऑफिसर्स-समोरील आपले भाषण हा दांभिकपणाचा उत्तम नमुनाच ठरेल. पण कामगारांना व कार्यकर्त्यांना आपण कर्तव्याबद्दल बोललात तर तुमचे पुढारीपण टिकणार नाही व म्हणून त्यांना त्यांच्या कर्तव्याबद्दल तुम्हाला व इतर पुढाऱ्यांना बोलण्याची हिंमत होत नाही ही सत्य परिस्थिती आपण सर्वकाळ झाकू शकणार नाही.

स्वातंत्र्यपूर्व कालातील चळवळीत देश स्वतंत्र झाल्यावर उपसाव्या लागणाऱ्या कष्टांची जाणीव जनतेला देण्याबाबत नेत्याच्याकडून दुर्लक्ष झाले त्यामुळे देश स्वतंत्र झाल्यावर सर्वत्र आबादीआबाद होणार अशा अपेक्षा जनतेमध्ये निर्माण झाल्या त्यांचा भंग झाल्यामुळे आज सरकारला जनतेच्या असमाधानाला तोंड द्यावे लागत आहे. याची दखल घेऊन जर जनतेला जबाबदारीची जाणीव दिली नाही व केवळ काँग्रेस सरकार खाली आले की सर्व प्रश्न सुटतील असा समज निर्माण केला तर कदाचित इतर पक्षाची सरकारे येईपर्यंत परिस्थिती या पेक्षा बिकट होईल व त्या सरकारला परिस्थितीला तोंड देणे मुष्कील होईल. या गोष्टीची जाणीव आपणासारख्या नेत्याना नसेल असे म्हणण्याचा मूर्खपणा कोणी करणार नाही. पण येत्या १०–१५ वर्षात तरी काँग्रेसच्या हातून सत्ता काढून घेण्याची ताकद आपल्या अगर इतर पक्षात नाही व त्यानंतरच्या काळात जरी ती आली तरी त्या परिस्थितीला तोंड देण्याची जबाबदारी केवळ आपल्यावरच पडणार नाही, तेव्हा तोपर्यंत तरी जेणेकरून लोकप्रियता अबाधित राहील तो मार्ग पत्करण्याचा साधकबाधक विचार करूनच आपण राजकीय हालचाली करीत आहात असे म्हटल्यास चूक ठरणार नाही.

काँग्रेसचा पठाण व एस. एम.

विशेषतः कामगार व तरुण वर्गातील राष्ट्राच्या प्रगतीस खीळ घालणाऱ्या बेजबाबदार प्रवृत्तीकडे आपणासारख्या, जनतेची श्रद्धा असणाऱ्या नेत्यांनी दुर्लक्ष करणे धोक्याचे आहे. जनतेची श्रद्धास्थाने असलेल्या प्रभावी नेत्यावरील विश्वास उध्वस्त केल्याशिवाय जनतेचे प्रश्न सुटण्याऐवजी अधिक बिकट परिस्थिती निर्माण केल्याशिवाय, लोकशाहीवर विश्वास ठेवणाऱ्या इतर पक्षांची जनतेवरील पकड कमी होणार नाही याची खूणगाठ लालभाईनी व त्यांच्या हस्तकांनी बांधली आहे. यासाठीच नवयुगमधून पं. नेहरूंच्यावर लेखमाला चालू झाली आहे व महाराष्ट्रातील कोणीही जबाबदार नेता तुमच्यासारख्याशी हमरीतुमरीची भाषा करू

धजणार नाही इतक्या उद्धटपणाने महाराष्ट्रातील एक बदफैली व दारुडा पत्रकार, लो. टिळक, छ. शिवाजी, म. फुले व डॉ. आंबेडकर यांच्या फोटोचा बाजारी उपयोग करणारा लफंगा बागवान तुमच्याशी मी तू ची भाषा करू लागला आहे. १९४६ च्या निवडणुकीतील काँग्रेसचा हा पठाण त्या निवडणुकीत मिळालेल्या काँग्रेस विजयोत्सव साजरा करण्यासाठी पुण्याच्या मंडईत काँग्रेसच्या व्यासपीठावर तोऱ्याने विराजमान होऊ पहात होता, पण पुणेकर काँग्रेसवाल्या मंडळींनी हा जोडा पायातच ठेवला. जरी या पठाणाने प्रचार केला असला तरी त्याला डोकीवर घेणे अयोग्य ठरणार हे ते जाणून होते. वरील सभेच्या वेळच्या अपमानामुळे व काँग्रेस सत्तेवर येताच आपल्याला मलीदा मिळेल ही अपेक्षाही व्यर्थ ठरल्यामुळे चिडलेला हा काँग्रेसचा पठाण काँग्रेसवर हल्ले चढवू लागला. संयुक्त महाराष्ट्र चळवळी-पासून तर ज्या मंडळीची त्याने प्रतिगामी म्हणून पूर्वी निर्भत्सना केली होती त्यांना त्याने पुरोगामी ठरविले. केवळ गेल्या निवडणुकीत त्याने समितीचा तुफान प्रचार केला एवढ्यामुळे आपण त्याला लो. टिळक, आगरकरांसारख्या व्यक्तींच्या रांगेत बसविण्यास तयार झाला व त्यामुळेच तो शेफारून गेला आहे.

स्वपक्षीयांचा विरोध असूनही आपण लाल भाई व त्यांच्या हस्तकांबरोबर लगट केल्यामुळे मिल मजदूर सभेसारख्या आपल्याच संघटनेची कुचंबणा होत आहे, दोन ऑगस्टच्या लालभाईच्या केरळ प्रश्नाच्या सभेसमोर सबंध महाराष्ट्राचे नेतृत्व करणाऱ्या सर्वपक्षीय समितीची ता. ३ ची निदर्शने अगदीच पडेल झाली, त्याचप्रमाणे प्रिमीयरमध्ये नेतृत्व करणाऱ्या बेजाबदार माणसास आपण पाठिंबा दिल्यामुळे तेथेही तुमची सभा लालभाईच्या पाठिंब्यावरच तंग धरण्याचा प्रयत्न करीत आहे.

साधनशुचितेच्या आपल्या ध्येयवादाला मुरड घालण्यामुळे भारताच्या लोकशाही समाजवादाच्या मार्गात धोका निर्माण होत आहे असे म्हटल्यास ते अयोग्य ठरणार नाही.

माझ्यासारख्या सामान्य माणसाच्या विचाराची आपणासारखे श्रेष्ठ नेते दखल घेणार नाहीत हे जाणत असूनही आपल्याबद्दल आदर असूनही मनातील विचार व्यक्त केल्याशिवाय रहावत नाही म्हणून हा खटाटोप केला आहे.

(शिवनेर : १५ सप्टेंबर १९५९)

जबाबदार कामगार : समर्थ चळवळ



या देशातील बहुसंख्य उद्योग खासगी मालकीत आहेत, त्यातून निर्माण होणाऱ्या संपत्तीत ज्याप्रमाणे कामगारांना योग्य वाटा मिळाला पाहिजे त्याप्रमाणेच या कारखान्यातून तयार होणाऱ्या मालाचा वापर करणाऱ्या जनतेलाही त्याचा वाटा मिळायला पाहिजे. म्हणजेच या कारखान्यात तयार झालेला माल योग्य दरांत आणि टिकाऊ असा जनतेला मिळाला पाहिजे. पण आज हे घडत नाही.

स्वातंत्र्यानंतर सरकारी म्हणजेच राष्ट्रीय मालकीच्या उद्योगांची वाढ होत चालली आहे. पण काही अपवाद वगळता हे धंदे फारसे यशस्वीपणे चालत नाहीत. या उद्योगधंद्यांपैकी कांही धंद्यांच्या कारभाराबद्दल सरकारी ऑडीट खात्याच्या रिपोर्टातून अगदी त्रोटक अशी माहिती केव्हा तरी वृत्तपत्रातून झळकते. ती चिंता निर्माण करणारी आहे. खासगी धंद्यात मालकाला अगर संचालकाला कारखान्याचा

कारभार काटकसरीचा व किफायतशीर व्हावा याची ओढ असते. त्यामुळे तांत्रिक मनुष्यबळ, यंत्रे, हत्यारे, कच्चामाल या सारख्या साधनसंपत्तीचा अपव्यय होवू नये अशी दक्षता त्यांचेकडून घेतली जाते. पण सरकारी उद्योग धंद्यात मात्र पदोपदी, 'जाऊ द्या आपल्या बापाचे काय जाते.' अशी वृत्ती दिसून येईल. या सरकारी कारखान्याच्या प्रशासकीय अधिकाऱ्यासह अनेक अधिकारी, संबंधित कंत्राटदार मंडळी असे लोक जनतेच्या मालकीच्या कारखान्यांची लूट करतात. खासगी धंद्यातही काही असे उद्योग आहेत.

भत्तेखाऊ पुढाऱ्यांची सोय

या सरकारी उद्योगधंद्याच्या संचालक मंडळावर उद्योगधंद्याची माहिती असलेले, माहिती करून घेऊ इच्छिणारे चिकित्सक वृत्तीच्या लोकांची निवड होणे जरूर आहे. पण अनेक ठिकाणी निवडणुकीत पराभूत झालेल्या अगर मंत्रीमंडळात ज्यांचा नंबर लागू शकला नाही अशा पुढाऱ्यांची राष्ट्रीय उद्योगांच्या संचालक मंडळावर वर्णी लावल्याचे दिसून येते. ज्याप्रमाणे विधानसभेत अगर लोकसभेत केवळ भत्त्यासाठी हजेरी लावण्याचे काम अनेक आमदार खासदार करतात आणि गणसंख्येसाठी घंटा वाजवत बसण्याची पाळी आणतात, त्याप्रमाणे केवळ भत्त्यासाठी संचालक मंडळावर हजेरी लावण्याचे कार्य ही पुढारी मंडळी करीत असण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत या सरकारी उद्योगधंद्याचा लाभ कामगारांना व जनतेला कसा मिळणार ?

सहकारी व्यापार आणि उद्योग

गेल्या पाचसात वर्षात महाराष्ट्रात सहकारी साखर कारखाने, सूत कारखाने, तेल कारखाने अशा सहकारी मालकीच्या उद्योगांना सुरुवात झाली आहे. पण या पैकीही फारच थोडे मूळ उद्दिष्टावर लक्ष ठेवून चालविले जात आहेत. या ठिकाणीही त्या उद्योगांत चिकित्सापूर्वक लक्ष घालून सचोटीने ते उद्योग चालविणाऱ्या लोकांपेक्षा राजकारणी पुढाऱ्यांनी आपआपली बस्ताने ठीक करण्यासाठी आपल्या गोतावळ्यांचे हातातच हे उद्योग ठेवण्याचे प्रयत्न चालविलेले दिसून येते. या प्रकारात मंत्री आणि बडे नेतेही भाग घेताना दिसून येतात. एकीकडे सचोटीने चालविल्या गेलेल्या उद्योगांना सहकार्य व ते चालविणाऱ्याना उत्तेजन आणि पाठबळ सत्ताधाऱ्याकडून मिळत नसतांना ज्यांच्या कारभाराबद्दल संशयाचे वातावरण आहे अशांना सरकारी मदत मिळते. या सर्व परिस्थितीमुळे सहकारी उद्योगांचाही लाभ सहकारी उद्योगांचे सभासद, कामगार व जनता यांना योग्य प्रमाणात मिळत नाही.

वरील सर्व दोष नष्ट होऊन हा अपव्यय थांबून या सर्व प्रकारच्या उद्योगातून अधिकाधिक संपत्ती निर्माण होऊन त्याचा लाभ जनतेला व कामगाराना योग्य प्रमाणात मिळण्यासाठी कामगारांनी खऱ्या अर्थाने जागृत होऊन या सर्व गैरप्रकारांची संघटनांतर्गत चर्चा करून संघटनांतर्फे प्रभावी वृत्तपत्रे चालवून त्यातून जाहीरपणे या सर्व अपव्यय व गैरकारभारावर निर्भिड हल्ले चढवून तो जनतेसमोर व सरकारसमोर मांडला पाहिजे. हे प्रकार थांबविण्यास सरकारला भाग पाडले पाहिजे. त्याबरोबरच स्वतःवर येणारी जबाबदारी उचलली पाहिजे. कारण या सर्व प्रकारास फक्त मालक, सरकार व पुढारीच जबाबदार आहेत असे मानता येणार नाही.

राष्ट्रीय उद्योगधंदे वाढतील, लोकशाही स्थिरावेल

जर कामगार वर्ग इतक्या जबाबदारीने वागू लागला तर त्याचा परिणाम इतर समाजघटकांवर होईल. सरकारला उद्योगपतींच्या सहकार्यावर अवलंबून रहावे न लागता राष्ट्रीयकरणाचे काम गतिमान करता येईल. देशातील बेकारी, दारीद्र्य कमी होईल, लोकशाही स्थिरावेल.

पुढाऱ्याने अन्याय झाला असा ओरडा करताच अगर बोनस प्रश्न तोंडावर येताच संप, मोर्चाची घोषणा व संप निदर्शने करणे म्हणजे जागृती नव्हे, हे लक्षात घेवून, आपआपल्या कामगार संघटनेच्या कामात जास्तीत जास्त लक्ष घालून कार्यकारी मंडळाच्या योग्य निवडणूका करून त्या ठिकाणी अभ्यासू, चिकित्सक व जबाबदार कार्यकर्त्यांची निवड करून त्यात सर्व 'प्रश्नांची कसून चर्चा करून आपले निर्णय घेणे, संघटनेची वर्गणी वेळच्या वेळी भरून त्याचा योग्य विनियोग होत असल्यास अधिक वर्गणी देऊन संघटनेचे काम व्यापक व भक्कम पायावर उभारणेचा प्रयत्न करणे व स्वतःच्या कामगार संघटना स्वतः चालविणे हे पहिले काम होय.


हुल्लडबाजांना बाजूला कर. !

वरील प्रकारे संघटनेचे काम चालविण्यास जरूर असणाऱ्या कामगारांची इंजिनीयरिंग धंद्यात कमतरता नाही. पण असे काम करु शकणारे बरेच लोक कामगार चळवळीतील सध्याची पक्षीय हुल्लडबाजी, पाळीव गुंडांची दादागिरी पाहून या कामात भाग घेण्यास पुढे येत नाहीत. पुढारी लोकही अशा चांगल्या लोकांना जवळ करत नाहीत. कारण असे लोक पुढे आले तर पुढाऱ्यांना आपल्या

यंजीप्रमाणे वागता येत नाही. कामगारांना थापा व बंडले मारून, नाचवून आपले पुढारपण टिकवता येणार नाही अशी भीती पुढाऱ्यांना वाटते. ज्याप्रमाणे काँग्रेसचे बडे पुढारी व काही मंत्रीही आपल्या पुढारपणास व मोठेपणास खतपाणी घालणारे त्यांच्या स्वागत, सत्कार करणाऱ्या लाचार लोकांचेच सहकारी चळवळीत व जिल्हा परीषदांत स्तोम वाढविण्याचा प्रयत्न करतात. त्यांचप्रमाणे बहुतेक कामगार पुढारी आपल्या पुढारपणास उपयोगी पडणारे, शहाणपणा पुढाऱ्याकडे गहाण ठेवणारे, गुंड हुल्लडबाज लोकच संघटनेत गोळा करतात. ही परिस्थिती पालटण्यासाठी कामगारांनी खऱ्या अर्थाने जागे होणे जरूर आहे.

(प्रिमियर कामगार : ९ जून १९६६)

धंदेवाईक वकील बनू नका



बेजबाबदार नेतृत्वाखाली कारखान्यात वाढत गेलेल्या बशिस्तीकडे व गोंधळाकडे दुर्लक्ष करून ती वाढण्यास खतपाणी घातलेल्या कंपनीने अलीकडे गैरवर्तनाच्या व इतर कारणास्तव उपाययोजना करण्याचे प्रयत्न चालू केले आहेत. पण उशीरा सुचलेल्या शहाणपणामुळे कंपनीला या कामी यश मिळविण्यास फार मोठी किंमत द्यावी लागणार आहे. शिवाय ज्या लोकांवर अशा तऱ्हेची उपाय योजना होत आहे. ती पाहता सर्वसामान्यपणे योग्य तऱ्हेने वागत असताना अजाणतेपणे अगर नाइलाजानेच काही गैर गोष्टी ज्यांचे हातून घडतात अशा लोकांनाच प्रामुख्याने या उपाययोजनेमुळे निर्माण होणाऱ्या प्रसंगाना तोंड द्यावे लागते. जे गैरवर्तन व अनियमितपणा वगैरे बाबतीत पूर्वीपासून आघाडीवर आहेत, व हे सर्व करूनही त्यातून सुटका करून घेण्याच्या वाटा ज्याना माहीत आहेत त्यांच्या वाटेला जाण्याचे धैर्य खाते प्रमुख अगर आमच्या वॉच ॲन्ड वॉर्ड

खात्याजवळ नाही असे म्हटले तरी चालेल. त्यामुळे ते लोक पूर्वी इतकेच मोकाट आजही वावरतात. चौकशी अधिकाऱ्यासमोर गेलेली प्रकरणे थोडचा बारकाईने पाहिली तर तेथेही सराईत गैरवर्तनवाल्यावर उपाययोजना होण्यास अवधी लागलेला दिसेल. पण अजाणतेपणे गैरवर्तन घडलेल्या माणसावर मात्र शिस्तीच्या उपाययोजनेप्रमाणेच पुढील व्यवस्था ताबडतोब होऊन जाईल.

तेव्हा वरील परिस्थितीत सुधारणा होण्यासाठी कंपनीच्या अधिकारी वर्गाने निःपक्षपातीपणाने व चौकसपणे विचार करून जे लोक सराईत गैरवर्तनवाले आहेत त्यानाच मार्गावर आणण्याचा चंग बांधणे जरुर आहे. आपल्या खात्यातील कामगारामध्ये असे कोण आहेत याची अधिकाऱ्यांना पूर्ण कल्पना असते. पण त्यांच्या वाटेला जाण्याचे व त्यांतून निर्माण होणाऱ्या कटकटीना तोंड देण्याचे टाळण्यासाठी अधिकारी वर्ग या सराईत लोकांच्या वाटेला न जाता इतर साधारण कामगारांना 'डार ऽऽ डूर ऽऽ' करून व त्यांच्याविरुद्ध तक्रारी करून आपले कर्तव्य पार पाडल्याचे समाधान मानतात. यामुळे जे सराईत आहेत ते आणखी शिरजोर होतात व जे सर्वसाधारणपणे योग्य वर्तन करतात त्यांना वाटते की अधिकारी या लोकांच्या मागे न लागता आपल्याच मागे लागतात. त्यामुळे त्यांच्यातही असमाधान वाढू लागते.

कामगार कार्यकर्त्यांची जबाबदारी

खरे असो खोटे असो, माझ्या अशिलाची बाजू खरी असा वकिली खाक्या कामगार कार्यकर्त्यानी पत्करावयास नको आहे. जर एखाद्या कामगारावर शिस्तीची उपाययोजना झाली तर त्याच्याकडून यापूर्वी कशा तऱ्हेच्या गैरवर्तनाच्या अगर अन्य चुका झाल्या असतील व तो जर सराईत गैरवर्तनवाला असेल तर त्याला संरक्षण देण्यात, त्याचा बचाव करण्यास पुढे होण्याचे कामगार कार्यकर्त्यांनी टाळले पाहिजे. जर क्वचित प्रसंगी गैरवर्तन घडले असेल तर एक दोन वेळ त्याला संरक्षण मिळवून द्यावे. पुढे त्याच्याकडून असे गैरवर्तन घडले तर त्याला संरक्षण मिळवून देण्यास आपण पुढे येणार नाही असे बजावणे जरूर आहे. असे घडू लागले तर शिस्त निर्मिणे सोपे होईल व ते कारखान्याच्या आणि कामगारांच्या हिताचे ठरेल. गैरवर्तन, अनियमितपणा वगैरे गोष्टींना वारंवार संरक्षण मिळवून देण्याच्या कामगार कार्यकर्त्यांच्या प्रयत्नांमुळे त्या कामगाराचे हित होण्याऐवजी अहितच होते कारण आपण बेफिकीर वागलो तरी चालते, आपल्याला संरक्षण मिळते असे समजून त्याच्याकडून पुन्हा चुका घडण्याचा संभव असतो व अशा तऱ्हेच्या एखाद्या प्रसंगात कदाचित तो कचाट्यात सांपडतो व त्याचे रेकॉर्डही

खराब झालेले असते. अशावेळी तो शिस्तीच्या उपाययोजनेचा बळी होतो व त्याच्या भावी प्रगतीवरही त्याचा परिणाम होतो. तेव्हा कामगारांच्या व उद्योग-धंद्याच्या हितासाठी जरूर असणाऱ्या शिस्तीची सक्ती करणेसाठी सभेच्या वा एखाद्या युनियनच्या कार्यकर्त्यांनी जर कराईत अनियमितपणा व गैरवर्तन करणाऱ्या लोकांना संरक्षण मुळीच द्यायचे नाही व इतरांना एकदोन वेळा संधी द्यायची असे ठरविले तर हे महत्त्वाचे कार्य त्यांच्या हातून पार पडेल यात आम्हांला शंका नाही.

कार्यकर्त्यांना अगर अधिकाऱ्यांना उपदेश करण्याची आमची पात्रता नाही म्हणून हे लिखाण उपदेश न समजता सूचना समजून त्यांनी विचार करावा. त्याच-प्रमाणे कामगार बंधूनीही विचार करावा की बेशिस्त मग ती एखाद्या सभेच्या ठिकाणी असो, रेल्वेत असो, घरात असो सर्वांना तापदायक ठरते. त्याचप्रमाणे ती कारखान्यात असणेही आपणा सर्वांना तापदायक ठरते. अनियमितपणा मग तो खाण्यापिण्यात असो अगर काम करण्यात असो तो शरीराला तापदायक व भविष्यकाळात हानिकारक ठरतो याचा विचार करून शिस्त व नियमितपणा याकडे काटेकोर लक्ष देणे अत्यंत जरूर आहे.

(प्रीमिअर कामगार : २२ जानेवारी १९६२)

१० वर्षे संप, टाळेबंदी नसेल तरच गरिबी घालवू शकू

समाजवादी पक्षात असताना कोल्हापूरपासून पुण्यापर्यंत एस. टी. कामगाराना संप लढण्यासाठी तापविणारे साथी मोहन धारीया, काँग्रेस पक्षात आल्यानंतरही प्रस्थापित काँग्रेस व इंटक नेतृत्वापेक्षा आपल्या नेतृत्वास पुरोगामित्वाची झालर लावून घेण्यासाठी लाल झेंड्याखाली पुण्यांत चाललेल्या संप लढ्यास उत्तेजन देणारे प्रदेश काँग्रेस पदाधिकारी माननीय मोहन धारीया, हे नामदार मोहन धारिया होऊन वर्षभरातच १० वर्षे संप, टाळेबंदी नसली तरच गरिबी हटवू शकू असे म्हणू लागले हा नामदारकीचा महिमा, की वैचारिक परिवर्तन की इंदिराजी धोरणाचा परिणाम ?

डॉ. आंबेडकरांच्या भूमिकेतील बदलाचा अर्थ

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यानीही भारतीय घटना अंमलात येण्याच्या व स्वातंत्र्यपूर्व कालात दलीत कामगारांसाठी देदीप्यमान लढे दिले. अशी लढावू

चळवळ करणाऱ्या डॉक्टरसाहेबांनी घटनासमितीच्या समारोपी भाषणात ही घटना राबविणाऱ्या राष्ट्रात आर्थिक व सामाजिकउद्दिष्टे साध्य करण्यासाठी कायदेभंग, असहकारिता व सत्याग्रह इत्यादी मार्गांचा त्याग केला पाहिजे असे सांगितले. जेव्हा आर्थिक व सामाजिक उद्दिष्टेसाध्य करण्यासाठी घटनात्मक मार्ग बंद होते त्यावेळी बेसनदशीर मार्गाचा अवलंब समर्थनीय ठरत होता, असेही डॉक्टरसाहेबानी सांगितले आहे. तेव्हा ना. मोहन धारिया यांच्यात झालेला बदल हा अशा तऱ्हेने काँग्रेस विभक्तीकरणानंतरच्या काँग्रेस धोरणाचा भाग असेल तर योग्यच होय.

डॉ. बाबासाहेबांच्या महानिर्वाणानंतर त्यांच्या अनेक शिष्योत्तमानी आमदारकी खासदारकीच्यामागे जाऊन बाबासाहेबांच्या रिपब्लिक जनतेला संप, बंदच्या विरोधी पक्षाच्या वावटळीत लोटून दिले व आता पुन्हा नामदारकी सारख्या काही अपेक्षेने बाबासाहेबांचे काही शिष्य आणखी वेगळी भूमिका घेऊन ठाकलेत. सामान्य रिपब्लिकन जनता मात्र काय करावे या गोंधळात पडलेली दिसून येते. आर्थिक व सामाजिक समतेसाठी एक दिलाने घटनात्मक मार्गानेही प्रभावीपणे शिस्तीने लढू शकणारी बाबासाहेबांनी निर्माण केलेली एक फळी चिंबून गेली आहे. अर्थात सर्वच आंबेडकरवादींनी स्वार्थी हेतूने काँग्रेस प्रवेश केला आहे असे नव्हे.

संपन्नतेसाठी औद्योगिक प्रगती आणि औद्योगिक प्रगतीसाठी औद्योगिक शांतता

सध्याच्या काळात कोणत्याही देशाची प्रगती त्या देशाचे औद्योगिक प्रगतीवरच अवलंबून आहे, असे सर्वच विचारवंत प्रतिपादताना आढळतात. म्हणूनच स्वातंत्र्योत्तर काळात संप, मंद काम, लढे अशा संघर्षाचा मार्ग टाळून देशातील उद्योगधंद्यातील संचलनाचे कौशल्य, उपलब्ध साधनसामुग्री, मनुष्यबळ यांचा कमाल उपयोग करून घेण्यासाठी सनदशीर मार्गाने कामगार प्रश्न सोडविणारी संघटना काही ध्येयवादी नेत्यानी स्थापना केली तीच आजची इंटक होय. अर्थात या उच्च ध्येयवादाचे नावाखाली या संघटनेत मालकाचे हितसंबंध रक्षण करणारे लोक शिरले अगर निर्माण झाले हे खरे असले तरी कै. आंबेकरांच्यासारखे तपस्वी व प्रत्यक्ष समाजवादी जीवन जगणारे निस्पृह व देशभक्त नेते निरनिराळ्या प्रांतात होते व आजही आहेत. पण या तपस्व्याना, निस्पृहानाही सरकारच्या व भांडवलदारांच्या हस्तकांच्या पंक्तीत बसविणारे विरोधी नेते, एखाद्या विशिष्ट कारखान्यातील संपविरोधी कामगारांना 'संप फोडे' अशी शिवी हासडणारे विरोधी पक्षीय

नेते, कांही वर्षांपूर्वी इंटकमध्ये घुसलेत. आणि त्यापैकी काहीनी तर कांही उद्योगातील संपात बाहेरचे कामगार घुसवून प्रच्छन्न व निर्लज संपफोडेगिरी चालविली आहे. या वावदूक पुरोगाम्यांची ही संपफोडेगिरी निषेधार्ह नाही का ?

प्रभावी कायदेशीर बदलासाठीच लढे हवे होते

वास्तविक देश स्वतंत्र झाल्यापासूनच उत्पादनवाढीला, उद्योगधंद्याच्या प्रगतीला अडथळे असणारे संप, मंदकाम, घातपाती प्रकार या मार्गाचा त्याग करूनच आर्थिक मक्तेदारीला पायबंद घालण्यासाठी व कायदेशीर बदलासाठी दडपण आणणारी सामूहिक व व्यापक प्रभावी चळवळ सर्वच लोकशाहीवादी पक्षांनी व संघटनानी करायला हवी होती. सवंग लोकप्रियतेसाठी विरोधी पक्षीयांनी केवळ स्वार्थ शिकवणारी भडक कामगार चळवळ केली व गेल्या काही वर्षात सत्ताधारी पक्षात शिरलेल्यानी केवळ वैयक्तिक प्रतिमा उजळ ठेवण्यासाठी या भडक चळवळीला उत्तेजन दिले.

सांप्रत मुंबईमध्ये कामगार प्रश्नांच्या नावावर पुढारीपणासाठी लढाई चाललेली आहे व प्रकरण पोलीस अधिकाऱ्यांचे व कामगाराचे मुडदे पाडण्यापर्यंत पोहोचले आहे. वास्तविक दगडाच्या खाणीतील कामगारांचें व झोपडीवासीयांचे लढे जिद्दीने व कष्ट घेऊन लढविणाऱ्या विरोधी पक्षीय आमदारांनी आता काँग्रेस पक्षातर्फे निवडून आल्यावर त्या निकृष्ट जीवन जगणाऱ्या लोकांच्याच प्रश्नाला प्राधान्य देणे योग्य ठरले असते. त्या तडफदार आमदारांनी आपली शक्ती आणि वेळ आधीच चांगले वेतन मिळणाऱ्या व आपल्याच पक्षातील दुसऱ्या आमदारांकडे (नामधारी का होईना) पुढारपण असलेल्या उद्योगात हस्तक्षेप करण्याचे टाळायला हवे होते. पण पण त्यांनी बेफामपणे धडक मारण्याचे काम चालविले आहे.

फोरम पुढारी आणि फोरमचे लेबल लीडर

फोरमचे केंद्रीय पुढारी ना. मोहोन धारिया संप टाळेबंदी टाळा म्हणत असताना त्यांच्याच मुंबईतील सहकाऱ्याने सचिवालयातील इष्टमिष्ट कमिटीच्या खोलीत बसून स्वतःच्या लेबल लीडरशीपच्या संरक्षणासाठी भांडुपच्या कारखान्यातील कामगारांना संपाची चिथावणी देऊन टाळेबंदीच्या परिणामी दुसऱ्या मोठ्या कारखान्यात ले ऑफ आणून आपल्या लेबल लीडरशिपवर आलेले गंडांतर टाळण्याच्या प्रयत्न करीत आहेत. आपल्या चिथावणीमुळेच १९६७ साली प्रीमिअर ऑटोच्या दरवाज्यावर कामगारांची डोकी फुटली असतांना, त्यांनी मदतीसाठी

धावा केला असतानाही फ्लॅटच्या बाल्कनीत बसून दादर चौपाटीची हवा खाणाऱ्या आणि आता आपल्याच आदेशाने संपावर गेलेल्या भांडुपच्या कामगारांची डोकी फुटत असताना सचिवालयात इष्टमिष्ट कमिटीच्या चेंबरमध्ये बसून आपल्या छाकटच्या बुद्धीवैभवाचे महाराष्ट्राला दर्शन घडवून आणण्याचे तुणतुणे वाजविणाऱ्या आमदाराला रोमच्या फिडल वादकाची उपमा शोभेल. पत्ते कुटता कुटता सवंगडीने बिर्ला उद्योगभवनात बसून काही मालकांच्या बसेस, मोटारी व माणसे वापरून कामगार चळवळीत, पुढारी म्हणून मिरवण्यात व ते कागदी पुढारपण संरक्षणासाठी एका मोठ्या कारखान्यात टाळेबंदीला तर दुसऱ्या मोठ्या कारखान्यात ले ऑफ कारणीभूत असणाऱ्या मुंबई शहरातील वावदूक पुढाऱ्याला महाराष्ट्र शासनातील काही नेत्यांनी उत्तेजन द्यावे ही दुर्दैवाची व दुःखाची गोष्ट होय.

पुढारपणाच्या या हव्यासी आमदारांच्यामुळे संप, टाळेबंदी व पोलीस अधिकारी कामगार यांचे मुडदे पडण्यापर्यंत आलेल्या प्रकाराकडे महाराष्ट्राचे लोकप्रतिनिधी आमदार खासदार, नामदार लक्ष देतील काय ? सत्यशोधन करतील काय ?

(नागरिक मित्र : ५ सप्टेंबर १९७२)

असे नेते गरिबी हटवू शकतील ?

गेल्या महिन्यात इंटकच्या रौप्य महोत्सवी प्रसंगाच्या भाषणात पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी या देशासमोरील समस्या सोडविण्यासाठी म्हणजेच गरिबी हटविण्यासाठी या देशातील कामगार नेते, कार्यकर्ते व कामगार या सर्वांनी कोणत्या प्रश्नांना प्राधान्य दिले पाहिजे याची स्पष्ट कल्पना दिलेली आहे. इंदिरा गांधीचे नेतृत्व स्वीकारलेल्या कार्यकर्त्यांनाच नव्हे तर इंदिरा गांधीना पाठिंबा देण्यासाठी ज्या कोटचवधी मतदारांनी काँग्रेस पक्षाला मते दिली त्या सर्वांनीच इंदिरा गांधींचे धोरण यशस्वी होण्यासाठी आपआपल्या कार्यक्षेत्रात, दैनंदिन जीवनात, नोकरीधंद्यात कणाकणाने प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. तरच गरिबी हटविण्याच्या दिशेने काही भक्कम पाऊले पडण्याची शक्यता आहे. पण सामान्य नागरिकांना कार्यप्रवण करण्याची ज्यांच्यावर जबाबदारी आहे ते काँग्रेस कार्यकर्तेच इंदिरा गांधीचे धोरण अंमलात आणण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न

करीत असल्याचे दिसून येत नाही. अर्थात इंदिरा गांधींचे नेतृत्व स्वीकारलेले सर्वच काँग्रेस कार्यकर्ते त्यांचे धोरण अंमलात आणण्यासाठी झटतील अशी अपेक्षा बाळगता येणार नाही. पण ज्यांनी इंदिरा गांधींच्या नांवावर निवडणुकीत मते मिळविली, मला मत म्हणजे इंदिरा गांधीना मत, किंवा इंदिरा गांधी याच माझ्या नेत्या अशा भावना व्यक्त केल्या आहेत त्या आमदार–खासदारांनी तरी इंदिरा गांधींच्या अशा महत्त्वपूर्ण भाषणाचा प्रसार करून कार्यकर्त्यांवर व कामगारांवर त्या विचारांचा प्रभाव निर्माण करायला नको काय ?

पण प्रत्यक्ष चित्र वेगळेच आहे. इंदिरा गांधींच्या प्रभावामुळेच निवडून आलेले अनेक नेते व कार्यकर्ते दुसऱ्याच कार्यात मग्न आहेत. मंत्र्यांची संख्या वाढवू नये म्हणून मुंबईत पत्रके काढणारे नेते स्वतःची मंत्रीपदावर वर्णी लागावी म्हणून दिल्लीला हवाई वाऱ्या करीत आहेत, दुय्यम दर्जाच्या नेत्यांसमोर लाळघोटेपणा करीत आहेत. कुणी सरकारी उद्योगधंद्याच्या संचालक मंडळावर वर्णी लागण्यासाठी धडपडत आहेत. कोणी एखाद्या भत्ताकमिटीवर स्थान मिळविण्यासाठी खटपटत आहे, कुणी परदेश दौऱ्यावर जाणाऱ्या प्रतिनिधी मंडळावर घुसत आहे. कुणी कामगार संघटनेतील प्रतिनिधी मंडळावर घुसत आहे. कुणी कामगार संघटनेतील सत्तास्थाने अगर संघटनाच काबीज करण्यासाठी आपल्याच जुन्या सहकाऱ्याशी झोंबाझोंबी करीत आहे.

हा सारा प्रकार म्हणजे इंदिरा गांधींच्या धोरणावर व नावावर निवडून येणाऱ्यांनी इंदिरा गांधीचे धोरण अयशस्वी करू पहाणाऱ्याना सहकार्य देण्यासारखे ठरणार आहे.

वास्तविक इंदिरा गांधीचे हे महत्वपूर्ण भाषण सविस्तरपणे कामगार कार्यकर्ते व कामगारांच्या समोर आणण्यासाठी व त्यात उपस्थित केलेल्या मुद्द्यावर संघटना-निहाय, विभागनिहाय आपण प्रत्यक्ष काही करू शकतो का याचा विचार करण्यासाठी शिबिरे, चर्चा काँग्रेस व इंटक नेत्यानी आयोजित करून काही कार्यक्रम हाती घ्यायला हवा.

सत्ता व प्रसिद्धीलोलुप पुढारी संकट आणतील

देशातील उद्योगधंदे राष्ट्रीय-नियंत्रणाखाली आणले जात आहेत. त्यातून व अन्य मोठ्या कारखान्यातून होणारी उधळपट्टी थांबवून वाचणाऱ्या व निर्माण होणाऱ्या संपत्तीतील भरीव भाग नव्या नव्या उद्योगांच्या उभारणीत गुंतविला जावून बेकारांच्या व पुढील पिढीच्या जीवनाचा विचार करायला हवा.

नफ्यातील वाढीव बोनस आदी हक्काबरोबर कर्तव्याची जाणीव देऊन कामगारांना संघटित करणाऱ्या नेत्यांची व कार्यकर्त्यांची आज जरुरी आहे. कामगारांना केवळ मागण्या व हक्कावर संघटित करून पुढारीपण व लोकप्रियता तसेच सत्ता मिळवू पहाणारे नेते ज्या कामगारवर्गाचे नेतृत्व करतात त्यांच्या पुढील पिढीवर संकट आणण्यास ते कारणीभूत ठरतील.

(नागरिक मित्र : १५ जून १९७२)

आदर्शांचा शोध घ्या!
नवे आदर्श निर्माण करा!

खादी केवळ वस्त्र नाही शस्त्रही आहे, या शस्त्रानेच परदेशी कपडचांची होळी करून भारतीय स्वातंत्र्य लढचाचे रणशिंग फुंकले महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली चरख्यानेच स्वावलंबनाचे माहात्म्य सांगितले. स्वावलंबनाचे महत्व त्रिकालाबाधित रहाणार आहे. देश रक्षणाच्या साहित्यासह आपणास लागणारी सर्व साहित्यसामूग्री आपण निर्माण करू शकलो अगर देवाणघेवाणीच्या व्यवहार सामर्थ्यावर ती मिळवू शकलो तरच आपण खरे स्वतंत्र. अन्यथा श्रीमंत व समर्थ राष्ट्रांच्या मदतीच्या व कर्जांच्याद्वारे आपण गरजा भागवून घेऊ लागलो तर आपण न कळत त्या राष्ट्रांचे अंकित होतो.

अत्याधुनिक यंत्रतंत्राचा वापर जागतिक बाजारपेठेतील स्पर्धेत उतरण्यासाठीच केला पाहिजे. कामगारांना बेकार करून मालकांचे नफे वाढविण्यासाठी त्याचा उपयोग होता कामा नये. त्याचप्रमाणे संप, गो स्लो, नियमाप्रमाणे काम,

कामचुकारपणा, विमायोजनेचा दुरुपयोग करून दांडग्यामारूपणा या अपप्रवृत्तीमुळे अत्याधुनिक यंत्र तंत्र वापरून कागगार प्रश्न टाळण्याकडेही खासगी व राष्ट्रीय उद्योगांचा कल वाढत आहे. अशा या परिस्थितीत कामगार वर्गानेही आपले संप लढ्याचे तंत्र आपल्या गरीब बांधवावरच उलटणार नाही यासाठी चिंतन करून मार्ग काढला पाहिजे. अन्यथा आधुनिक यंत्रतंत्र त्यांच्यापैकीच हजारोंना धोंडा ठरून त्यांच्या पायावरच पडेल.

गांधी जयंतीच्या निमित्ताने यावर नव्या पिढीने विचार मंथन केले पाहिजे. जुन्या पिढीतील जाणत्यांनी सक्रिय मार्गदर्शन केले पाहिजे. केवळ महात्मा गांधींच्या प्रतिमेला हार अर्पण करून महात्मा गांधीना आदरांजली वाहण्याने कार्य पुरे होणार नाही.

जगा आणि जगू द्या

उपरोक्त विचार या देशातीलच नव्हे तर जगातील सर्व महान धर्मप्रसारकांनी सांगितल्याचे आढळून येते. आपल्या देशातील सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्यांनी याच विचाराचा पाठपुरावा सातत्याने केला आहे. असे असूनही आज आपल्या देशातील कोट्यवधी जनतेला दारिद्र्य रेषेखालचे जीवन जगावे लागत आहे. १५ वर्षांपूर्वी प्रथम निरनिराळ्या प्रांतात व नंतर संबंध देशावरही निरनिराळ्या पक्षांच्या राजवटी येऊन गेल्या. या सर्वांनी "जगा व जगू द्या." या न्यायासाठी ग्रामोद्योगाचे देशातील अर्थव्यवहारातील व जीवनातील महत्व जाणून त्यासाठी शासनातर्फे चालविलेले कार्यही अधिक नेटाने चालविण्याचा प्रयत्न करण्याचे जाहीर केले. या सर्व पक्षांच्या श्रेष्ठ नेत्यांनी ग्रामोद्योगाचे महत्त्व वेळोवेळी आपल्या व्यक्तव्यातून प्रतिपादन केले. पण अशा सर्व महान मंडळींनी सातत्याने या विचाराचा पाठपुरावा करूनही आपल्या देशातील कोट्यवधी जनतेचे प्रश्न सोडविण्यात त्यांचे प्रयत्न अपुरे पडले. कारण केवळ शासकीय यंत्रणेमार्फत या प्रश्नांची सोडवणूक होऊ शकणार नाही हे अनेक जेष्ठ मान्यवरानी वेळोवेळी सांगितले आहे. त्याचप्रमाणे केवळ हा विचार पुढाऱ्यांच्या भाषणातून अगर आध्यात्मिक नेत्यांच्या कथाकीर्तनातून, प्रवचनातून, धार्मिक सम्मेलनातून प्रसारीत करून भागणार नाही. त्यासाठी रचनात्मक कार्याचे महत्त्व समजावून घेऊन तळमळीच्या रचनात्मक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांची व सुजाण नागरिकांची फळी उभारून त्यात सर्वसामान्य नागरिकांनाही प्रत्यक्ष सहभागी करण्याचा प्रयत्न झाला पाहिजे.

मुंबईत नव्या व मोठ्या उद्योगातील हजारों कामगार फ्लॅटस् घेऊ शकले

पण जुन्या गिरणीकामगारांतील हजारोंना किमान सोयीच्या खोल्याही घेता आल्या नाहीत. देशाची औद्योगिक प्रगती कितीही मोठ्या प्रमाणात झाली तरी देशातील कोट्यवधींचा भाकरी व निवाऱ्याचा प्रश्न नजीकच्या भविष्यकाळात सुटणार नाही असे आज दिसत आहे. आधुनिकीकरणामुळे गेल्या पंचवीस वर्षात वस्त्रोद्योगातून लाखो मजूर बाहेर फेकले गेलेत. नुकत्याच झालेल्या संपाचा फायदा घेऊन हजारो कामगारांचे निवृत्तीच्या फायद्यासकट शिरकाण झालेले दिसत आहे. स्वातंत्र्यानंतर उभारलेल्या अन्य मोठ्या उद्योगातील कामगारांच्या मानाने या वस्त्रोद्योगातील बहुसंख्य कामगारांचे जीवन अत्यंत हलाखीचे आहे. या नव्या मोठ्या उद्योगातील कामगारांना गेल्या वीस पंचवीस वर्षात शासकीय धोरणाचा लाभ मिळाला. त्यामुळे ते निदान सुसह्य जीवन तरी जगू शकत आहेत. यापैकी अनेकांनी या धोरणाचा गैरफायदाही घेतला. त्यामुळे सरकारने स्वीकारलेल्या कठोर धोरणाचा रपाटा अधिकच हलाखीचे जीवन जगणाऱ्या वस्त्रोद्योगातील कामगारावरच पडावा ही अत्यंत खेदाची बाब होय. " दारिद्र्य, मरण यातून मरण बरे मरणात दुःख थोडे द्रारिद्र्यात व्यथा मोठी " या स्वातंत्र्यपूर्व काळातील प्राथमिक शाळेतील कवितेतील विचार हजारो गिरणी कामगारांच्या मनात येत असतील.

सरसकट आधुनिकीकरण हे वरदान ठरण्याऐवजी या देशातील गरिबांना तो शाप ठरेल का ? याबाबतचे चिंतन शासनातील आणि अन्य विचारवंतांनी करावे व समाजासमोर मांडावे. कामगारवर्गानेही आपले कोठे चुकते यावर चिंतन करावे. मालक अगर पुढारी होण्यासाठीं, पैसे मिळविण्यासाठीं कामगार क्षेत्रात शिरलेले लोक त्याचा विचार करणार नाहीत.

ज्या उत्पादनाला जागतिक बाजारपेठेत स्पर्धेसाठी उत्पादन खर्च कमी करण्यासाठीच आधुनिक यंत्रसामुग्री वापरण्यास वाव असणे योग्य ठरेल, याबाबतची चिकित्सा कठोरपणे होणे जरूर आहे. आधुनिकीकरणाचा उपयोग मालकांचे नफे वाढविण्यासाठी होत असेल तर त्यावर कठोर नियंत्रण असणे जरूर आहे. त्याचप्रमाणे स्वातंत्र्योत्तर काळात जे कामगारकायदे झाले त्यांचा फायदा घेवून संप, आस्ते काम, दांडयामारूपणा, विमायोजनेचे गैर फायदे घेण्याच्या अप-प्रवृत्तींची वाढ झाली आहे. अयोग्य व अवास्तव कारणासाठी या तंत्राचा वापर सुरू झाला आहे. या अडचणीतून मार्ग काढण्याच्या हेतूनेही कमी मनुष्यबळ लागणारी आधुनिक मशिनरी वापरात आणण्याची प्रवृत्ती मालकवर्गात व शासकीय उद्योगातही वाढली आहे. अशा परिस्थितीत कामगारांनीही आपल्यामधील अपप्रवृत्तींच्या परिणामी आपले वर्तन आपल्याच बांधवांच्या अगर मुलांबाळांच्या

पायावर धोंडा पाडणारे ठरेल का ? याचा विचार करणे जरूर आहे.

वर व्यक्त केल्याप्रमाणे विचारविनिमय, चिंतन, प्रत्यक्ष कार्यवाही यासाठी सामाजिक जाणीव असलेल्या नव्या पिढीतील नागरिकांनी प्रयत्न केले पाहिजेत, निखळ सामाजिक प्रश्नांची नीतिमूल्यांची जाणीव ठेवून काही काम करू इच्छिणाऱ्या नव्या पिढीतील कार्यकर्त्यांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे. समाजद्रोही कामे करूनही पुढारपण करण्याचे तंत्र हस्तगत केलेल्या व अनेक शासकीय निमशासकीय संस्थातील अधिकाऱ्यांशी संधान बांधून त्या अधिकाऱ्यांची व आपली घरेही भरणाऱ्या समाजद्रोही लोकांसमोर निर्मळ चारित्र्याच्या नागरिकांनी हात जोडून उभे रहाण्याची आज वेळ आली आहे. यामुळे जाणते नागरिक याबाबत चिंता व्यक्त करताना, चर्चा करताना आढळतात. अशा या परिस्थितीत विधायक वृत्तीच्या कार्यकर्त्यांनी स्वस्थ न रहाता काही विधायक कार्याचे व्यासपीठ निर्माण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. तरुण पिढीने आपला जोम अशा कार्यकर्त्यांचा उपयोग करून घेण्यासाठी वापरला पाहिजे.

आपण कुर्ल्यातील विधायक वृत्तीच्या नागरिकांच्या सहकार्याने येत्या गांधी जयन्तीच्या निमित्ताने एक छोटेसे काम करण्याचा प्रयत्न करूया.

खादी ग्रामोद्योगाचा वापर– अर्धपोटिना भाकर

आजकाल अद्यावत यंत्रसामुग्री व रासायनीक साधनांनी सुबक, टिकाऊ, आकर्षक व परवडेल अशा दामाच्या वस्त्र प्रावरणानी जनतेचे मन खेचून घेतले आहे. ते स्वाभाविक व व्यवहार्यही आहे. पण वर उल्लेख केल्याप्रमाणे देशाच्या ग्रामीण भागातून व काही शहरांच्या दरीद्री वस्तीतूनही वस्त्र व इतर वस्तूंचे उत्पादन करून त्यांवर आपली उपजीविका कशीतरी अर्धपोटी, अर्धनग्न परिस्थितीत चालविणाऱ्यांचे उत्पादन काही प्रमाणात तरी कमी दरात बाजारात उपलब्ध करण्यासाठी सरकारने त्या वस्तूंच्या खरेदीवर रिबेट देण्याची योजना राबविली आहे. प्रसंगानुरूप काही वेळा अधिक रिबेटही दिले जाते. तेव्हा थोडेसे सुस्थापित सुसह्य जीवन जगणाऱ्यांनी आपल्या गरजेपैकी काही पंधरा वीस टक्के गरजा (उदा. टॉवेल, लुंगी, बेडशिटस, नॅपकीन्स, जाजम, सतरंज्या, रुमाल, फरशी साफ करण्याचे कापड) ग्रामोद्योगी वस्तूतून खरेदी केल्यास त्यांच्या या खरेदीतून ग्रामोद्योगी वस्तूंच्या उत्पादनावर जगणाऱ्या लाखोपैकी काहींना तरी भाकरी, अर्धी भाकरी देण्याचे विधायक कार्य आपणाकडून घडणार आहे.

खादी हे वस्त्र नव्हे, शस्त्र आहे

ऑगस्ट ८३ च्या पहिल्या आठवड्यात आटपाडी जि. सांगली येथे खादी ग्रामोद्योग क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचे पूर्ण तीन दिवसांचे एक शिबीर झाले. त्यातील चर्चेत मा. यदुनाथ थत्ते, मा. बाळासाहेब भारदे, प्रा. काळे (वृ. महाराष्ट्र कॉलेज पुणे) यांच्यासह अनेकांच्या चर्चेतून खादी हे केवळ वस्त्र नसून ते शस्त्रही आहे, शास्त्रही आहे या आशयाचे विचार मांडले गेले. महात्मा गांधीनी या शस्त्राचा व शास्त्राचा उपयोग करूनच दुर्बल मानला गेलेल्या मरगळलेल्या समाजाला, देशाला ताठ करून देशाला स्वातंत्र्य मिळविण्याचा मार्ग दाखविला. खादी ग्रामोद्योग ही केवळ स्वदेशीची चळवळ नसून स्वावलंबनाची प्रेरणा देणारे साधनही आहे. खादी ग्रामोद्योगाच्या तत्त्वज्ञानाच्या आधारे खेडी स्वावलंबी ठेवण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. परकीय तंत्रज्ञानाचे व आर्थिक अगर साधनांचे सहकार्य घ्यायचे असेल तर आपल्याकडूनही काही देण्यासारखे आपण काही निर्माण केले पाहिजे. अन्यथा आपणास ज्या परकीय राष्ट्रांचे सहकार्य घ्यायचे त्यांचे आपण नकळत अंकित होतो. तेव्हा या व्यापक राष्ट्रीय स्वावलंबनाची प्रेरणा नागरिकांत निर्माण करता करता आपण आपल्या देशातील ग्रामोद्योगावर जगणाऱ्या अतिगरीब नागरिकबंधूनाही सहकार्य करण्याचे कार्य खादी ग्रामोद्योगाच्या काही वस्तूंच्या वापराने करू शकतो.

नागरिक बँक व कामगार नगर, कुर्ल्यातील विधायक कामाचे आदर्श

मुंबई शहरात मध्यमवर्गीय व व्यापारी वर्गाच्या सहकारी बँका वाढल्या आहेत. यात मा. इंद्रवदन ओझा यांच्या मार्गदर्शनाखालील विधायक कामगार कार्यकर्त्यांनी प्रामुख्याने वाढविलेली बँक आज प्रभावीपणाने ध्येयवादाच्या दिशेने वाटचाल करित आहे. त्याचप्रमाणे सुमारे पंचवीस वर्षापूर्वी ज्यावेळी गिरणी कामगारांना स्वतःच्या नांवावर आवश्यक सोयी असलेली भाड्याची खोली घेणे अशक्य वाटत होते, त्याकाळात गिरणी कामगारांना सर्वसोयीचे स्वतःचे हवेशीर फ्लॅटस् उभारण्याचे विधायक मार्गदर्शन व कार्य मा. ओझाजींच्या कार्यकर्त्यांकडून झालेले आहे. चार महिला गिरणीकामगारांसह आठ–दहा कामगारांना एकत्र करून आज भव्य कामगारनगरची कल्पना साकारली आहे.

नव्या पिढीने आदर्शांचा शोध घेतला पाहिजे

वर उल्लेख केलेल्या कार्यांप्रमाणे उपनगरातील अनेक विधायक कार्यांची प्रेरणा देणारे महाराष्ट्रातील पू. अण्णासाहेब पटवर्धन, साने गुरुजी, आचार्य जावडेकर, धर्मानंद कोसबी, रावसाहेब पटवर्धन या सारख्या नेत्यांबरोबर तुरुंगात असलेले शिरोडा सत्याग्रहासह अनेक सत्याग्रहात भाग घेतलेले मा. ओझाजी आज वयाच्या ऐंशीव्या वर्षातही क्रियाशील आहेत. कानांनी अजिबात ऐकू येत नाही, समोरच्या माणसाचे विचार कागदावर अगर पाटीवर लिहून दिल्यास ते समजून व्हायचे व आपले विचार सांगायचे असा कार्यक्रम करीत ते आपल्या 'रचनात्मक कार्य समिती'च्या राष्ट्रीय शाळेमागील विलेपार्ले येथील कार्यालयात दिवसाचे चार पाच तास असतात. घरी वृद्ध पत्नीचे डोळेही अधु असल्याने प्रसंगी भाजी निवडतानाही व अन्य मदत करताना कार्यकर्त्यांनी त्यांना पाहिले आहे. अशा या बहिऱ्या, आंधळ्या जोडीने आजकालच्या संन्याशानाही आदर्श ठरेल असा जीवनक्रम चालविला आहे. रचनात्मक समितीच्या कार्यांसाठी ही वयोवृद्ध व्यक्ती आजही काठी टेकीत रोज सकाळी किमान एक सहाय्यक मिळविण्यासाठी पायपीट करीत आहे. आज समाजासमोर आदर्श नाहीत अशी खंत व्यक्त केली जाते. राजकीय व अन्य अनेक व्यासपीठांवर आदर्श व्यक्तित्वाला स्थान देण्याऐवजी आदर्शांचे नाटक करणाऱ्यानीच ती काबीज केली आहेत. अशा या परिस्थितीत विधायक वृत्तीच्या कार्यकर्त्यांनी व विशेषत: नव्या पिढीतील नागरिकांनी आदर्शाचा शोध घेऊन ते समाजासमोर आणले पाहिजेत. पुण्याच्या भारतीय शिक्षणसंस्थेचे संचालक श्री. चाफेकर यांनी अलिकडेच एका भाषणात काढलेले पुढील उद्‌गार त्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत. 'आदर्श दिसत नाहीत अशी हाकाटी करण्यापेक्षा तो शोधला पाहिजे, सापडत नसेल तर आपल्यातून निर्माण केला पाहिजे, तो निर्माण करण्यासाठी झगडले पाहिजे' ही पत्रिका व त्यातील विचार व कार्यक्रम अशाच एका छोट्याशा प्रयत्नाचा भाग आहे. सुजाण नागरिक व कार्यकर्ते सहकार्य करतील अशी अपेक्षा आहे.

(रचनात्मक कार्याच्या प्रसारासाठी)

युवकांनो, नेत्यांना दुरुस्त करा किंवा पुढारीपणा घ्या !

आज देश आर्थिक संकटास तोंड देत आहे याची जबाबदारी प्रामुख्याने सर्वच पक्षांच्या नेत्यांवर आहे. लोकशाही राज्यव्यवस्थेत लोकांनाही काही किमान जबाबदारी उचलावी लागते, शिस्त पाळावी लागते याची कर्तव्य-कठोर जाणीव देण्याचे काम देशाच्या सत्ताधारी व विरोधी बहुसंख्य नेत्यांनी टाळलेच आहे. अनेक श्रेष्ठ नेतेच स्वतः बेजबाबदार वागू लागले असून त्यामुळेच आजची परिस्थिती निर्माण झाली आहे. देशासाठी, जनहितासाठी राजकारण करण्याऐवजी बहुसंख्य सत्ताधारी नेत्यांनी सत्तेचे व स्वार्थांचे राजकारण चालविले आहे. तर विरोधी नेत्यांनी फक्त विरोधासाठी विरोधाचे राजकारण करून औद्योगिक कामगारांना व अन्य गरीब जनतेला आपल्या पक्षीय राजकारणासाठी राबविण्याचे खेळ चालविले आहेत. महाराष्ट्रात या जबाबदारीतून श्रेष्ठ नेते ना. यशवंतराव चव्हाण हेही सुटू शकत नाहीत. तद्वत विरोधी पक्षाचे श्री. एस. एम.

जोशी आदिही सुटू शकत नाहीत. बेरजेच्या नावाखाली वाटणीच्या राजकारणा मुळे भल्याभल्यांना पाणी पाजणाऱ्या इंदिरालाटेचा फारसा धक्का न लागता सह्याद्रीला वळसा घालून ती लाट पुन्हा समुद्रात विलीन झाली.

श्रेष्ठ विरोधी नेते एस. एम. व त्यांच्या सहकाऱ्यांनी तर देशभक्तीची प्रेरणा देऊन हजारो तरुणांना उभी करणारी राष्ट्र सेवादलासारखी शक्ती पक्षीय राजकारणांत ओढून विकलांग करून टाकली. एके ठिकाणी प्रचारास आल्यावेळी ते एकदा म्हणाले होते की, 'रत्नाप्पाण्णा आमचेच आहेत, पण ते दुष्टांच्या पंक्तीत बसलेत म्हणून त्याना विरोध करणे भाग पडते' पण हे सांगत असताना आपण नसलेल्या भ्रष्टाचाराचा प्रचार करतो, याची त्याना खंत वाटली नाही हे कशाचे द्योतक आहे? ज्याप्रमाणे चव्हाणानी सत्तेचे राजकारण करतांना अनेक कार्यकर्त्यांची कुचंबणा करून राजकारण विलीन केले, त्याप्रमाणे विरोधाचे राजकारण करताना साधनशुचिताग्रणी एस. एम. यानाही भान राहिले नाही. याची अशी अनेक उदाहरणे महाराष्ट्रात मिळतील.

इंदिराजींनी रेल्वे संपाच्या व अन्य काही प्रसंगी कामगारांना देशासाठी काही त्याग करण्याचे आवाहन केले. परंतु वेतन, भत्ते, बंगले यातून गाद्यांवर लोळणारे अनेक पुढारी आडमार्गी कमाई करून विलासाच्यामागे लागलेत. त्याना आवरून त्यागासाठी सिद्ध करण्यासाठी काही खंबीर उपाय न योजता कामगारांना त्यागाच्या गोष्टी सांगणाऱ्या इंदिराजींचे ऐकून घेण्याच्या मनःस्थितीत कोण असणार? साप्ताहिक साधनाच्या अंकात "कामगारांत भांडवलशाही प्रवृत्ती शिरली आहे, व्यापक वर्ग हिताची कामगारांना जाणीव राहिली नाही" अशा आशयाचे विचार व्यक्त करणारे एस्. एम्. रेल्वे संपाच्या निमित्ताने सरकारवर कामगारछळाचा आरोप करतात, पण या रेल्वे कामगारांकडून कोटयवधि गरीब श्रमिक जनतेला जी वागणूक मिळते त्याला काय म्हणायचे? भ्रष्टाचाराविरुद्धही एस्. एम्. ओरडतात, पण रेल्वे कर्मचारी वर्गाकडून रेल्वे तिजोरीत जाणे अवश्य असलेल्या संपत्तीतला मोठा भाग हडप होऊन रेल्वे बोर्डाच्या वरिष्ठ पातळीवरील जनता लुटीच्या कार्यात भागीदारी करणाऱ्या रेल्वे कर्मचाऱ्यांच्या भ्रष्टाचाराकडे एस्. एम्. यांनी डोळेझाक कां करावी? राष्ट्रसेवादलातर्फे नुकत्याच झालेल्या भ्रष्टाचाराविरोधी शिबिरात उच्च स्तरावरील भ्रष्टाचारापेक्षा स्थानिक प्रारंभिक पातळीवर त्याला प्रतिबंध प्रभावी ठरेल असे विचार व्यक्त झालेत त्याची दखल एस. एम. यांनी का घेऊ नये? प्लॅटफॉर्मवरील व अन्य संडासात पाणी टाकणारा झाडूवाला पगारा व्यतिरिक्त जमा करीत असलेला खुर्दा काही ठिकाणी त्याच्या

पगारापेक्षा अधिक असतो. मोठ्या स्टेशनवरील स्टेशन मास्टर, पार्सल व गुडस् ऑफिसमधील कर्मचारी यांची कमाई एस्. एम्. ना माहीत आहे काय ? इंदिराजींना आमंत्रण देणाऱ्या समितीत आपण होतो म्हणून त्यांच्या स्वागत समारंभास आपणास विरोध करता येणार नाही असे काल परवाच सांगणाऱ्या एस्. एम्. नी रेल्वे कर्मचाऱ्यांतल्या वरील खास कमाईशी संबंध असलेल्या व बऱ्या पगारवाल्या कर्मचाऱ्यांना आपल्या मागण्यांना आवर घालून रेल्वेतील निकृष्ट जीवन जगणाऱ्या जगणाऱ्या कर्मचाऱ्यांवरचा अन्याय दूर करण्यासाठी का आवाहन करू नये ? रेल्वे कर्मचाऱ्यांपेक्षा असह्य जीवन जगणाऱ्या, कायम नोकऱ्या नसलेल्या, पेन्शन इस्पितळाची सोय नसलेल्या कोट्यावधि श्रमिकांचाही विचार करून व्यापक वर्ग-हितासाठी राष्ट्रीय वेतन आयोगाची मागणी करणारा व्यापक लढा देण्यासाठी केवळ रेल्वे कर्मचाऱ्यांच्या मागण्यांसाठी झालेला संप मागे घेण्याचे आवाहन एस्. एम्. यांनी का केले नाही ?

खासदार नानासाहेब गोरे यांना १९४२ व त्यापूर्वीच्या आंदोलनाच्या अगोदरचा भारत व नंतरचा भारत यातील फरकाप्रमाणे क्रांतीचे दर्शन या संपात दिसते. कामगार व चालक झगडचात जनता हा एक तिसरा पक्ष आहे याची जाणीव ठेवली जात नाही; असे सांगणाऱ्या नानासाहेबांना जनता न दिसता क्रांती दिसते, हे विरोधाचे राजकारणच होय. मिल मजदूर सभेच्या रौप्य महोत्सवी मेळाव्यातील त्यांचे भाषण, मे दिनानिमित्त त्यांनी लोकसत्तेत व्यक्त केलेले विचार (१९७१) आणि सांगलीत चिंतामणराव कॉमर्स कॉलेज भेटीच्या वेळी सांगलीत त्यांनी व्यक्त केलेले विचार (१९७३) यांची संगती कशी लावायची ? ४२ च्या आंदोलनाचा उद्गाता महात्मा गांधीसारखा महापुरुष होता. पण रेल्वे संपाचा उद्गाता 'बंद'चा छंद लागलेला स्टेट कामगार पुढारी आहे हे नानासाहेबानी लक्षात घेऊ नये, हाही विरोधी राजकारणाचाच परिणाम होय.

नव्या सुशिक्षित पिढीने जबाबदारीच्या जाणिवेने पुढाऱ्यांना हटविण्यासाठी नाही तर दुरुस्त करण्यासाठी व जरूर पडली तर त्यांच्या जागा घेण्याची तयारी केली पाहिजे. पण त्यासाठी प्रामाणिक तळमळीची व कष्ट घेण्याची तयारी असलेले युवक पुढे येणे जरूर आहे.

(दैनिक राष्ट्रप्रगति : २० जून १९७४)

उद्योगधंदे, कामगार आणि जनता

मुंबईतील प्रीमियर ऑटोमोबाईल कारखाना १९५८ च्या संपामुळे गाजला त्यानंतरही वृत्तपत्रातून वेळोवेळी तो गाजला आहे. आज तो आर्थिक संकटात आहे म्हणन गाजत आहे. अशा अडचणीच्या काळात एक अनुभवी कर्तबगार कार्यकारी संचालक या कारखान्याला लाभले आहेत.

या संचालकांनी कामगार अधिकाऱ्याना विश्वासात घेण्याचा प्रांजळ प्रयत्न केला आहे. इतक्या वर्षात जे घडले नाही ते त्यानी केले. 'प्रीमीयर जगत' चा खास अंक काढून कारखान्याच्या आर्थिक परिस्थितीचे विवरण केले. त्यामध्ये त्यानी शेअर होल्डर्सची आठवण काढली आहे. शेअर होल्डर्सची जाहीर आठवण काढणारा एकतरी संचालक या कारखान्यात आला हे पाहून शेअर होल्डर्सना हायसे वाटले असेल. शिवाय कामगार प्रतिनीधीशी बोलतांना या धंद्यात सार्वजनिक क्षेत्रातील भागभांडवल मोठ्या प्रमाणात असल्याचे त्यांनी सांगितले.

थोर समाजवादी नेते खा. नानासाहेब गोरे यांनी १ मे १९७१ च्या दै. 'लोकसत्ता' मध्ये व्यक्त केलेल्या विचारात या देशात कारखान्याचे चालक व कामगार यांच्या प्रमाणेच ज्यांच्या जीवावर हे कारखाने जगतात त्या जनतेचाही विचार झाला पाहिजे अशा आशयाचे विचार व्यक्त केले. याच संदर्भात मी तेरा वर्षापूर्वी 'शिवनेर' मधून काही विचार प्रसिद्ध करून त्याच्या हजारो प्रती कामगारात वाटल्या होत्या. अर्थात हे विचार त्यावेळचे समाजवादी खासदार व नंतरचे नियोजन मंत्री श्री. अशोक मेहता यांच्या रविवार लोकसत्तेच्या मे १९५८ च्या अंकातील एका लेखामुळे व त्या वेळचे मजूरमंत्री श्री. नंदा यांच्या एका भाषणामुळे मला स्फुरले, हे नमूद करणे जरूर आहे. त्यानंतर याच स्वरूपाचे विचारमी 'प्रिमियर कामगार' मधून प्रसिद्ध केले. याच्या प्रती मी अनेक नेते व पत्रकार यांना पाठवीत होतो. त्यापैकी किती जण ते वाचत होते कोण जाणे ! पण कांहीची पत्रे व अभिप्राय मिळाले. पत्रपंडित पां. वा. गाडगीळ यांनी आपल्या अग्रलेखातून त्यांची दखल घेतली. दै. नवाकाळने अभिनंदन केले. पुण्याच्या सकाळने कांही विचार आपल्या अंकात जसेच्या तसे पुन्हा छापले. माजी मुख्यमंत्री कै. कन्नमवार यांचे अनपेक्षित पत्र मिळाले. ओळख नसतानाही माजी खासदार तुळशीदास जाधव व 'धनुर्धारी' चे अ. सी. केळुसकरांची पत्रे आली. आमदार रत्नप्पा कुंभार, श्री. वसंतरावदादा पाटील व श्री. गुलाबराव पाटील यानी 'प्रीमियर कामगार' ला सक्रिय उत्तेजन दिले.

अलीकडे अनेक नेत्यांच्या भाषणातून अशा विचारांचा उल्लेख येतो. याचा अर्थ आजही त्या विचाराचे महत्त्व आहे, नव्हे वाढले आहे असा अर्थ होतो. कारण महत्त्वाचे उद्योग राष्ट्रीय मालकीचे होत आहेत. म्हणूनच ते विचार जसेच्या तसे या अंकात अन्यत्र प्रसिद्ध केलेत, 'नागरिक' प्रामुख्याने प्रीमियर कामगारातच प्रसारित होणार असल्याने 'नागरिक' यापुढेही अशा प्रश्नाना प्राधान्य देणार आहे.

आमच्यासारख्या श्रमजीवी नागरिकांनी आपल्यापेक्षा कमी वेतन व उत्पन्न असणाऱ्या कोट्यावधी श्रमजीवी नागरिकांच्या प्रश्नाकडे पाहिले नाही तर या देशातील स्वार्थी भांडवलदारी प्रवृत्तीत व आपल्यात फारसा फरक रहाणार नाही. आपल्या श्रमाच्या योग्य मोबदल्यापेक्षा अधिक मोबदला मिळविण्यासाठी काम शिल्लक ठेवून ओव्हर टाईम मिळविणारा कामगार आणि दुसऱ्याच्या श्रमावर गबर होऊ पाहाणारा भांडवलदार यांच्यात फरक काय ? सरकारी व खाजगी नोकऱ्यातून निवृत्त झाल्यावर आपल्या आयुष्याची बचत शेअर्स व सरकारी बचत योजनेतून गुंतवून खासगी व सरकारी उद्योग उभारणीस हातभार लावून आपल्या

वृद्धापकाळात काही हातभार आपल्याला त्यातून मिळेल अशी अपेक्षा ठेवणाऱ्या हजारो लोकांच्या दुःखाकडे आपणच पहायला पाहिजे. आपला पगार, ओव्हर टाईम इनसेंटीव्ह व बोनस हे आपण घेत आहोत असे असूनही सोसायटीचा डिव्हीडंड थोडा उशीरा मिळाला तरी आपली डोकी किती भडकतात. मग सत्तावीस वर्षे पैसे गुंतवून त्यापैकी बहुसंख्य वर्षे काहीच डिव्हीडंड न मिळाल्याने मध्यमवर्गीय शेअर होल्डरची मनःस्थिती काय होत असेल? अर्थात या परिस्थितीची जबाबदारी कामगारापेक्षा संचालकावर येते. पण यापुढे केवळ मागण्यांसाठी जागरूक न रहाता गैरकारभारावरही नजर ठेऊन तो थांबण्यासाठी कामगार संघटनांनी प्रयत्नशील राहिले पाहिजे. आपल्या श्रमातून निर्माण होणाऱ्या संपतीत आपल्याला न्याय्य वाटा मिळावा, सचालकांना अधिकाऱ्यांना लूट करता येऊ नये पण त्यानाही त्यांचा वाटा मिळून उरलेली संपत्ती राष्ट्रीय उद्योगाच्या वाढीस कारणी लागावी असा आग्रह कामगारांनी आपआपल्या कामगार संघटनांमार्फत धरायला हवा.

(नागरिक : १५ सप्टेंबर १९७१)

उद्योगधंद्यांचे शोषण प्रथम थांबवा

दोन महिन्यांपूर्वी महाराष्ट्राचे मजूरमंत्री ना. नरेंद्र तिडके यांनी एका भाषणात कामगार कार्यकर्त्यांचे पगार कारखानदारांनी देण्यासंबंधात कायदा करण्याचा विचार व्यक्त केला. त्यावर निरनिराळ्या कामगार संघटनांच्या नेत्यांच्या प्रतिक्रिया एका वृत्तपत्रातून व्यक्त झाल्या. त्यापैकी बहुतेकांनी ही कल्पना योग्य नसल्याचे सांगितले. ज्यांनी स्वागत केले त्यानीही ते हातचे राखून केले. वास्तविक आज अनेक गिरण्या कारखान्यात मान्यताप्राप्त युनियनचे कार्यकर्ते युनियनच्या कामासाठी मुक्त आहेतच. त्यांना पगार तर मिळतोच पण अन्य सवलतीही मिळतात. मालक चालकांच्या पाठिब्यावर जगणारे कार्यकर्ते त्या लोकांच्या खाबूगिरीवर निर्भीड प्रकाश टाकून त्याविरुद्ध सांघिक आवाज उठवू शकत नाहीत. आणि उठवलाच तर त्यात प्रामाणिकपणाचा अभाव असतो. त्याचप्रमाण कामगारांच्या पाठिब्यावरच आपले पुढारीपण व कार्यकर्ता ही उपाधी

टिकवायची असल्याने कामगारात वाढत असलेल्या बेफिकीरपणावरही हे पुढारी निर्भीड बोट ठेवू शकत नाहीत. याशिवाय राजकीय पक्षांची, एकाच पक्षातल्या वेगवेगळ्या गटांची, पुढाऱ्यांची कामगार संघटनावर प्रभुत्व ठेवण्यासाठी चाललेल्या स्पर्धा, यामुळे उद्योगधंद्यावर किती भयायक परिणाम होत आहेत हे पुरोगामी पोलादमंत्री कुमारमंगलम यानी आकडेवारी देऊन सांगितले आहे.


उद्योगधंदे संकटात, चालक ऐष कलबात पुढारी जॉईश कलबात

सोलापूरची जुनी गिरणी, मुंबईतील सक्सेरिया मिल या गिरण्या तेरा वर्षापूर्वी संकटात आल्या. त्यापाठोपाठ गेल्या बारा वर्षांत अनेक गिरण्या कारखाने संकटात आले. बंद पडले. नुकत्याच झालेल्या किमान बोनस चर्चेत या प्रश्नाचा उहापोह होऊन जर किमान बोनसचा अधिक बोजा उद्योगधंद्यांवर पडला तर आणखी शेकडो उद्योग बंद पडतील अशी भीती मालक व चालक वर्गाने व्यक्त केली आहे. त्यांची ही भीती कदाचित रास्त असेलही–धंदे आर्थिक संकटात येत आहेत, आले आहेत, बंद पडले आहेत. पण ज्यांच्या हाती त्या धंद्यांचे संचलन होते ते संचालक व धनिक कोठेच संकटात आल्याचे फारसे दिसत नाहीत. त्यांची सारी चैन, ऐषाराम चालू आहेत, वाढत आहेत. कमी त्रासाचे, अधिक नफ्याचेव परभारी सरकारी भांडवलावर दुसरे धंदे त्यापैकी काहीजण काढत आहेत. मोठमोठ्या सरकारी उद्योगातील सरकार नियुक्त संचालक, बडे अधिकारी आणि धोक्याच्या जागांवरील कर्मचारी जमेल तेथे हात मारून सरकारी धंद्यांचे शोषण करीत आहेत. हे सारे पाहून कामगारांतर्फे संचालक मंडळावर वर्णी लावून घेण्यासाठी काही प्रसिद्धी कुशल पुढारी कामगार व राजकीय व्यासपीठावर स्टंटबाजी करीत आहेत. यापैकी बहुसंख्य उद्योगातील बहुसंख्य कामगारांनी संघ शक्ति व कायदे यांच्या आधारे आपल्या शोषणास पायबंद बसविण्यात यश मिळविले आहे. पण अनेक ठिकाणी मालकांच्या, चालकांच्या अधिकाऱ्यांच्याबरोबर आपल्या पोळीवरही तूप ओढण्याच्या नादात उद्योगधंद्यांच्या शोषणास हातभार लावला आहे. मोठे उद्योग व सार्वजनिक उपयोगाचे व्यवसाय यातून संचालक, अधिकारी, संघटित कर्मचारी आणि त्यांचे स्टंटबाज व मतलबी पुढारी यांनी चालविलेल्या कोटयावधी रुपयांच्या उधळपट्टीचा बोजा या देशातील संघटित कर्मचाऱ्यांपेक्षा कितीतरी पटीने मोठ्या असलेल्या पण विस्कळीत असलेल्या गरीब जनतेवर पडत आहे. त्यांच्या विकासासाठी चाललेल्या प्रयत्नांचा लाभ त्यांच्यापर्यंत न पोहचता तो वरील विशिष्ट संघटित वर्गच उपटत आहे. या सर्वांवर नजर ठेवून या देशातल्या शेवटच्या माणसापर्यंत विकासाची

गंगा कशी पोहोचेल हे पहाण्याची जबाबदारी असलेले लोकप्रतिनिधी, पुढारी सभा समारंभात मिरवून घेत आहेत. मालक चालक ऐष क्लबात मजा करत आहेत तर पुढारी जॉईश क्लबात पत्ते कुटत कुटत सवडीने समाजवादाचा काथ्याकूट करीत आहेत.

(नागरिक : १० ऑक्टोबर १९७१)

लकडावाला कमिटी-महागाईभत्ता व कामगार



भारतामध्ये अनेक कामगार संघटना काम करीत आहेत. कामगारांच्या कल्याणासाठी सातत्याने प्रयत्न करीत राहून कामगारांना न्याय मिळवून देण्याकरिता कितीतरी मोठे विशाल क्षेत्रआहे. पण प्रत्यक्ष कामगारांच्या हिताकरिता कामगार संघटना व चळवळ न वापरता वैयक्तिक व धंदेवाईक नजरेने स्वतःच्या पुढारीपणाचा गाजावाजा करण्यासाठीच कामगार संघटना वापरल्या जातात. त्यामुळे कामगारांच्या जीवनाशी निगडित असलेल्या मूलभूत प्रश्नाकडे कामगार संघटनांचे लक्ष रहात नाही व कामगारांचे काळाच्या ओघात अपरिमित नुकसान होते. याचे ताजे व ढळढळीत उदाहरण म्हणजे ज्या निर्देशांकाशी आपला महागाईभत्ता निगडित आहे त्या निर्देशांकातील गफलती ! वर्षानुवर्षे आपण ज्या निर्देशांकानुसार महागाईभत्ता घेत आहोत तो निर्देशांकच चुकीचा असल्यामुळे गेल्या कित्येक वर्षांत कामगारांचे कोटयवधी रुपये नुकसान झाले आहे. त्याला जबाबदार

कोण ? कामगारांच्या हिताची वरवर तळमळ दाखवून पुढारीपण गाजविणारे व कामगारांना अंधारात ठेवून मजा मारणारे धंदेवाईक पुढारीच जबाबदार होत.

मुंबई–महागाईभत्त्याचा इतिहास

सुमारे ३० वर्षांपूर्वी सप्टेंबर १९३२ ते १९३३ मध्ये मुंबईतील इ. एफ. जी वॉर्डांतील १४६९ कुटुंबांच्या जमाखर्चाची पहाणी करून एक निर्देशांक तयार करण्यात आला, व कामगारांचे रहाणीमान काय व महागाई झाली तर निर्देशांकांतील वाढीप्रमाणे एक ठराविक अधिक रक्कम कामगारांना देण्यात येऊ लागली. अशा प्रकारची पहाणी सर्वसाधारण १० वर्षांनी व्हावी लागते. पण दुःखाची गोष्ट अशी की गेल्या ३० वर्षांत अशा रीतीने पहाणी करून निर्देशांकांत कामगारांचे रहाणीमान व भाववाढ लक्षात घेऊन एकदादेखील बदल झाला नाही. १९४३–४४ च्या दरम्यान ब्रिटिश आमदानीत मुंबईसह इतर मोठ्या शहरांची एक पहाणी करण्यांत आली, पण युद्धजन्य परिस्थितीमुळे किमती व मालाचा पुरवठा स्थिर नसल्याच्या निमित्ताने ही योजना बारगळली. पुढे १९५८ मध्ये मुंबई सरकारने डॉ. लकडावाला यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिटी नेमून ग्राहकमूल्य निर्देशांकात बदल करण्याइतपत कामगारांच्या रहाणीमानात बदल झाला आहे का ? तात्पुरता नवा निर्देशांक तयार करता येईल का ? व असा निर्देशांक केल्यास त्याचा चालू निर्देशांकाशी कसा मेळ घालावयाचा ? किंवा कामगारांच्या सध्याच्या रहाणीमानाच्या काही बाबींचाच विचार करावा का ? इत्यादी प्रश्न या कमिटीपुढे ठेवले. पण पर्यायांचे उत्तर न शोधता लकडावाला कमिटीने नवी पहाणी करून नव्या रहाणीमानानुसार नवा निर्देशांकच तयार केला पाहिजे असे सांगितले. पण त्याला लागणारा कालावधी व इतर अडचणीचा बाऊ केला गेला व पुढे काहीच निष्पन्न झाले नाही.

स्वातंत्र्यानंतर उदयाला असलेल्या इंटकने निर्देशांक व कामगारांचे राहाणीमान यांबाबत संशोधन करावयास सुरवात केली. एवढेच नव्हे तर बऱ्याच वेळा सध्याच्या चुकीच्या निर्देशांकातील चुकादेखील सरकारच्या नजरेला आणून दिल्या. अयोग्य व अन्याय्य निर्देशांकातील चुकांमुळे अधिक होणारा अन्याय काही अंशी कमी केला. श्री गं. द. आंबेकर यांचे या विषयावरील प्रभुत्व व सखोल ज्ञान सर्वच कामगार संघटनांना चकित करून सोडणारे आहे.

यातूनच पुढे इंटक व इतर काही अखिल भारतीय कामगार संघटनांनी नवीन निर्देशांक येणार तेव्हा येवो पण सध्याच्या निर्देशांकात जे ढोबळ दोष आहेत ते तरी दूर करावेत याचा लकडा लावला. ५ ऑगष्ट १९६३

रोजी दिल्ली येथे भरलेल्या त्रिपक्षीय परिषदेत इंटकच्या प्रतिनिधीनी निर्देशांकांतील गफलतीसंबंधी तीव्र स्वरूपांत निषेध व्यक्त केला. ज्या पद्धतीने निर्देशांक बनविला आहे त्यातील मूलभूत चुकाच कामगारांचे नुकसान कसे करीत आहेत हे सिद्ध केले व सरकारला आव्हान दिले. त्याच महिन्यात प्रत्यक्षात वाढती महागाई पण महागाईभत्त्यांत वाढ न होता कदाचित तो कमी होण्याची भीती असलेला मुंबईतील कामगार हादरून गेला. महागाईचे चटके बसून कासावीस झालेले कामगार व यांचा मेळ त्याच्याशी घालता घालता हैराण झालेली कार-भारीण यांचे खटके अधिक जोरात उडू लागले. कामगारवर्गात एक असंतोषाची लाट पसरली. श्री. गं. द. आंबेकर आदि इंटकच्या नेत्यांनी भडक भाषणे करून आगीत तेल ओतीत न बसता सरकारला स्पष्ट शब्दात बजावून आपली बाजू आकडे व पुराव्यानिशी मांडली. परिणामी १७–१८ ऑगष्ट १९६३ रोजी महाराष्ट्र सरकारने एक त्रिपक्ष परिषद बोलविली, त्यांत सर्व कामगार संघटनांना बोलविले. आणि २२ ऑगष्ट १९६३ रोजी महाराष्ट्र सरकारने एक ठराव पास करून डॉ. लकडावाला यांच्या अध्यतेखाली एक तज्ञांची कमिटी नेमली. लकडावाला कमिटीने प्रथम तूप, तयार चहा, घरभाडे व कापड या चार गरजांवर भर देऊन १९६० चा ४२० हा निर्देशांक रद्द करून त्यांत २९ पॉईंटनी वाढ करावी अशी शिफारस केली. त्याचा अर्थ असा की सध्याच्या निर्देशांकांतदेखील २९ पॉईंटनी वाढ झाली पाहिजे. सर्वसाधारणरीत्या ७–८ रुपये महागाई वाढ मिळाली पाहिजे. याबाबत लकडावाला कमिटीच्या शिफारशी महाराष्ट्र सरकारने स्वीकारलेल्या आहेत व त्यांची अंमलबजावणी करण्याकरिता आदेश दिला आहे. संवयीप्रमाणे सहजासहजी हा पैसा मालकवर्ग सोडणार नाही. कुणी द्या म्हटले व मालकवर्गाने ते मानले असे क्वचितच ! तरीदेखील सरकार व मालकवर्ग दोघांना कळून चुकले आहे की या शिफारशींची अंमलबजावणी होऊन कामगारांना थोडा तरी दिलासा मिळाला नाही तर कामगारवर्गात तीव्र असंतोष माजेल व परिणामी ते आवरता येणार नाही. आणि कुरबूर करीत ही वाढीने महागाई देण्याचे कबूल केले.

कामगारवर्गाने द्यावयाचा बोध

महागाईभत्ता, वर्गवारी, बोनस, शिक्षण व कल्याण इत्यादी कामगारांच्या जिव्हाळ्याच्या अनेक मूलभूत प्रश्नांवर अभ्यासू व संशोधक वृत्तीने काम करणाऱ्या, जबाबदार कामगारांच्या जबाबदार कामगार संघटनाच कामगारांचे खरे हित साधू शकतात. भडक भाषणे, भडक आश्वासने व दडपशाहीने कामगार संघटना चालवून वैयक्तिक स्वार्थ साधण्यासाठी कामगार संघटना चालविल्यास कामगारांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष होते. शांत चित्ताने, दूरदृष्टीने व कर्तव्याची जाणीव

ठेवून कामगार संघटनांनी कार्य केल्यास कामगारांना आपणाला जे मिळते ते घेऊन अधिक मिळविण्यासाठी प्रयत्न करता येतो. तेल नाही, तूप नाही हाती धुपाटणे घेऊन बसण्याची पाळी येत नाही. संप, मोर्चे आदी मार्गांचा अवलंब योग्य मागण्यांसाठी केला पाहिजे. पण त्यापूर्वी सर्व सनदशीर मार्गांचा अवलंब केला पाहिजे. कारण संप हे हत्यार शेवटचे अस्त्र असते व ते फार महाग अस्त्र आहे याची जाणीव ठेवून ते जपूनच वापरले पाहिजे.

कामगारहिताच्या लंब्या-चवड्या गप्पा मारणारे कामगार पुढारी व अशा पुढाऱ्यांच्या आशीर्वादाने आपले उखळ पांढरे करणारे हप्तेबहाद्दूर अशा मूलभत प्रश्नांवर लक्ष देऊ शकत नाहीत. एवढेच नव्हे तर अशा मूलभूत प्रश्नावर माहिती विचारल्यास स्वतःची बुद्धी दुसऱ्याकडे गहाण ठेवणारे हे रेडीमेड पुढारी लांब-लचक हसतात किंवा दाढीवर हा फिरवीत आपल्या "दादा" पुढाऱ्याकडे बोट दाखवून गप्प बसतात.

कामगारसंघटनांचे मसुदे, त्रिपक्ष परिषदा, कामगार पत्रांतून व पत्रकांतून चालू असलेल्या महागाई भत्त्याच्या लढ्यात इंजिनिअरींग मजदूर सभेचा पुढारी व त्यांचे एकांडे शिलेदार कुठे गडप झाले होते? कामगार व राष्ट्रविरोधी म्हणून ज्या लाल बावटेवाल्यावर इंटकसह अनेक संघटनांनी प्रहार केला व करीत आहेत त्या लालबावटेवाल्यांनी मात्र इंटकच्या तोडीचाच माहितीपूर्ण मसुदा लकडावाला कमिटीपुढे मांडला. पण हिंद मजदूर सभा व त्यांच्यावर वाढलेले इंजिनिअरींग मजदूर सभेचे बांडगुळ कुठल्या धुंदीत पडले होते हे कामगारांनीच त्याना विचारावे.

पण दिशाभूल करून कामगारांना नाचविणाऱ्या व नागविणाऱ्या पुढाऱ्याने परवा पत्रक काढून मालकवर्गानेच जोपर्यंत निर्णय मानला नव्हता तेवढ्यात कंपनीचे स्टाफ मॅनेजर श्री. अणेगिरी यांच्याशी महागाईभत्त्याबद्दल "बोलणी" केल्याची धूळफेक कशाला केली? लाल रंगाच्या फडक्याला पुढारी बुजला काय? महागाई भत्त्याबद्दल मालकवर्गानेच विरोधी आवाज उठविला असता श्री. अण्णेगिरी या महाभाग पुढाऱ्याला काय सांगणार? 'ब्लफ मास्टर' या सिनेमासाठी फिल्म निर्मात्यानी या पुढाऱ्याला हिरोचा चान्स न देऊन फार अन्याय केला असे काही कामगार विनोद करतात तो योग्य आहे की नाही? कामगारबंधूनी शांत चित्ताने यावर विचार करून भावनेच्या आहारी न जाता योग्य कामगार नेतृत्वाला साथ द्यावी.

(प्रीमियर कामगार : १०-२-१९६४)

उद्योगधंद्याच्या वाढीत अडथळे कोणते ?

विधान सभेत आमदार धुळूप यानी उद्योगधंद्याची वाढ खुंटल्याचे सांगून सरकारवर टीका केली व नामदार बर्वे यांनी आमदार धुळूपांची टीका योग्य नसल्याची खुलासेवार माहिती दिली. पण उद्योगधंद्यांच्या वाढीला अद्याप भरपूर वाव आहे, नव्हे देशाला त्याची गरज आहे, हे सरकार उद्योगधंद्यांना उत्तेजन देणाऱ्या योजना जाहीर करत आहे त्यावरून सिद्ध होते. ही वाढ खुंटली नसेल पण या वाढीच्या मार्गात असणाऱ्या अडथळ्यांमध्ये बेजबाबदार कामगार पुढारी व त्यांच्या संघटना यांचाही हिस्सा आहे, हे कोणीच स्पष्ट बोलत नाही.

सरकारी कायदेकानू, नियम संभाळून सचोटीने एखाद्याने धंदा करायचा झाल्यास त्याला धंदाच करता येणार नाही असेच बोलले जाते व प्रसंगी अनुभवही येतो. उद्योगासाठी जागा, परवाने, परदेशी चलन, निरनिराळे टॅक्ससकरिता करावी लागणारी पूर्तता या सर्वांसाठी सरकारी यंत्रणेतून सहीसलामत बाहेर पडणे सचो-

टीच्या मार्गाने जाणाऱ्यास मुष्कील आहे. हा अनुभव व्यक्तिगत धंदा करणारास येतो असे नव्हे तर सहकारी क्षेत्रातील सामुदायिक व्यवहार सचोटीने करू पाहाणाऱ्यांना येतो. कारण या सर्व यंत्रणेला भ्रष्टाचाराची जी बिळे आहेत त्यांची तोंडे लींपत पुढे गेले तर ठीक नाहीतर या बिळांतील प्राणी अशा लोकांच्या कामाचा दुवा कुरतडत राहून तो कमकुवत करत राहतील. जर सचिवालयाच्या सहाव्या मजल्याचा दुवा बळकट असेल तर अशा माणसाची कदाचित या चक्रातून सुटका होईल. या वरच्या मजल्यालाही अडचणीत ठेवू शकणारे प्राणी मधल्या बिळांत आहेत. आणि आता पंजाब, ओरिसा व केंद्रातील काही प्रकारावरून या वरच्या मजल्याच्या वर्गातही हवा बदलल्याचे स्पष्ट होत आहे. मग ही सारी बिळे, भगदाडे बंद करण्यास काही साधनसंपत्ती लागतेच आणि या साधनसंपत्तीचा खर्च काही व्यापारउद्योगांच्या हिशोबी नोंदता येत नाही. मग न नोंद होणाऱ्या या खर्चांला काही नोंद न होणारी आवकही पाहिजेच ! ज्या माणसाजवळ न नोंद होणारी आवक करण्याची पूर्वापार कुवत, कौशल्य, बुद्धी आहे, त्यालाच हा न नोंद होणारा खर्च झेपणार, शिवाय योग्य पद्धतीनेच कौशल्याने ही बिळे बंद करता आली पाहिजेत, नाहीतर बिळे बंद होण्याऐवजी स्वतःचा हात अडकून पडणार तेव्हा अशा या वातावरणात नव्या प्रागतिक विचाराने भारावलेले सचोटीचे लोक उद्योगधंद्याच्या क्षेत्रांत कसे उतरणार ? अगर जुन्यापैकी कोणाचे परिवर्तन होऊन आपला नवा विचार कृतीत कसा आणणार ? तेव्हा असे योग्य वातावरण निर्माण करणे हे सरकारचे कर्तव्य आहे. सहावा मजला जेवढचा तडफेने, चोखपणे कारभार करेल त्यावरच हे अवलंबून आहे.

या कामगार पुढाऱ्यांना कोण आवरणार ?

ज्याप्रमाणे वरील बाबींची जबाबदारी सरकारची ठरते त्याप्रमाणे काही बेजबाबदार कामगार पुढारीही काही प्रमाणात उद्योगधंद्याच्या प्रगतीला अडथळे आणण्यास जबाबदार आहेत. मालक-मजूर प्रश्न सोडविण्यासाठी सरकारने अनेक कायदे केले आहेत. त्या कायद्याच्या आधारे सामुदायिक मागण्यांचे प्रश्न सुटू शकतात. समोरासमोर बसून, कन्सिलिएशन पद्धतीने अगर औद्योगिक न्यायालये यांच्या मार्फत प्रश्न सुटू शकतात अशी अनेक उदाहरणे मिळू शकतील. अर्थात हा धीराचा व कालावधी जास्त लागणारा मार्ग आहे, पण यामुळे कामगारांचे नुकसान न होता एकमेकांची बाजू समजावून घेऊन अगर त्रयस्थांसमोर दोघांनीही आपआपली बाजू मांडून त्या चर्चेतून आपआपल्या मागण्यांच्या योग्यायोग्यतेचा विचार स्वतःशी करायला व कामगारांना समजावून द्यायला संधी मिळते. या मार्गाने कटूता न वाढता, प्रतिष्ठेचा प्रश्न निर्माण न होता तंटे सुटतात. तेव्हा या सर्व मार्गांनी

शेवटच्या टप्प्यापर्यंत नसेना का पण काही टप्प्यापर्यंत तरी प्रयत्न करून न्याय मिळण्याची शक्यता नसेल तरच संप, हरताळाचा, असहकाराचा मार्ग स्वीकारणे योग्य ठरते. पण असा कोणताही प्रयत्न न करताच एकदम संप, हरताळाचा, दमदाटीचा, असहकाराचा मार्ग स्वीकारल्याने प्रश्न तर सुटतच नाहीत प्रतिष्ठेचा एक नवा प्रश्न निर्माण होतो. कामगारांचे नुकसान होते आणि कटुता मात्र निर्माण होते, वाढते. गेल्या चार पांच वर्षात प्रीमियर, ॲसबेटॉस, सँकी, रॅलीफॅन, अनिल हार्डबोर्ड, व्ही. पामलेज, नॅशनल रेयॉन या व अन्य अनेक कारखान्यांत काय घडले? योग्य व कायदेशीर मार्ग सोडून ताकदीच्या, सक्तीच्या मार्गाने प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न कामगार पुढाऱ्यांनी केवळ स्वतःचे महत्त्व वाढविण्यासाठी केला त्यामुळे प्रश्न तर सुटले नाहीतच पण प्रतिष्ठेचे नवे प्रश्न निर्माण झाले, कामगारांचे नुकसान झाले. उद्योगधंदे वाढून रोजगारी मिळत नाही म्हणून ओरडणाऱ्या पुढाऱ्यांनी रोजी नसणाऱ्या कामगारांना ती मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्याऐवजी ज्यांना रोजी होती त्यांना संप करून बेकार ठेवले, व शेकडोंना नोकऱ्या गमावून भटकायला लावले आहे. हे प्रकार उद्योगधंद्याच्या वाढीला मारक नाहीत काय?

उद्योगधंद्याच्या वाढीऐवजी तंट्यांची वाढ

आजकाल स्वतःला स्वतंत्र समजणारे आर. जे. मेहता यांनी तर अनेक कारखान्यांत तंट्यांची वाढ करून ठेवली. ज्या कारखान्यांत वर्षानुवर्षे तंटे नव्हते तेथे तंटे निर्माण केले. जेथे चांगले करार झाले तेथेही त्यांनी आणखी तंटे वाढविले. प्रीमियरमध्ये कामगारहितापेक्षा स्वतःच्या प्रतिष्ठेला महत्त्व दिले त्यामुळे दुसरी संघटना निघाली. त्यानंतर त्यानी कामगारांच्या मागण्यांपेक्षा विरोधी युनियनला दडपण्यावरच लक्ष केंद्रित केले. त्यामुळे दुसऱ्या युनियनला करार करावा लागला. करार योग्य आहे हे जाणत असूनही १९६३ पर्यंत त्यानी धमाल माजविली. त्या धमालीचे किती प्रतिकूल परिणाम झाले, हे आता जाणवू लागले आहे. महिंद्र आणि महिंद्र कारखान्यांत आयटकने जो करार केला तो योग्य आहे असे अनेक जाणत्यांचे मत आहे. असे असूनही मेहतांनी तेथे धमाल माजविली. सँकी, रॅली या कारखान्यांत संपावर जाण्यासारखे ज्वलंत प्रश्न नसताना तेथे महिन्यानुमहिने संप केले. हे सर्व प्रकार उद्योगधंद्याच्या वाढीला पूरक आहेत काय?

उद्योगधंद्याची वाढ खुंटली अशी तक्रार करणाऱ्या आमदार धुळूपांचे उपोषण कामगार हितासाठीच होते की काय? अशी शंका येते. जर नॅशनल रेयॉनच्या तीस कामगारांना वेळोवेळी त्यांच्याकडून घडलेल्या शिस्तभंगाच्या बाबीसाठी कमी केल्यामुळे व अन्य किरकोळ प्रश्नासाठी संप करणे व तोही दोन महिन्यांपेक्षा अधिक

काळ चालवून नोकऱ्या असलेल्या कामगारांना त्यांच्या रोजीपासून दूर ठेवणे हे जबाबदारपणाचे ठरेल काय ? नॅशनल रेयॉनच्या तीस कामगारांसाठी व किरकोळ प्रश्नांसाठी उपोषण करणारे आमदार धुळूप सँकीच्या वर्षा-दीडवर्षांपूर्वी बेकार झालेल्या दोन तीनशे कामगारांसाठी उपोषण का करीत नाहीत ? याचा अर्थ कल्याण या त्यांच्या मतदार संघातच नॅशनल रेयॉनचे बहुसंख्य कामगार आहेत तेव्हा आपल्या राजकीय नेतृत्व स्थैर्यासाठीच त्यानी उपोषण केले आणि त्यांचा सँकीचा कारखाना हा आपल्या मतदार संघाबाहेर आहे म्हणून तिकडे दुर्लक्ष केले असे समजावे काय ? किरकोळ प्रश्नांसाठी अगर गैरवर्तन करणाऱ्या कामगारांसाठी असे मोठे झगडे उभे करणे हे प्रकार उद्योगधंद्यांच्या वाढीवर परिणाम करणारे ठरत नाहीत काय ? आणि याची जाणीव आम्ही कामगारांनी पुढाऱ्यांना देण्याची जरूर पडावी काय ?

कामगारहिताऐवजी पुढाऱ्यांचे हित पहाणारे सरकार

या संप लढचामुळे, बेजबाबदार पुढाऱ्यांमुळे उद्योगधंद्याच्या वाढीवर परिणाम झाला. कामगारांचे नुकसान झाले. जरी एक वेळ कामगारहितावर दृष्टी ठेवून प्रयत्न करताना हे नुकसान झाले असते तरी क्षम्य ठरले असते. कारण एखादी चांगली गोष्ट साध्य करताना येणाऱ्या धोक्यांना व नुकसानीला तोंड देणे प्रसंगी अपरिहार्य ठरते. पण कामगारहिताऐवजी पुढाऱ्यांच्या स्पर्धेसाठी, प्रतिष्ठेसाठीच पुढारी कामगारांना लढवतात व त्याचे परिणाम धंद्यावर, प्रगतीवर व कामगारांवरही होतात. हे सारे स्पष्ट दिसत असून, समजत असूनही अशा पुढाऱ्यांना प्रतिष्ठा लाभेल अशी सहानुभूती सरकारकडून त्यांना दाखविली जाते. जनहितासाठी बांधले गेलेले सरकार जनहित बाजूला ठेवून उपद्रवी चाळे करणाऱ्या पुढाऱ्यांच्या हितरक्षणासाठी धावते. हे गिरणी कामगारांचा बोनस प्रश्न, नॅशनल रेयॉनचा उपोषण प्रश्न, मेहतांच्यावरील हल्ला या प्रकरणी सत्ताधाऱ्यांनी घेतलेली भूमिका पाहून दिसून येत नाही काय ?

(प्रीमियर कामगार : १०–३–१९६५)

अशाने प्रगती होईल का ? : १

२३ नोव्हेंबर १९६३ रोजी कंपनीच्या चेअरमननी प्रीमियर स्थापना दिनानिमित्तच्या भाषणात कंपनीने केलेल्या प्रगतीचा व पुढे कराव्या लागणाऱ्या प्रगतीचा उल्लेख केला. काही अंशी प्रगती झाली असेल, पण विचारी कामगाराला प्रश्न पडतो की खरोखर प्रगतीच्या मार्गावर वापण आहोत का ? भारताला स्वातंत्र्य व आपल्या धंद्याला मिळालेल्या सरकारी संरक्षणाच्या काळात आपण खरोखरीच प्रगती केली आहे का ? केली असली तरी ज्या गतीने व्हावयास पाहिजे त्या कार्यक्षमतेने झाली आहे काय ? या धंद्याने खऱ्या अर्थाने केलेल्या प्रगतीचे द्योतक काय ? फ्रंट ॲक्सलशिवाय उभ्या केलेल्या ट्रकच्या रांगा, गेअर बॉक्स शिवाय उभी असलेली गाडी, फोर्जिगच्या अभावी लाखो रुपयांची थंड पडलेली मशिनरी हे अकार्यक्षम व्यवस्थापनाचे द्योतक आहे की प्रगतीचे ? उत्पादनाचे व कार्यक्षमतेचे खोटे आकडे बेधडकपणे सांगणारे अधिकारी, वरिष्ठ

चालकाकडे पाठविण्यात येणाऱ्या दैनंदिन व साप्ताहिक रिपोर्टातील बनवा-बनवी, 'हम सब चोर है' या न्यायाने वाहात्या गंगेत हात धुवून घेणारे अधिकारी, प्रामाणिक कष्टाळू कामगार व इंजिनीअरला भंपक बाबूरावकडून मिळणारी अरेरावीची वागणूक, गुंड टोळभैरवांना मिळणारी शाबासकी यापैकी कोणती गोष्ट प्रगतीच्या मार्गावर आहोत याचा पुरावा देते तेच कळत नाही. प्रगतीचे द्योतक जर नफा असेल तर तो तरी कोठे आहे? शेअर बाजारात तरी प्रीमियरच्या शेअरवर कुठे उड्या पडतआहेत? प्रीमियरचा शेअर आंतबट्यात विकावा लागतो तर ज्या कंपनीच्या गाड्या प्रीमियरची गाडी मिळत नाही म्हणून नाइलाजाने घेतल्या जातात त्या कंपनीचे शेअर दाम-दुप्पट भावाने विकले जातात. एवढेच नव्हे तर प्रीमियर शेअरवर डिव्हिडंड मिळणे मुश्किल झाले आहे. कामगारांची तरी गाऱ्हाणी नाहीत असे नाही. बोनस इत्यादी प्रश्न उदारपणे सोडविलेत असेही काही नाही. मग कंपनीच्या प्रगतीची लक्षणे तरी काय आहेत? वरील प्रश्नांची उत्तरे शोधावयाची म्हणजे ते एक अभिनव महाभारतच होईल. पण आज आपण कारखान्यातील एका महत्त्वाच्या घटकाचा विचार करू. आजचा विषय आहे 'प्रीमियरचा सुपरवायझर'.

सुपरवायझर : कुंकू न लावता कंपनीचा भंसार

प्रीमियरमध्ये आपण ज्याला "सुपरवायझर" म्हणतो तो खरा कोण आहे. हे एक न उलगडणारे कोडे आहे. तो एक हजारो कामगारांसारखा कामगार आहे की कामगार व चालक यांच्यामधील दुवा आहे. की चालकाचा कारखान्यांतील विश्वासू प्रतिनिधी आहे याचा गेल्या १५ वर्षात पत्ता लागत नाही. प्रथम म्हणजे हा बिचारा कंपनीच्या बोर्डवर असतो म्हणून त्याची शेंडी कंपनीच्या बोर्डवर आणि तेदेखील कोणत्याही डेझिग्नेशन शिवाय–पण दैनंदिन कामात त्याला कामगाराच्या आश्रयाने चालवे लागते. वटवाघळाची जरी ना पक्षी न प्राणी स्थिती होते तशीच हुद्याशिवायच्या व अधिकाराशिवायच्या सुपरवायझरचे प्रीमियरमध्ये झाले आहे. बिचारा कुंकू न लावता कंपनीचा संसार खात्याखात्यातून कित्येक वर्ष करीत आहे.

असा हा "सुपरवायझर" नेमणूक झाली की कोणत्या तरी खात्यात टाकला जातो. त्याला ना कंपनीची, ना उत्पादनाची, ना त्याच्यावरील जबाबदारीची व अधिकाराची माहिती अथवा जाणीव असते. असा हा "सुपरवायझर" खात्यात आला की ठराविक लोक त्याचे पाणी जोखू लागतात. अनेक चुका करीत त्या सुधारीत हा स्वयंभू "सुपरवायझर" खात्याचे काम बघू लागतो. तो अननुभवी

तरी चांगला शिक्षित व प्रामाणिक असतो. धडाडीने काम करू पाहातो. कामगारांना व त्यांच्या प्रश्नांना योग तऱ्हेने हाताळण्याचा प्रयत्न करतो पण लवकरच प्रामाणिकपणा सद्‌गुण ठरण्याऐवजी दुर्गण ठरू लागतो. असमाधानी कामगार, बेजबाबदार खाते प्रमुख त्याला सहकार्य करीत नाहीत. कामचुकारपणा, अप्रमाणिकपणा याचे प्रीमियरचे खास पाणी पिऊ लागतो. खाते प्रमुख व प्रमुखांचे प्रमुख यांच्या लहरीनुसार सद्‌सद्‌विवेक बुद्धी दूर सारून या "सुपरवायझर"ला दैनंदिन रिपोर्टात थातुरमातुर शेंडचा लावण्याचा उद्योग करावा लागतो. न करावे तर हे प्रमुख आपल्याविरूद्ध कारवाई करून आपल्याला बेकार करतील किंवा गोत्यात आणतील याची त्याला भीती असते. सत्य बोलणे व लिहीणे गुन्हा होऊ लागतो. वास्तव व सत्य रेकॉर्ड ठेवणे म्हणजे कोणत्याही प्रसंगी वरीष्ठ चालकांच्या हातात वडगा दिल्यासारखे ह्या प्रमुखांना वाटते. स्वतःची दुष्कर्मे झाकण्याचा हीन प्रयत्न केला जातो.

त्याचप्रमाणे योग्य प्रकारचे नियोजन व नियंत्रण याच संपूर्ण अभाव, कालची वर्क ऑर्डर आज मिळते व आजची उद्या त्यामुळे "सुपरवायझर" ची दररोजची डोकेदुखी म्हणजे कोणत्या मशीनवर कोणते जॉब लावायचे ? मटेरीयल आहे की नाही ? कामगारांना कोणते काम द्यावयाचे ? मशिन व टूल ले आऊट आहे की नाही ? पण हे एवढ्यावरच संपत नाही तर असेंब्लीलाईन चालू ठेवण्यासाठी या खात्यातील उत्पादनाची जरुरी असली तर त्याची पाचावर धारण बसलीच समजा. मग हातातोंडाची गठी घालण्यासाठी एका मशीनवर ३–३ सेटींग करा, ओव्हर टाईम करा, काय वाटेल ते करा ! या मूलभूत अकार्यक्षमतेवर पांघरूण घालण्यासाठी शेवटी खाते प्रमुख व खाते प्रमुखांचे प्रमुख "भारी" सुपरवायझरच्या नादाला न लागता आपल्या आवाक्यातील सुपरवायझरलाच दम देण्याचे "पवित्र" कार्य करतात. बिचारा सुपरवायझर ज्या गोष्टीला जबाबदार नाही त्याला हा "सुकामेवा" अकार्यक्षम साहेबाचा साहेबपणा टिकवण्यासाठी निमूटपणे खावा लागतो. त्यातल्या त्यात एखाद्या सुपरवायझरने सत्तेला धरून बोलण्याचा प्रयत्न केला तर शंभरी भरलीच.

दोन दगडांची चक्की

'सुपरवायझर'चे हाल एवढ्यावरच संपत नाहीत. अकार्यक्षम व्यवस्थापन, अकार्यक्षम–अप्रमाणिक, खुर्चीलोलुप अधिकारीवर्ग यांचा जसा रगडा या 'सुपरवायझर'ला सहन करावा लागतो, त्याचप्रमाणे कंपनी व संबंधित अधिकारी यांच्या अकार्यक्षम कार्यपद्धतीमुळे निर्माण झालेल्या गुंडप्रवृत्तीकडूनदेखील त्याला

शाब्दिकच नव्हे तर शारीरिक ठोसे खाण्याची पाळी येते. बहुसंख्य प्रामाणिक व संयमशील कामगारांकडून त्याला उत्पादनवाढीमध्ये सहकार्य मिळणार नाही त्याप्रमाणे त्याला त्रासपण होणार नाही. पण जी गुंड प्रवृत्ती कमी होण्याऐवजी प्रीमियरमध्ये दिवसेंदिवस बळावत चालली आहे त्यामुळे प्रामाणिक व संयमशील कामगारच नव्हे तर सुपरवायझर व अधिकारी वर्ग यांना पण मारहाण व धोक्याच्या वातावरणात दिवस काढावे लागत आहेत. याबाबत खातेप्रमुखांचे प्रमुख धोरण शरणागतीचे दिसते.

कारखान्याच्या आवारांत इन्शुरन्स, चिवडा, चहा, इडली, डोसा, समोसा यांची खात्याखात्यातून जोरात विक्री होते. खुद्द बाबुराबांचा प्यून चहाचा धंदा करण्यात गुंग असतो व बाबुरावदेखील मिटक्या मारीत पितात. स्वतःच वाहात्या गंगेत हात धुऊन घेण्यात गुंतलेल्या अधिकारीवर्गाला याबाबत विरुद्ध बोलण्याची तरी हिंमत होईल का ? काही ठिकाणी कंपनीच्या मालातून तयार झालेल्या व्यायामाच्या साधनांतून व्यायामाचे ' वर्ग ' चालतात. आणि हे सर्व खाते प्रमुख व खाते प्रमुखांचे प्रमुख उघड्या डोळ्यांनी बघतात. "दादा" मंडळीस खूष करण्यासाठी सुपरवायझरनाच दमबाजी करतात. नोकरी जाण्याची टांगती तलवार नेहमी त्याच्या डोक्यावर असतेच पण त्याशिवाय प्रसंगी कामगारांशी वाद झाल्यास त्यांचा बडगा मिळण्याची भीती असते. आजचा कारखान्यांतील सुपरवायझर अकार्यक्षम वरिष्ठ व गुंडप्रवृत्तीचे कामगार म्होरके या दोन दगडांनी बनलेल्या चक्कीत चांगलाच भरडून निघत आहे. त्याच्यावर शिस्तपालन, उत्पादन, रेकॉर्डस् ठेवणे व धंद्याची नाडी कशी आहे याची नोंद ठेवणे इत्यादी जबाबदाऱ्या आहेत त्यांची ही स्थिती. मग पुढे प्रगतीची अपेक्षा तरी कशी धरावी ?

वेळोवेळी दमबाजी करणारे खातेप्रमुख व त्यांचे प्रमुख स्वतःच्या अगर कंपनीच्या गाडयांतून जातात येतात. शिवाय पुंडांच्या चाळ्यांकडे दुर्लक्ष केल्याने त्यांना अनायसेचे पुरेसे संरक्षण मिळते. पण " सुपरवायझर "ला जरी एकाद्या दादाने ठोकले तरी त्याची दाद कोणी घेते का ? पोलीस स्टेशनचे कधीही तोंड न बघितलेल्या अशा माणसाला आमचे तथाकथित सेक्युरिटी डीपार्टमेंटचे ऐतखाऊ अधिकारी साधी माणुसकीदेखील दाखवीत नाहीत, मार्गदर्शन तर दूरच राहो. अकार्यक्षम, अप्रामाणिक कामगार व अधिकारी यांचीच चलती होऊ लागल्यामुळे हुषार इंजिनिअर्स एक तर निष्क्रिय होऊ लागलेत अगर प्रीमीयरला रामराम ठोकू लागले आहेत, हे काय प्रगतीचे निदर्शक आहे का ?

सावळागोंधळात प्रीमियर

आजकालचे उद्योगधंदे हे चालक चालवितात. भांडवल, मशिनरी इत्यादी

साधने व मजूर आदि एकत्र करून उत्पादनाची बांधणी करण्याचे काम चालक वर्ग करीत असतो. पण स्वत: चालकवर्गच कार्यक्षम नसेल, जर मालकवर्गानी नेमलेले अधिकारीच चालकांशी व उद्योगधंद्याशी प्रतारणा करीत असतील तर त्या उद्योगधंद्याची कदापिही प्रगती होणार नाही. याबाबत कामगारांना व त्यांच्या संघटनाना दोष देण्याने उद्योगधंदा प्रगती करू शकणार नाही. कारखाने व उद्योग यांच्या अर्थव्यवस्थेत कामगार हा महत्त्वाचा पण शेवटचा घटक आहे. कामगारांना कार्यक्षम बनविण्यापूर्वी ज्याच्यावर आज देशाच्या आर्थिक उत्क्रांतीची धुरा आहे त्या चालकवर्गाने स्वत: कार्यक्षम बनले पाहिजे व कार्यक्षम असा कार्य करणारा संच निर्माण केला पाहिजे. प्रीमियरबाबत शेअरबाजारातून, कामगारांकडून अगर कोठूनही समाधानाचे अभिप्राय मिळत नाहीत. ज्या इंजिनिअरने २५–३० वर्षे सरकारी कारखान्यातून काम केले आहे तो प्रीमियरमध्ये जेव्हा आला तेव्हा असे उद्‌गार काढले की, सरकारी कारभारांतील सावळागोंधळ प्रसिद्ध आहे, पण त्यापेक्षा अधिक सावळागोंधळ म्हणजे प्रीमियर होय !

वरिष्ठ चालकवर्गाला या गोष्टीची जाणीव नाही म्हणून हे असे चालले आहे का ? वरिष्ठ चालकवर्गाला खरोखर या मोटारधंद्याची योग्य रीतीने वाढ व प्रगती व्हावी याची तळमळ आहे का ?

तसे काही असेल तर ते त्यांच्या शब्दात नव्हे तर कृतीत दिसले पाहिजे. अधिकारीवर्गाची खोगीरभरती, शेकडो रुपये पगार घेऊन नंबर टेकरचे किंवा मुकादमाचे काम करणारा, गुंड प्रवृत्तीना कुरवाळणारा व कर्तव्यच्युत असा अधिकारीवर्ग यांवर अगोदर नियंत्रण आले पाहिजे. यांना मोकाट सोडून कामगारांना शिस्तीचे व संयमाचे धडे देऊन प्रीमियरमधला सावळागोंधळ कमी होणार नाही. प्रीमियरमध्ये काम करणाऱ्या प्रत्येकाचे जीवन व प्रगती कंपनीच्या प्रगतीवर अवलंबून आहे. प्रत्येक प्रामाणिक व संयमशील कामगाराला आपल्या जीवनात आर्थिक व मानसिक स्थैर्य लाभावे याची आच आहे. तो धडाडीने काम करण्यास समर्थ आहे त्याला फक्त हवी ती एक संजीवनी, सत्य व मेहनत यांचाच विजय होईल याची खात्री आणि विश्वास ! चालकवर्गावरच्या वरील प्रकाराच्या सावळागोंधळामुळे कामगारांचा जो विश्वास उडाला आहे तो पुन्हा प्रस्थापित करण्याची जबाबदारी चालकांची आहे. जोपर्यंत या मार्गाने प्रयत्न होणार नाहीत तोपर्यंत " प्रगति " शब्दात राहील, कृतीत येणार नाही.

(प्रीमियर कामगार पत्रिका)

अशाने प्रगती होईल काय ? : २

ओव्हर टाईमचे शेकडो रुपये मिळविणाऱ्या अनेक कामगारबंधूंना या विषयावरचे हे विचार वाचून राग येईल. पण जे कामगार आपल्या दिवसाच्या कामाच्या वेळात योग्य काम करूनही ज्यांचे काम पूर्ण होत नाही व म्हणून त्यांना ओव्हरटाईम मिळत असेल तर त्यांनी रागावण्याचे मुळीच कारण नाही. पण नेहमीच्या कामाच्या वेळात आपले काम न करता टंगळमंगळ करून ओव्हर टाईम मिळविणाऱ्या कामगारबंधूंचा राग सहन करूनही काही विचार मांडणे जरूर आहे. कामाच्या वेळात कामचोरपणा करून ओव्हर टाईम मिळविणारे कामगार व त्यांचे म्होरके, आणि कंपनीच्या नफा तोटा पत्रकांत आंकडयांची करामत करून व अन्य व्यवहारात लफडेबाजी करून नफा मिळवू पाहाणारे मालक या दोघांना कष्टकरी कामगारांनी एकच मानले तर ते चूक ठरणार नाही. मालकांच्या दोषांवर अंकुश ठेवण्याचा अधिकार कामगारांना प्राप्त

करावयाचा असेल तर प्रथम आपले काम चोख ठेवायला नको काय ?

खिशाला तोशीस का ?

आज प्रीमियरमधील सुमारे नऊ हजार लोकांपैकी तीन–चारशे लोकांना भरमसाट ओव्हरटाईम मिळत असेल आणि यापैकी फारतर शे–पन्नास लोकच आपले दिवसाचे काम योग्य तऱ्हेने पार पाडत असूनही केवळ नाइलाजास्तव त्यांना ओव्हर टाईम करावा लागत असेल ! म्हणजेच किमान दोन–तीनशे लोकांना अनावश्यक ओव्हरटाईम दिला जातो व यापैकीही अनेक लोक वेळेपूर्वीच निघून जातात वगैरे वस्तुस्थिती कामगारांना माहीत आहे व ते अनेक कामगार मान्य करतात. कंपनी हे कसे चालू देते याबद्दल आमच्यासारख्यासमोर आश्चर्यही व्यक्त करतात. अधिकारीवर्ग व चालकांनी या प्रश्नात लक्ष घालायला पाहिजे पण दुर्दैवाने ते आपले कर्तव्य पार पाडत नसल्यामुळे कष्टकरी व सच्छील कामगारांनीच या कामांत लक्ष घालणे जरुर आहे. ओव्हरटाइम अनावश्यक असेल, जर कामाच्या नेहमीच्या वेळातच ते काम होऊ शकणारे असेल तर या तीन–चारशे लोकांच्या ओव्हरटाइमसाठीं दरमहा हजारो रुपये होणारा पगार, खर्च करणे म्हणजे नऊ हजारपैकी अन्य साडे-आठ हजार कामगारांच्या हक्काचा पैसा या कामचुकार लोकांना दिल्यासारखे होणार नाही काय ? कारण ओव्हर टाइम पगारासाठी वर्षाकाठी खर्च होणारे काही पाच-सहा लाख रुपये नफा-तोटा पत्रकांत पगार खात्याला खर्च पडून तेवढा नफा कमी दिसणार व त्या कमी झालेल्या नफ्यावर कामगारांना मिळणारा दोन-तीन लाखांचा बोनस म्हणजे किमान एखाद्या आठवड्याचा बोनस प्रत्येकी जाणार असे म्हणण्यास हरकत नाही. तेव्हा ज्याच्यावर सर्व नऊ हजार कामगारांचा हक्क पोहोचतो असे पैसे कामचुकार अशा दोन-चारशे लोकांना मिळणे योग्य आहे काय ?

शेअर होल्डर व सरकारची जबाबदारी

वास्तविक चर्चिलेल्या या अशा कारभारातील अनेक गोष्टीकडे कंपनीचे शेअर होल्डर्स (भागीदार) व सरकारचे लक्ष पाहिजे. पण शेअर होल्डर्स देशभर विखुरलेले आहेत ते संघटितही नाहीत. शिवाय त्यांचे प्रपंच प्रीमियर अगर अशाच एखाद्याच कारखान्यावर अवलंबून नाहीत म्हणून त्यांचे लक्ष इकडे नसणार. पण ज्या आम्हा कामगारांचे जीवन या अगर अशाच स्वरूपाच्या कारखान्यावर आहे त्यांनी या गोष्टीकडे लक्ष देऊन आपल्या विशिष्ट मर्यादेत का होईना विधायक प्रयत्न करायला नको काय ? सरकारचेही मोठ्या उद्योग-धंद्यातील बेशिस्तीकडे लक्ष असायला हवे, पण सरकारी मालकीच्या उद्योग

धंद्यातील गोंधळाच्या मानाने खासगी धंद्यातील गोंधळ बराच कमी असल्यामुळे सरकारला खासगी कारखानदारांवर अंकुश ठेवायला तोंडच नाही आणि म्हणूनच सरकार अनेकवेळा अनेक अनावश्यक सवलती मोठ्या कारखानदारांना देत असलेले आढळून येते.

देशातील सरकारी व खासगी मालकीच्या प्रचंड कारखान्यातून लाखोच नव्हे तर कोटयवधी रुपयांच्या श्रमसंपत्तीचा, तांत्रिक ज्ञान संपत्तीचा, साधन-संपत्तीचा अशा तऱ्हेने अपव्यय चालल्याचे जाणत्यांकडून ऐकण्यास मिळते व अगदी क्वचितच थोडेसे वाचण्यास मिळते. जनतेच्या पैशाच्या अपव्ययाची खंडप्राय: देशात पसरलेल्या कोटयवधी जनतेला तितकीशी माहिती नाही. सरकारातील फारच थोड्या वरिष्ठांना खाली प्रत्यक्ष काय चालले आहे याची माहिती आहे. त्यातल्या फारच थोड्यांना त्याबद्दल हळहळ व कळकळ आहे. अशा परिस्थितीत या मोठ्या उद्योगधंद्यात काम करणाऱ्या कामगारांनीच या प्रश्नाकडे जनतेचे व त्या जनतेचे विधानसभेतील आणि लोकसभेतील प्रतिनिधींचे लक्ष खेचले पाहिजे.

हे असे किती दिवस चालायचे व चालू द्यायचे ? प्रीमियरपुरते बोलायचे झाल्यास उपद्रवी व कामचुकार लोकांना व स्वतःच्या पीट्ट्ना ओव्हर टाईम देणाऱ्या भेकड अधिकाऱ्यांविरूद्ध कष्टकरी कामगारांनी संघटित आवाज उठवून सर्व संबंधितांना त्याचा फायदा मिळवून दिला पाहिजे. उदाहरणार्थम टेरीयल हँडलिंगमध्ये टेंपो, लँबेट्रा सारखी पाच सहा लहान वाहाने असताना व त्याचे डायव्हर्स असताना एकाच व्यक्तीला महिन्यानुभहिने ओव्हर टाईम का ? प्रॉ. शाफ्टमध्ये एका विशिष्ट जॉबचे दिवसाला एकशे वीस प्रॉडक्शन देणाऱ्या कमी पगाराच्या माणसाला ओव्हर टाइम न देता त्याच जॉबचे दिवसाला केवळ ६० प्रॉडक्शन देणाऱ्या भारी पगाराच्या माणसालाच सतत ओव्हरटाईम का ? आणि हे असे का म्हणून असे असोसिएशनच्या प्रतिनिधीने संबंधित अधिकाऱ्यास विचारताच त्यांत बदल करण्याचे आश्वासन देऊन पुढे तो ओव्हर टाईमच बंद करण्यांत आला याचा अर्थ तो ओव्हर टाईम जरूर नसतानाच देण्यात येत होता असा होत नाही काय ? हेल्पर, मजदूरकडून प्रॉडक्शन घ्यायचे व ओव्हर टाईमला भारी भारी पगाराच्या माणसाला ठेवायचे असा अजब कारभार आमच्या कारखान्यात चालतो. याला कामगारांनी संघटित विरोध केला पाहिजे व भारी पगाराच्या बांधवांनीही आपल्या आजूबाजूच्या कमी पगारात काम करणाऱ्या बंधूंना न्याय देणे जरूर आहे.

(प्रीमियर कामगार पत्रिका)

इंदिरा विचाराला आचाराची साथ हवी !

गेल्या अंकी पंतप्रधान इंदिरा गांधी यांचे इंटक रौप्य महोत्सव प्रसंगीचे संपूर्ण भाषण प्रसिद्ध केले होते. इंदिराजींच्या त्या भाषणातील काही मुद्दे यापूर्वी माजी मजूर मंत्री व काँग्रेस सीशॅलिस्ट फोरमचे एक आद्य प्रवर्तक माननीय गुलजारीलाल नंदा, स्व. गं. द. आंबेकर, कै. सोमनाथ दवे अशा अनेक ज्येष्ठ नेत्यांनी व खुद्द इंदिरा गांधी यांनी यमुना नगर (पंजाब) येथील इंटकच्या अधिवेशनाचे उद्घाटन करताना मांडले आहेत. मा. नंदाजींनी १९५९ साली जमशेदपूर येथे इंटकच्या जनरल कौन्सिलच्या बैठकीच्यावेळी तर अतिशय विस्ताराने या काही मुद्यांवर विचार मांडले होते. इंटकच्या अनेक नेत्यांनी राजकीय हेतूंवर व लोकप्रियतेकडे लक्ष न ठेवता या देशातील कामगार चळवळ या देशाचे भवितव्य उज्ज्वल घडविणाच्या कार्यातील महत्वाचा घटक आहे हे लक्षांत घेऊन निस्पृहपणे काम केले. पण ज्या काँग्रेसचे राजकीय नेतृत्व इंटक मानत होती त्या

काँग्रेसच्या बहुसंख्य नेत्यांनी या उच्च विचाराला पोषक अशी भूमिका न घता पक्षीय अगर वैयक्तिक राजकीय हेतूंना तात्कालिक कामाला पोषक ठरेल अशी सोईची भूमिका घेतली. त्यामुळे इंटकच्या ध्येयवादी नेतृत्वाची फार कुचंबणा झाली असे म्हणणे गैर ठरणार नाही. त्याचप्रमाणे उद्योगधंदे, जीवनावश्यक वस्तूंचा व्यापार व अन्य आर्थिक केंद्रे यावरील धनिक वर्गाचे प्रभुत्व कमी करण्यासाठीही खंबीर धोरण काँग्रेसकडून स्वीकारले गेले नाही. या दोन गोष्टींशिवाय समन्वय-वादाच्या धोरणाच्या नावाखाली धनिकांना पोषक अशी भूमिका घेणारी भोंदू मंडळीही इंटकमध्ये ठिकठिकणी ठाण मांडून बसली होती. यामुळे इंटक व काँग्रेस या दोन्ही संघटनेतील समाजवादी वृत्तीच्या नेत्यांच्या तळमळीचा व प्रामाणिक-पणाचा प्रत्यय कामगारवर्गाला येणे अशक्य होते. इंटक कामगारहितासाठी प्रयत्नशील आहे असे कामगारवर्गाला वाटतच नव्हते. त्यामुळे राष्ट्रउभारणीच्या कामात अगर आर्थिक विषमता कमी करण्याच्या राष्ट्रीय कार्यात काँग्रेस, इंटक व शासन यांना कामगारवर्गाचे उत्स्फूर्त सहकार्य मिळू शकले नाही.

जनतेला कार्यप्रवण करा

इंटक नेत्याप्रमाणे हिंद मजदूर सभेसारख्या डाव्या समजल्या जाणाऱ्या संघटनेचेही ज्येष्ठ नेते कामगारांना राष्ट्रीय हिताची व जबाबदारीची जाणीव देऊ इच्छित होते. पण मा. नंदाजी, कै. आंबेकर अगर कै. सोमनाथ दवे यांच्याप्रमाणे तो विचार प्रत्यक्ष कामगारात रुजविण्यासाठी ते हिरीरीने प्रयत्नशील होते असे म्हणता येणार नाही. हिंद मजदूर सभेच्या नेतृत्वाखालील इंजिनीयरींग मजदूर सभेचे तत्कालीन अध्यक्ष माननीय अशोक मेहता यांनी १९५८ च्या मे महिन्यात एका लेखात, अविकसित राष्ट्रातील कामगारांनी आपण होऊन आपल्या मागण्यांवर निर्बंध घालून घेतले पाहिजेत असे प्रतिपादन केले होते. पण हेच विचार त्याचवेळी आपल्याच संघटनेच्या नेतृत्वाखाली संपावर असलेल्या प्रीमियर कामगारांसमोर येऊन मांडण्याचे धैर्य त्यांनी दाखविले नाही. इंटक आणि काँग्रेसमधल्या काही व्यवहारी नेत्यांचे व्यवहारी धोरणच मा. अशोक मेहतांनी त्यावेळी स्वीकारले असे दिसते.

इंटक, काँग्रेस व शासन यांच्यातील तळमळीच्या लोकांनाही कामगारवर्गाचे जनतेचे सहकार्य गतकाळात मिळाले नसले तरी आता मात्र ती संधी आली आहे. इंदिरा गांधी यांनी अनेक धडाडीचे निर्णय घेऊन देशाची अर्थव्यवस्था समाजा-भिमुख करण्याचे धोरण स्वीकारल्यामुळे इंदिराजींच्या शब्दाला आज देशात असामान्य असे महत्त्व प्राप्त झाले आहे. त्या जे सांगतील व करतील त्यामध्ये

या देशातील गरिबांचे व श्रमिकांचे हित असणारच अशी धारणा या देशातील गोरगरीब जनतेची झाली आहे. आणि त्यामुळेच इंदिरा गांधी यांनी दिनांक ३ मे १९७२ रोजीच्या भाषणात उहापोह केलेल्या मुद्यांपैकी अनेक मुद्दे यापूर्वी अन्य नेत्यांनी सांगितले असले तरी आज ते इंदिरा गांधी यांनी सांगितल्यामुळे त्याला वेगळे महत्त्व आहे. अशा या अनुकूल परिस्थितीचा उपयोग करून घेऊन देश उभारणीच्या व गरिबी हटविण्याच्या इंदिराजींच्या धोरणाला यशाप्रत नेण्यासाठी इंदिरानुयायी आमदार खासदारांनी इंदिराजींच्या विचाराला आचाराने साथ देऊन कार्यकर्त्यांना व जनतेला कार्यप्रवण करण्यासाठी प्रयत्नांची शर्थ केली पाहिजे.

कामगार चळवळ स्वार्थी बनली

ज्येष्ठ समाजवादी नेते खासदार नानासाहेब गोरे यांनीही अलिकडे मालक व मजदूर यांच्यातील प्रश्नांचा विचार करतांना संबंधित कामगारांपेक्षाही निकृष्ट जीवन जगणाऱ्या कोटचवधी जनतेवर त्याचा काय परिणाम होईल याचा विचार झाला पाहिजे असे विचार अनेक प्रसंगी व्यक्त केले आहेत.

कामगार चळवळ आता स्वार्थी बनली आहे असा अभिप्राय अलिकडेच काँग्रेस प्रवेश केलेल्या एका तडफदार साथीनीही कार्यकर्त्यांच्या सभेत व्यक्त केला. मुंबई प्रदेश काँग्रेसच्या लेबर सेलचे चिटणीस ज्येष्ठ कामगार नेते व आयुष्यभर डाव्या कामगार चळवळीत काम केलेले कार्यकर्ते श्री. जी. एच. काळे यांनीही हक्काबरोबर कर्तव्याची जाणीव निर्माण करण्याची आवश्यकता प्रतिपादिली आहे. याचाच अर्थ असा की कामगार संघटनांतील स्पर्धा टाळून इंदिराजींनी आशा प्रगट केल्याप्रमाणे इंटक आणि मध्यवर्ती संघटनांना आपसातील वादाचे मुद्दे निकालात काढून औद्योगिक संबंधाचा सुदृढ पाया घालण्यास आज अनुकूल परिस्थिती आहे.

नवे भोंदू आणि काँग्रेस

पण ज्याप्रमाणे पूर्वीच्या काँग्रेस व इंटकमध्ये तोंडाने कामगार कळकळ दाखवित असताना मालकवर्गाच्या हितरक्षणाची काळजी करणारे भोंदू होते त्याप्रमाणे पण वेगळचा प्रकारचे भोंदू इंदिरा गांधीच्या काँग्रेसमध्येसुद्धा निर्माण झाले आहेत. देशहिताची तळमळ, गरिबांची कळकळ, त्याना बेताचीच आहे. इंदिरा नेतृत्व व काँग्रेस संघटना बळकट करणेही त्यांना फारसे महत्त्वाचे वाटत नाही. आपल्या राजकीय उलाढालीच्या खर्चासाठी एखादा शेटजी, संचालक त्यांना हाताशी हवा असतो व शेटजीलाही असा राजकीय दलाल हवा असतो, चार

कारखान्यातील कार्यकर्ते व कामगार आपल्या मागे फिरायला असावेत, चार लोकांना नोकऱ्या लावल्या म्हणजे चाळीस लोक मागे फिरतात. हे सर्व साधण्यासाठी कामगारहित ओठात व मालकाचा मलिदा पोटात घेऊन येत्या पाच, सात, दहा वर्षात सत्ता, मत्ता अगदी काहीच न जमल्यास निदान लोकप्रियता मिळविण्यासाठी जेवढे समाजवादी नाटक व पुरोगामित्वाची सर्कस करणे जरूर आहे तेवढी करून फारच जरूर वाटल्यास ढोल बडवून गर्दी जमवून मोर्चा, निदर्शने, धरणे हे डोंबारी खेळही करू पहाणारे नवे भोंदू इंदिरा गांधींच्या काँग्रेसमध्ये निर्माण झाले आहेत हे सत्यशोधकी काँग्रेसवाल्यांनी आता जाणले पाहिजे. इंदिराजींनाही या लोकांपासून सावध करण्यासाठी प्रयत्नशील राहिले पाहिजे.

(नागरिक मित्र : ५–८–१९७२)

१४ व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त काही विचार

आपला देश १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वतंत्र झाला. देशात सर्वत्र आनंद झाला. कारण परकीय सत्तेखाली आमची कुचंबणा होत होती. आपल्या देशातली संपत्ती लुटून ती परदेशी जात होती. हे सर्व थांबून आमचा देश म्हणजेच येथील जनता सुखी होणार असे मानत होते. अपेक्षेप्रमाणे देशाच्या जीवनमानात बरीच सुधारणा होत निघाली असली तरी सर्वसाधारणपणे असमाधान व्यक्त होत आहे. पण या परिस्थितीला आपण सर्व देशबांधवच कमी-अधिक प्रमाणात जबाबदार आहोत याचा आपण या क्षणी तीव्रतेने विचार केला पाहिजे.

आपण आपल्या घरचाच विचार करू या. जर आपण आपली प्राप्ती काय आहे याचा विचार करून काटकसरीने घरच्या सर्व लोकांना तीच सवय लावून शिस्तबद्ध वागू लागलो व आपल्या वेळातून उरलेल्या वेळात काही कमाईचे

साधन शोधून थोडे अधिक कष्ट करावयाचे ठरविले तर आपली बचत वाढून आपण आपला भविष्यकाळ काही प्रमाणात का होईना सुखासमाधानाचा निर्मू शकू. पण आपल्या कमाईचा विचार न करता शेजाऱ्यापाजाऱ्यांकडे पाहून कपडे, खाणे, पिणे, सिनेमा व इतर गोष्टीत पैसा खर्च करू लागलो तर बचत तर राहोच पण कमाई व खर्च यांची तोंडमिळवणी होणार नाही व आपण नेहमीच अडचणीत राहू. अशाच परिस्थितीत घरी कोणी आजारी पडल्यास अगर अन्य अडचणी निर्माण झाल्यास कोठूनही मदत मिळाली नाही तर आपली परिस्थिती केविलवाणी होते व असे झाले की, आपल्यापैकी कोणी मदत न करणाऱ्या शेजाऱ्या-पाजाऱ्यांना तर कोणी देवाला तर कोणी सरकारला दोष देतो.

आपल्या निष्काळजीपणामुळे निर्माण झालेल्या अडचणींचा दोष शेजाऱ्या-पाजाऱ्याना, दैवाला अगर आपणच मते देऊन निर्माण केलेल्या सरकारला देऊन उपयोग काय ? आपल्याकडे पूर्वी म्हण होती कीं " जसा राजा तशी प्रजा " पण आजचा राज्यकारभार चालविणारे पूर्वीच्या राजाप्रमाणे वंशपरंपरागत राजे नसून आपल्यामधून आपणच निवडून दिलेले लोक आहेत. यामुळे " जशी प्रजा, तसा राजा " अशी उलट परिस्थिती आहे.

सवलतींच्या मागे लागू नका


आपण आपल्या घराप्रमाणेच आपल्या देशाचा विचार केला पाहिजे. आपला देश गरीब आहे. आपल्या देशात जी शेती, खाणी, कारखाने वगैरे साधनसंपत्ती आहे तिचा जास्तीत जास्त पण योग्य उपयोग करून धान्य, कापड व इतर गरजेच्या वस्तूंचे उत्पादन वाढविले पाहिजे व त्यांचा उपयोग करून, बचत करून उपयोग केला पाहिजे. हे सर्व होण्यासाठी देशातील तमाम जनतेला आणखी काही वर्षे मोठ्या प्रमाणात कष्ट केले पाहिजेत. पण प्रत्यक्षात काय चालले आहे ? स्वातंत्र्यानंतर कमी काम व जास्त दाम हीच प्रवृत्ती सगळीकडे वाढली आहे व सवंग लोकप्रियता मिळवण्यासाठी आमच्या नेत्यांनी ती वाढविली आहे असे म्हटले तर चूक ठरणार नाही. जर आपण जास्त निर्माण केले नाही तर आपल्याला जास्त मिळणार कोठून ?

अमेरिकेतील कामगार स्वतःची मोटार ठेवू शकतो. रशियातील कामगार रिफ्रिजिएटर वापरतो वगैरे गोष्टी आपण त्या देशाच्या प्रचारपत्रांतून वाचतो. पण त्यांच्या राहणीचा दर्जा एवढा वाढविण्यासाठी त्यांनी सुरवातीच्या काही वर्षात किती कष्ट उपसले आहेत ! गेल्या महायुद्धात युरोपातील अनेक राष्ट्रांचे

जीवन उध्वस्त झाले. ते त्यांनी गेल्या पंधरा वर्षांत उभे करण्यासाठी किती निकराचे प्रयत्न केले व आज सर्व स्थिरस्थावर झाल्यावरही राष्ट्रासाठी किती नेकीने व शिस्तबद्ध ते वागतात याचा मात्र आपण विचार करीत नाही. म्हणूनच सुरवातीला म्हटल्याप्रमाणे आपण आपली कमाई पाहून खर्च केला पाहिजे. शेजाऱ्याकडे पाहून वागता कामा नये. त्याचप्रमाणे आज रशिया व अमेरिका यासारख्या प्रगत देशातील जनतेच्या रहाणीकडे पाहून भागणार नाही तर त्या दर्जाला येण्यासाठी त्यांनी गतकालात किती भगीरथ प्रयत्न केले व आजही ते किती उद्योगशील व शिस्तबद्ध वागतात याचा विचार करणे जरूर आहे. आजच्या परिस्थितीची तुलना करायची झाल्यास आपण चीनकडे पाहणे जरूर आहे. तेथील जनता देश उभारणीसाठी उभ्या उभ्या भाकर खाऊन अत्यंत काटकसरीने वागून अपार कष्ट उपशीत आहे. आपण मात्र स्वातंत्र्य मिळाल्या दिवसापासून सवलतींच्या मागे लागलो आहोत.

वेळ गेली नाही तोपर्यंतच आपण सावरून घेतले नाही व देशाच्या उन्नतीसाठी शिस्तबद्ध कामाला न लागता केवळ सवलतींच्या मागे लागू व परिस्थितीला व सरकारला दोष देत बसू तर पस्तावण्याची पाळी येईल.

(प्रीमियर कामगार : ५-८-१९६१)



प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने

दि. २६ जानेवारी १९५० रोजी आपल्या देशाची नवी घटना अंमलात आली असली तरी आपला देश १५ ऑगस्ट १९४७ साली स्वतंत्र झाला. त्यास १६ वर्षे झाली. या १६ वर्षात निरनिराळ्या क्षेत्रात प्रगती झाली असली तरी या देशातील बहुसंख्य जनतेच्या अडीअडचणी अपेक्षेप्रमाणे कमी झाल्या नाहीत. देशाच्या श्रेष्ठ नेत्यांनी, व तज्ञांनी या देशाच्या विकासाच्या दृष्टीने पंचवार्षीक योजना आखल्या पण त्या योजना राबवून जनतेपर्यंत पोहचविणाऱ्या निष्ठावान कार्यकर्त्यांचा अभाव सर्व पक्षांकडे आहे. सत्ताधारी पक्षाकडेही फारच थोडे असे कार्यकर्ते आहेत. पण एखादे कार्य शिरावर घेऊन करीत राहाणाऱ्या कार्यकर्त्यांना व नेत्यांना सत्तेवरील नेत्यांकडे वरचेवर जा ये करण्यास अगर त्यांच्या जवळ असलेल्या गुणांचे गुणवर्णन करण्यास, त्यांचे सत्कार घडवून आणण्यास फारशी फुरसत नसते व काहीना ते योग्य वाटतही नसते. यामुळे सत्तेवरील फारच

थोडे वरिष्ठ त्यांच्या कार्यास हातभार लावण्यास पुढे येतात. त्यामुळे त्यांचा उत्साह ओसरून त्यांचे कार्य थंडावते. याउलट एखादे कार्य हाती घेवून निष्ठेने त्यात लक्ष घालून ते यशस्वी करून त्याचा लाभ जनतेला देण्याऐवजी, वरचेवर सत्तेवरील वरिष्ठांकडे जा ये करून त्यांचे सत्कार घडवून त्यांच्याजवळ असलेल्या व नसलेल्या गुणांचे वर्णन करणाऱ्यांचे सत्तेवरील बऱ्याच वरीष्ठांच्या सहानुभूतीच्या जोरावर मग हे कार्यकर्ते काम न करताच पुढारी अगर समाजसेवक म्हणून मिरवू लागतात. निरनिराळ्या संस्थेच्या पाट्या लावून सरकारी तिजोरीतला पैसा आणून आपली व आपल्या प्रभावळीची चरण्याची व्यवस्था करून ठेवतात. ही झाली सत्ताधारी पक्षांची अवस्था. विरोधी पक्ष तर घोषणा, मोर्चा, निदर्शने, परिषदा आणि निवेदने यांच्या पलिकडे जातच नाही.

जनतेचीच जबाबदारी

अशा या परिस्थितीला आळा घालण्याची जबाबदारी शेवटी जनतेवरच येते. केवळ सत्तेवरील श्रेष्ठींच्या मागेपुढे घोटाळणाऱ्या कार्याचा देखावा करणाऱ्या लोकांना स्थान न देता निष्ठेने वर्षानुवर्षे कार्य करणाऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहण्याची जनतेची तयारी दिसली म्हणजे सत्तेवरील वरिष्ठांना त्याचा विचार करावा लागेल. अन्यथा जनता याबाबत निष्काळजी राहील तर त्याचे परिणाम जनतेला भोगावे लागतील.

आम्ही कामगार काय करीत आहोत ?

देश स्वतंत्र झाल्यावर कामगारांचे हितरक्षण करणारे अनेक नवीन कायदे झाले. जुन्यात दुरुस्ती आली. दिवसाचे दहा तास कामाचे होते ते आठ झाले. नोकरीची शाश्वती नव्हती म्हणून ठराविक नोकरीनंतर कामगाराला कायम केले पाहिजे, असा कायदा झाला. आता नोकरीवरून कमी करण्यासाठी सबळ कारणे दाखवावी लागतात. 'बोनस' ही मालकाची मेहरबानी होती, तो हक्क झाला. प्रोव्हीडंट फंड, ग्रॅच्युइटी, हक्काची पगारी रजा, सुट्या, किमान वेतन कायदा वगैरे गोष्टी झाल्या. कामगारांसाठी मोठ्या प्रमाणात घरबांधणी काम चालू झाले. निरनिराळ्या उद्योगधंद्यातील पगारमान ठरविण्यासाठी वेजबोर्ड स्थापन झाले. कामगारांना मोठे लढे करून मिळू शकले नाही ते देश स्वतंत्र होताच आपल्या सरकारने कायदे करून कामगारांना दिले.

वरील सर्व गोष्टी कायद्याने उपलब्ध झाल्या पण आम्ही आमच्या व्यक्तिगत

अगर सामुदायिक प्रयत्नाने प्रगतीसाठी काही प्रयत्न करत आहोत काय ? असेल तर त्याचे प्रमाण काय आहे ? पूर्वी आपण भरपूर काम करीत होतो. आता ८ तासांचा दिवस झाल्यानंतर वाचलेले दोन तास आपण कोठे उपयोगात आणून प्रगती-साठी प्रयत्न करत आहोत काय ? का त्या झालेल्या ८ तासातही गप्पा मारून फिरून वेळ काढतो काय ? आपले प्रश्न समाजावून घेऊन सोडविण्यासाठी कामगार-शिक्षण योजनेचा फायदा घेऊ शकणार नाही काय ? धंदेशिक्षणाच्या मोफत व कमी फी च्या सरकारने उघडलेल्या शाळेचा उपयोग करून आपले ज्ञान अगर हुन्नर वाढविण्यासाठी आपण काही करू शकतो काय ? सहकारी मार्गाने छोटे उद्योग काढण्यास भांडवल, शिक्षण वगैरे सरकारी योजनांचा फायदा घेण्यासाठी आपण काही प्रयत्न करतो आहोत काय ? अर्थात हे करीत असतांना खूप अडचणी येणार. पण सामुदायिक व संघटित प्रयत्न झाले तर अडचणींवर मात करता येईल.

(प्रीमियर कामगार पत्रिका)

एस्. टी. संपाचे 'भांडवलदार' पुढारी

सुमारे दहा वर्षांपूर्वी मुंबई राज्यात प्रवासी मोटार वाहतुकीच्या राष्ट्रीयकरणास सुरवात होऊन आता जवळ जवळ सर्व प्रांतभर एस्. टी. च्या गाडया वाहातूक करीत आहेत. खासगी वाहातुकीत ज्या ड्रायव्हरला भत्त्यासह ७०–७५ रुपये पगार मिळत असे तोच ड्रायव्हर राष्ट्रीयकरण होताच दरमहा भत्त्यासह १०० रुपये मिळवू लागला. जो कंडक्टर क्लीनरचेही काम सांभाळून ५५–६० रुपये मिळवीत असे तोच ७०–७५ रुपये मिळवू लागला. प्रवासी मिळविण्याची खटपट करून व त्याची वास्तपुस्त ठेवून, प्रवासी मिळतील त्याप्रमाणात कमिशन घेणारा एजंट जाऊन प्रवासी मिळोत न मिळोत दरमहा ९० रु. पगार घेणारा कंट्रोलर आला. जे ड्रायव्हर, कंडक्टर सकाळी उठल्यापासून रात्री गाडी गॅरेजला लावीपर्यंत काम करीत असत ते आता तास मोजू लागले, याशिवाय खाजगी मालकीत सहसा नसलेली पगारी रजा, प्रॉव्हिडंट फंड, युनिफॉर्म,

नावसुद्धा माहीत नसलेला ओव्हरटाईम, प्रतिवर्षी वार्षिक पगार वाढ" या सर्व गोष्टींचा विचार केला तर पूर्वीपेक्षा काम पुष्कळ कमी व पगार नि इतर सवलती जास्त यामुळे जवळ जवळ पूर्वीच्यापेक्षा दुप्पटीहून अधिक खर्च आज मोटार वाहतुकीवर वाढला आहे. खासगी वाहातुकीत नियंत्रणात्मक कामासाठी अत्यंत अल्प खर्च येत असे तेथे आज भल्या पगाराचे अधिकारी एक लहान डेपोपासून मुख्य ऑफिसपर्यंत पसरलेले आहेत. त्याचप्रमाणे मोटार दुरुस्ती, खासगी मालकीत एखाद्या कारखान्यात केली असता ज्या कामास १०० रुपये पडले असते त्याच कामाचा राष्ट्रीयकरण झालेल्या एस. टी. च्या कारखान्यातील खर्च १५० रुपयापेक्षा कमी असणार नाही. वरील सर्व कामगारांच्या सुखसोयीसाठी ज्या प्रवासास १२ आणे अगर फार तर १४ आणे पडत त्याच प्रवासास राष्ट्रीयकरणाचा दिवस उजाडताच रुपये १–२ पडू लागले व नुकतीच त्यात काही वाढही झाली आहे, आणि अजून कामगारांच्या मागण्या वाढतच आहेत. त्यामुळे वाढ होण्याची भीती आहे.

बेशिस्त कामगार

ज्याच्यासाठी हे संप-पुढारी एवढा आक्रोश करीत आहेत त्यांच्यासाठी जनतेने एवढी झीज सोसूनही जनतेचे हाल कमी झाले असतील तर शपथ! खासगी वहातुकीत प्रवाशांना मिळणारी सहानुभूतीही नष्ट झालेली आहे. एखादा अडाणी शेतकरी मोटार स्टँडवर येऊन त्याला हवी असलेली मोटार किती वाजता आहे असे कंट्रोलरला विचारतो तर कंट्रोलर त्यावर खेकसून सांगतो की– 'तिकडे टाईम टेबल लावले आहे वाच.' उतारूंचे सामान चढविण्या–उतरविण्यास कंडक्टरने मदत करावी असे प्रत्येक बसमध्ये लिहून ठेवले आहे. पण कायद्यावर बोट ठेवून त्यांच्याकडून ते काम करून घेणारा एखादा प्रवासी भेटला तरच कंडक्टर त्या नियमाचे पालन करतो. एरवी एवढी तत्परता दाखवणारा कंडक्टर मिळणे कठीण. रस्त्याच्या कडेला तासतास तिष्ठत उभे असलेल्या प्रवाश्यांसाठी गाडीत जागा असूनही वेगात असलेली गाडी थांबविण्याची तसदी न घेणारे ड्रायव्हर तसेच तिकिटे कापायचा व पैशाची मोजदाद करायचा त्रास वाचविणारे कंडक्टरही सरसहा पाह्यला मिळतात. कारण प्रवाशी घ्या न घ्या त्यांचा पगार तेवढा प्रत्येक महिन्याला मिळणारच. त्याचप्रमाणे खाजगी वहातुकीत मोटारीची योग्य काळजी घेतली नाही तर मालक नोकरीवरून हाकलून देईल ही भीती असायची पण आता नोकरीबाबत भरपूर संरक्षण मिळाले असल्याने गाड्या व एकंदर मालमत्ता बेफिकीरपणे वापरण्याची वृत्ती भरमसाट वाढली

वाढली आहे. याची शेकडो उदाहरणे देता येतील. जर कामगारांच्या या बेजबाबदारी बद्दल व त्यांच्या दोषाबद्दल वरिष्ठांकडून उपाययोजना झाली तर कामगारांची संघटना करून त्यावर जगणारे पुढारी व संघटनांच्या जोरांवर स्वपक्षाची जाहीरातबाजी करणारे पुढारी या कामगारांना संरक्षण देण्यास उभे असतात. यामुळे कामगारांच्या बेशिस्त व बेजबाबदार वर्तणुकीविरुद्ध केलेली उपाय-योजना यशस्वी होत नाही. त्यामुळे विनाकारण कामगारांचा रोष का पत्करा अशी भावना सर्वच उद्योगधंद्यातल्या अधिकारी वर्गाची झाली आहे.

शेतकरी व सामान्य जनतेच्या खिशाला चाट

भारतीय जनतेचा पोशींदा जो शेतकरी त्याच्या कामाचे तास कमी झालेले नाहीत. अगर तो उत्पादित असलेल्या मालाच्या किंमतीत म्हणावी तशी वाढ झाली नाही. भरपूर मेहनत करूनही पावसापाण्यावर अवलंबून राहाणाऱ्या व वर्षातील अर्धाकाळ बेकारीत काढून अर्धनग्न, अर्धपोटी राहाणाऱ्या शेतकऱ्याच्या खिशाला चाट मारून ज्यांचे पगार आधीच वाढविले गेलेले आहेत व कामाचे तास कमी झालेले आहेत, त्यांचीच भरती करण्यासाठी संपाची घोषणा करणारे 'सोज्वळ पुढारी' पाहून देश स्वतंत्र होऊनही भारतीय जनतेचे दुर्दैव संपलेले दिसत नाही. शेतकऱ्यांच्या मतावर निवडून आलेले मंत्री, शेतकऱ्यांच्या खिशात हात घालून कामगारांच्या सुखसोयींकडे लक्ष देत आहेत– कारण संघटना शक्तीच्या जोरावर कामगार मोर्चे, निदर्शने, हरताळ, वगैरे प्रकारांनी सरकारला हादरे देऊ शकतात. व कमकुवत राजकीय पक्षांना कोणत्याही तऱ्हेचे भरीव कार्य न करता भडक घोषणा व भडक मागण्या यावर स्वतःच्या पक्षाकडे कामगारांना खेचून त्यांच्या वर्तमानपत्री प्रचारावर खेड्यातल्या लोकांपर्यंत जाहिरात पोहचवितात. शिवाय या संघटनांच्या पैशांवर पक्षाचे कार्यकर्ते जगू शकतात. आणि त्यांचे भांडवल करून आपले पुढारीपण टिकवितात. वर निवेदन केल्याप्रमाणे एस. टी. चा कारभार चालला असताना ज्याच्यासाठी लक्झरी बसेस ठेवल्या आहेत व ज्यांचा एस. टी. शी वर्षातून एकदाच महाबळेश्वर अगर पाचगणीला जाताना संबंध येतो अशा लोकांची शिफारस पत्रे घेवून व ती एस. टी. च्या मासिकातून छापून एस. टी, अधिकारी स्वगौरव करून घेत आहेत. व मंत्री विधीमंडळात कारभाराचे समर्थन करीत आहेत. बडया लोकांचे मुद्दाम मागवूनघेतलेले अभिप्राय छापण्यापलिकडे ज्या लाखो शेतकऱ्यांच्या सामान्य जनांच्या पैशावर एस. टी. चा कारभार चालतो, त्यांचा अभिप्राय काय आहे इकडे लोकांचे लक्ष नाही. आमच्या एस. टी. च्या अधिकाऱ्यांना विनंती आहे की, आमच्या कोल्हापूरच्या

स्टँडवर दोन तास कान टवकारून फिरा व तेथे कानावर पडणारे सामान्य जनाचे अभिप्राय काय आहेत ते ऐकून हिमत असेल तर तुमच्या रिव्हयूमध्ये छापा.

मोटारी तयार होणाऱ्या कारखान्यात काय चालले आहे !

मोटारी देशातच तयार करण्यास सुरवात करण्यापूर्वी सर्वसाधारणपणे १५००० रुपये पडत त्याच तऱ्हेच्या मोटारीला २२००० रुपये पडू लागले आहेत ज्याप्रमाणे एस. टी.चे दर वाढण्यास एस् .टी.चे कामगार व अधिकारी बऱ्याचशा प्रमाणात जबाबदार आहेत त्याचप्रमाणे या मोटारीच्या किमती वाढण्यास व त्याचा बोजा सामान्य माणसावर पडण्यास या कारखान्यात काम करणारे कामगार, अधिकारी व चालक यांनाही जबाबदार धरणे जरूर आहे. अर्थात एवढी वाढ केवळ उत्पादन खर्चामुळेच झाली आहे असा दावा करण्याचा हेतू नाही.

एस्. टी. कामगारांच्या संपाची घोषणा करणाऱ्या सोज्वळ पुढाऱ्याच्या अध्यक्षतेखाली मुंबईतील मोटारी तयार करणाऱ्या प्रीमियर ऑटोमोबाइल्स्च्या कामगारांवर संपाचा निर्णय लादला गेला. हा कामगारांच्या मागण्यांकरीता नव्हे. पण निव्वळ एका बेजबाबदार नेत्याच्या व त्याच्या सहकाऱ्याच्या उद्दाम वर्तणुकीमुळेच हा निर्णय घ्यावा लागला होता.

नेत्याच्या बेजबाबदारपणाची जाणीव असलेल्या कामगारांनी प्रस्तुत निवेदकाच्या सहीने खासदार गोरे, खासदार अशोक मेहता व आमदार एस्. एम्. जोशी यांना पत्रे लिहून सर्व परिस्थितीचे निवेदन केले. खासदार गोरे यांनी दिल्लीहून आपण चौकशी करीत असल्याचे कळविले व खासदार अशोक मेहतांनी दिल्लीहून येऊन परिस्थितीची जाणीव करून घेऊन काही तडजोड काढली पण या संप प्रकरणी सुरुवातीपासून संबंधित असलेल्या व त्यावेळी मुंबईत असलेल्या आमदार जोशींनी आपण कामगार पुढारी नाही असे म्हणत म्हणत खासदार मेहता सारख्या कामगार पुढाऱ्यांची तडजोड उधळून लावणाऱ्या प्रीमियर कामगारांच्या धटींगण नेत्याला पाठीशी घालून कामगारांना दीर्घकाळ कष्टात ठेवले. प्रीमियरच्या ५००० कामगारांचा प्रश्न ३½ महिने लोंबकळत ठेवणारे हे 'सोज्वळ पुढारी' आता मुंबईच्या लाखो गिरणी कामगारांचा प्रश्न सोडविण्यास सरसावले आहेत. इच्छेने असो अगर अनिच्छेने असो या पुढाऱ्याच्या पूर्णपणे पाठीशी राहाणाऱ्या ५००० कामगारांचा प्रश्न सोडवू न शकणारे पुढारी, राष्ट्रीय मिल मजूर संघ व कॉटन मजदूर सभा या सारख्या गिरणी कामगारात वजन असलेल्या संघटनांच्या पाठिंब्याशिवाय लाखो कामगारांचा प्रश्न कसा सोडवणार ? हे त्यांचे तेच जाणो.

कामगारांवर आपले वजन आहे व सर्व कामगार आपल्याच मागे आहेत असे जगाला भासविण्यासाठी व स्वप्रतिष्ठेसाठी प्रीमियरच्या नेत्यांनी झुंडशाहीच्या जोरावर कामगारांना कारखान्याच्या बाहेर बसविले व ज्याच्यावर शांततापूर्ण व सरळमार्गी नागरिकांना संरक्षण देण्याची जबाबदारी आहे त्यांनी निळे डगले अडकवलेली बुजगावणी कारखान्याच्या समोरच्या परिसरात उभी केली व सरळ मार्गी कामगारांना दहशतवाद्यांच्या हवाली केले. जर त्यावेळी थोडे पोलिसबळ वापरले असते तर सक्तीचा संप बारगळण्यास वेळ लागला नसता. पण असे करतांना कदाचित लाठीमार, अश्रूधूर व गोळीबार व्हायचा व मग सरकारची बदनामी होऊन पुढील निवडणुकीतील मतावर त्याचा परिणाम व्हायचा. याचा अर्थ विरोधी पक्षांनी व सत्ताधारी पक्षांनी आपल्या पक्ष स्वार्थासाठी कामगारांना दहशतवाद्यांच्या हवाली केले असे म्हटले तर वावगे होणार नाही.

कामगारांना त्याचे रास्त हक्क मिळाले पाहिजेत याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. पण राजेशाही, साम्राज्यशाही नष्ट होऊन लोकशाही आली आणि त्याचा फायदा घेऊन भांडवलशाहीला शिव्या देता देता झुंडशाही निर्माण होत आहे याची दखल वेळीच सर्व जबाबदार मंडळींनी घेणे जरूर आहे. कारण संपाचे भांडवल करणारे भांडवलदार पुढारी जबाबदार आहेत.

(शिवनेर : १५-२-१९५९)

मुंबईत महाराष्ट्र मागे का ?

संयुक्त महाराष्ट्र निर्माण झाला पण ज्या मुंबईसह संयुक्त महाराष्ट्रासाठी कांहींची आहुती पडली. जनता व नेत्यांनी कष्ट उपसले त्या मुंबईतील महाराष्ट्रीय जनतेची पीछेहाट थांबू शकली नाही. तर ती वाढत आहे हे स्पष्ट दिसत आहे. ज्याप्रमाणे केवळ स्वातंत्र्य मिळाल्याने आपण भारतीय सुखी होऊं शकणार नाही. तर मिळालेल्या स्वातंत्र्याचा उपयोग करून देश उभारणीसाठी निदान एका पिढीला तरी योजनापूर्वक कष्ट करावे लागतील तरच चालू पिढीच्या उतार काळात आणि नव्या भविष्यकाळात काहीसे समाधानाचे दिवस लाभू शकतील याची जाणीव जनतेला दिली गेली नव्हती. अगदी त्याचप्रमाणे केवळ मुंबई महाराष्ट्रात राहिल्याने महाराष्ट्रीयांना आपले जीवन सुखासमाधानाचे होऊं शकणार नाही तर त्यासाठी काही योजनापूर्वक प्रयत्नांची जरूर आहे याचा विचार कोणी जनतेला

दिला नाही व आजही तीच परिस्थिती आहे. परप्रांतीय भांडवलवाले भांडवलाच्या जोरावर व अन्य सामान्य लोक आपल्या कष्टाने मुंबईत स्थिरावत चालले आहेत, ओनरशिपचे ब्लॉक घेत आंहेत, सहकारी घरांचे मालक होत आहेत पण आमच्यापैंकी फारच थोड्यांना हौसिंग बोर्डाच्या घरापलिकडे जाता आले आहे.

एक वर्षापूर्वी साप्ताहिक 'शिवनेर' दशवार्षिक समारंभप्रसंगी ना. यशवंतराव चव्हाण यांनी या प्रश्नाचा विचार करण्यासाठी एक सूचना केली होती. हा प्रश्न सोडविण्यासाठी मुंबईतील सगळ्या समाजाच्या व पक्षांच्या प्रतिनिधींनी एकत्र बसले पाहिजे व एखादी सर्वसंमत योजना आखून कार्यक्रम निश्चित केला पाहिजे. पण ना. चव्हाणांच्या या सूचनेचा विचार करायला मुंबईतील नेत्यांना वेळ कोठे आहे? गिरणी कामगारांच्या बोनसचा विचार करायला प्रातिनिधिक कामगार संघ असताना त्यासाठी संप करायला सारी विरोधी मंडळी एकत्र आली व सरकार पक्षानेही त्यात हस्तक्षेप करून त्यांना मदत केली. पण 'झालाच पाहिजे' म्हणून एकत्र आलेल्या मंडळींनी महाराष्ट्रीयांच्या उन्नतीसाठी एकत्र येऊन विचार करून योजनापूर्वक काम करून सरकारला त्यात खेचण्याचे विधायक काम करण्याऐवजी गिरणी कामगारांचा बोनस व आमदार धुळपांनी आपल्या पक्षीय व वैयक्तिक कारणासाठी प्रतिष्ठेचा केलेला नॅशनल रेयॉनचा प्रश्न अशासाठी मुंबई बंदच्या घोषणा करण्यासाठी एकत्र आले. आपल्या उन्नतीसाठी स्वतः काही प्रयत्न न करता केवळ परप्रांतीयांना व भांडवलवाल्यांना दोष देऊन हा प्रश्न सुटणार नाही.

आमच्यात व्यापारी वृत्ती आहे का?

आज अशी जी आपली परिस्थिती झाली आहे ती कशामुळे झाली? आपले दोष कोणते? त्याचे निर्मूलन कसे करता येईल? आपल्यात कमतरता कोणती आहे? आम्ही खरोखरीच कष्टकरी आहोत का? आमच्यात त्रास, हाल, कष्ट सोसून पुढे जाण्याची जीद् आहे का? आपण शोधक दूरदर्शी धोरणीं आहोत का? आमच्यात व्यापारी वृत्ती आहे का? जशा अनेक गोष्टींचा समाजांतील जाणत्यांनी संशोधक वृत्तीने अभ्यास केला पाहिजे व सातत्याने तो समाजासमोर ठेवून आत्मसंशोधन केले तरच आम्ही मुंबईतील परप्रांतीयांशी स्पर्धा करू शकू. अन्यथा केवळ परप्रांतीयांच्या नावाने ओरडत राहिलो तर भारतात अविचारी, अव्यवहारी ठरूं.

दूध व कोळसा व्यापार

व्यापार–उद्योग करा म्हणून सांगणे सोपे पण त्याला भांडवल लागते असे

एक कारण ऐकण्यास मिळते. त्यासाठी मार्ग आहेत, शिवाय सर्वच धंद्यास फार मोठे भांडवल लागत नाही. एक वेळ मुंबईचा दुधाचा व्यवसाय मराठी गवळ्यांच्या हाती होता. पण आज दुधाचा धंदा करणारे महाराष्ट्रीय शोधून काढावे लागतील. मोठमोठे तबेले घालून व किंग्ज सर्कलसारख्या महत्वाच्या नाक्यावरील इमारतींचे मालक बनलेले सर्वच उत्तर भारतीय भांडवल घेऊन मुंबईत उतरले नव्हते. आज सरकारी गौळीवाडा झाल्यानंतरही आपले ते स्थान टिकवून आहेत. त्याचप्रमाणे साऱ्या मुंबईभर कोळशाची दुकाने उत्तर भारतीयांचीच आढळतील. आम्ही महाराष्ट्रीय हे धंदे कमी प्रतिष्ठेचे मानतो. बसल्या बसल्याही अंगाला काळे लागणारा हा धंदा आपल्याला नको वाटतो. आमच्याकडील पिढीजाद गवळ्याचा धंदा करणाऱ्यांची तरुण पिढी व इतर उच्च शिक्षण वगैरे घेऊ न शकणारे तरुण अशा या धंद्यात शिरून कष्ट करून दरमहा दोन अडीचशे अगर त्यापेक्षा अधिक कमाई करण्याचा प्रयत्न करण्याऐवजी शे दीडशे फार तर दोनशेची नोकरी करून पाटलून घालून शिवाजी पार्कवर चकरा मारणे व सिनेमाला गर्दी करणे हेच पसंत करतात. या उलट दुधाचा धंदा करणारे उत्तर भारतीय पोषाख, सिनेमा व हवा खाण्याचा शोक टाळून कष्ट उपसून गोठ्यात व कोळशाच्या दुकानातच प्रपंच थाटून काटकसरीने राहून पुढे जाण्याचा प्रयत्न करतात. चामड्याच्या वस्तूंच्या धंद्याचीही स्थिती तीच. कोल्हापूरी चप्पल चांगली सुबक टिकावू अशी मूळची ख्याती आहे. त्याचा फायदा घेऊन प्रचार करून चालू फॅशन व मागणी काय आहे याचा मागोवा घेऊन या व्यवसायात आपले स्थान निर्माण करता येईल. पण येथेही दिखाऊ हलक्या प्रतीच्या राजस्थानी मालाने बाजार व्यापला आहे. कानपूर, आग्रा व बाटाच्या मालाने बाजारावर कबजा बसवला आहे.

ऑपेरा हाऊसच्या नाक्यावरचा मोटार स्पेअर पार्टसचा बाजार विठ्ठलभाई पटेल रोड, त्रिभुवन रोड, बनामा हॉल लेन आणि आसपासच्या गल्लीबोळातही पसरला आहे व तो सारा सरदारजींनी व्यापला आहे. हॉटेल उपहार गृहांचा धंदाही असाच दाक्षिणात्यांनी व्यापला आहे. त्यांनी आपल्या पदार्थांची लोकांना चटक लावली आहे. गिऱ्हाईकांशी सौजन्याने वागून त्यांनी आपला जम बसविला आहे. ज्या महाराष्ट्रीय उपहारगृहांनी या गोष्टी लक्षात घेतल्या त्यांचे धंदे उत्तम चालले आहेत. एरवी आमच्या काही महाराष्ट्रीय उपहारगृहातून गिऱ्हाईकांसाठी लावलेले सूचना फलक व वागणूक पाहून गिऱ्हाईक पुन्हा तेथे जाण्याचे टाळतो. त्यानंतर टॅक्सीवाले व फेरीवाले यामध्ये टॅक्सीचा व्यवसाय सरदारजी व फेरीवाल्यांमध्ये महाराष्ट्रीय सोडून इतर प्रांतीयांचीच गर्दी दिसेल.

भांडवल नाही ही सबब लंगडी ठरेल

दूध, कोळसा, उपहारगृहे, टॅक्सी, कापड व धान्य हे सारे धंदे तसे फार मोठ्या भांडवलाचे नाहीत. स्वतंत्र व सहकारी मार्गाने हे व्यवहार महाराष्ट्रीय करू शकतात. त्याची यशस्वी उदाहरणे मुंबई शहरात आहेत. मंत्र्याचे सत्कार, सत्यनारायण पूजा, गणेशोत्सव, नवरात्रोत्सव, उद्घाटने, पायाभरणी, जयंत्या मयंत्या अशा कार्यात सतत गर्दी करणाऱ्या सत्ताधारी पक्षाच्या कार्यकर्त्यांनी आणि घोषणा, मोर्चे, निदर्शने, सभा वगैरे झेंडे नाचवण्यातच बराच काळ घालवणाऱ्या विरोधकांनी आपले थोडे लक्ष सहकारी मार्गाने वरील अनेक व्यवसायात घातले तर निदान गल्लीबोळातला व दैनंदिन लागणाऱ्या वस्तूंचा व्यापार तर महाराष्ट्रीय जनतेच्या हातात काही प्रमाणात यऊ शकणार नाही काय ?

नोकरी धंद्यातही तीच कथा

मुंबई शहरांतील अनेक ठिकाणी फर्निचर किंवा तत्सम चांगल्या सुतार कामामध्ये सरदारजी बरेच आढळतात. तर हलक्या सुतार कामात उत्तरभारतीय दिसतील. मराठी सुतार कोठे ? जुना मराठी सुतार नव्या काळाची मागणी जाणू शकला नाही अगर त्या धंद्यांत आलेल्या परप्रांतीयाशी दर, दाम व काम त्यामध्ये स्पर्धा करू शकला नाही, तो मागे पडला. मराठी सुताराचा मुलगा मॅट्रीकपर्यंत अगर कॉलेजची एक दोन वर्षे शिक्षण होताच कडक पोषाखांत शे-दीनशेच्या नोकरीच्या शोधात फिरू लागला. सुतारकाम त्याला कमी प्रतिष्ठेचे वाटू लागले. यामुळे सरदारजीचा रस्ता मोकळा झाला. चांगल्या कामासाठी अधिक दर दाम घेऊन काटकसरीने राहून तो कॉंट्रॅक्टर होण्याच्या मार्गावर चालू लागला. एखादा छोटासा ओनरशिपचा ब्लॉकही घेण्याचा विचार करूं लागला. पण महाराष्ट्रांतील पिढीजाद सुताराच्या मुलाला हौसिंग बोर्डाच्या कोठडीवरच समाधान मानण्याची पाळी आली. महाराष्ट्रांत कुंभार नाहीत काय ? आहेत पण मुंबईत मातीचे माठ फेरीने विकणारे अगर फूटपाथवर मातीच्या माठांचे दुकान मांडणारे कोण आहेत ? मराठी कुंभाराला मुंबईत फेरी मारू नको अगर नाक्यावर दुकान मांडू नको असे सरकारने सांगितले आहे काय ? बांधकामात मेसन, मेस्त्री वगैरे गुजराथीच दिसतात. त्याला कारण कॉंट्रॅक्टर गुजराथी असतात हे असू शकेल. पण योग्य दामात मराठी माणूस मिळाला तर तो स्वीकारण्याची व्यापारी वृत्ती गुजराथ्याकडे आहे. तेव्हा हमाली व ओझी वहाण्याच्या कामाऐवजी असे काम आत्मसात करण्याचा प्रयत्न का होऊ नये ? निरनिराळचा कारखाने व अन्य व्यापारी संस्थाच्या वरिष्ठांचे सेक्रेटरी व अन्य स्टेनोटायपिस्ट वगैरे दक्षिणीच असतात याची कारणे काय ?

त्या क्षेत्रांत त्यांच्याशी स्पर्धा करू शकणारे लोक आपल्यात नाहीत म्हणून असे होते की त्याला अन्य कारणे आहेत याचा शोध घेणे जरूर आहे.

सत्ताधारी पक्षाच्या, विरोधी पक्षाच्या व अन्य सामाजिक क्षेत्रांतील कार्यकर्त्यांनी, वृत्तपत्रांनी याबाबत चिकित्सा व संशोधन करून उपाय शोधून काढले पाहिजेत. या परिस्थितीस काही सामाजिक दोष कारणीभूत असतील तर त्याची स्पष्टपणे जाणीव देणे जरूर आहे. केवळ मराठी माणसाच्या भावना सुखावतील अशी भाषणे करून, टाळचा मिळवून अगर सरकारला व परप्रांतीयांना दोष देऊन महाराष्ट्रीय जनतेला प्रगतिपथावर नेता येणार नाही. त्याचप्रमाणे 'बम्बई का गटार सुधरा, मगर भय्या नही सुधरा' अशी उत्तरं भारतीयांची टिंगल करून, सरदारजींची टिंगल करणाऱ्या कथा सांगून आपण शहाणे व प्रागतिक ठरणार नाही. मुंबईत आपले स्थान टिकणार नाही.

(प्रीमियर कामगार : महाराष्ट्र दिन विशेषांक १९६५)

ग्रामीण तरुणांनो, सत्यशोधन करा !

जनतेच्या प्रश्नांचे चिंतन करून, देशापुढील समस्यांचा अभ्यास करून, काळजीपूर्वक निर्णय घेऊन, तळमळीने त्या निर्णयांची अंमलबजावणी करण्याऐवजी आपल्या व गटाच्या सत्तास्वार्थाची चिंता करून केवळ वेळ निभावून नेणारे निर्णय घेण्याची सवय आपल्या नेत्यांना लागली आहे. त्यामुळे उत्पादन, वितरण, बेकारी, शिक्षण अशा सर्वच प्रश्नांत गोंधळ झाला आहे. बेपर्वा पुढाऱ्यांमुळे सर्व स्तरावरील नोकरशाहीच नव्हे तर मोठा पगार घेणारा कामगारवर्गही बेपर्वा झालेला आहे. त्यामुळे अत्यल्प वेतनी कामगारवर्ग व दरिद्री जनता हैराण झाली आहे. विरोधी पक्ष व अन्य संघटना मोर्चे, बंद घेराव या मार्गांचा गेली काही वर्षे उपयोग करीत आहेत. अलिकडे त्यांची तीव्रता त्यांनी वाढविली आहे. विधान सभा, लोकसभा, यासारख्या ठिकाणीही हमरी-तुमरीची प्रकरणे घडू लागली आहेत. त्यामुळे गल्लीतल्या गटबाजींना आपल्या कोणत्याही कृत्याची

शरम वाटण्याचे कारण राहिले नाही.

बोलघेवडे व गांवगुंड याना फेकून द्या.

इंदिरा गांधींच्या नव्या तडफदार भूमिकेमुळे काही परिवर्तन होईल, असे वाटले होते. परिवर्तनासाठी गतिमान व धोका पत्करून काही निर्णय घेण्याची तयारी असलेली जी मंडळे काँग्रेसच्या राष्ट्रीय प्रवाहात होती, ती बाजूला पडली. पण त्यामुळे निर्माण झालेल्या पोकळीत पुरोगामी विचाराची फक्त बोलघेवडी मंडळी शिरली. जो नवा विचार ते बोलतील तो अंमलात आणण्यासाठी जी आग्रही भूमिका स्वीकारावी लागते, ती स्वीकारण्याचे सामर्थ्य या बोलघेवड्या पुरोगाम्यात नाही. अशा कामासाठी लागणारा कार्यकर्ता व अनुयायीवर्गही एकाही बोलघेवड्या पुढाऱ्याजवळ नाही. अशा परिस्थितीत जनता पुन्हा विरोधी पक्षाकडे वळण्याचा धोका संभवतो. पुढील सार्वत्रिक निवडणुकीवर त्याचे परिणाम दिसतील, कदाचित पुन्हा कांही प्रांतात विरोधी पक्षीय सरकारे येतील, पण त्यांच्याकडून प्रश्न सुटणार नाहीत व एकप्रकारे अराजकाकडे ती वाटचाल ठरेल. यातून आता केवळ देशाचे नेते मार्ग काढू शकणार नाहीत. बहुतेक साऱ्या नेत्यांनी सत्ता स्वार्थासाठी अनेक अपप्रवृत्तीला जोपासले आहे. त्यांना धक्का लावण्याचे सामर्थ्य या नेत्यांजवळ नाही. अशा या परिस्थितीत देशातील नव्या पिढीनेच मार्ग काढण्यासाठी पुढे आले पाहिजे. केवळ मोर्चाचे नेतृत्व करणारे व व्यासपीठे गाजविणारे तरुण या कामासाठी उपयोगी पडणार नाहीत. तर आपल्या गावात, तालुक्यात जिल्ह्यातील जनहिताची चाड असलेले प्रामाणिक नेते अगर कार्यकर्ते यांच्या पाठीमागेच आपली कार्यशक्ती तरुणांनी उभी केली पाहिजे. जेथे असे कार्यकर्ते नसतील तेथे तरुणानी आपल्यांतून असे नेतृत्व निर्माण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. पण कोणत्याही परिस्थितीत गांवगुंडी करून अगर जिल्हा परिषदेत घुसू पाहाणाऱ्या राजकीय टग्यांना तरुणांनी बाजूस फेकले पाहिजे. ही जबाबदारी प्रामुख्याने काँग्रेस नेतृत्व मागणाऱ्या तरुणांची–नागरिकांची आहे. कारण, ग्रामीण भागात तरी गावगुंडी करणाऱ्याकडे विरोधी नेतृत्व नाही, गांवगुंडी करणाऱ्यांना संरक्षण देण्याचे व पोसण्याचे सामर्थ्य विरोधी पक्षीयात नाही. विधानसभा, लोकसभा, यांसारख्या ठिकाणी विरोधी पक्षीय स्वतःच्या कर्तृत्वावरच येतात, असे दिसते.

गरिबांची चिंता कोण करतो !

महाराष्ट्राचे सत्ताधीश हे ग्रामीण पाठिंब्यावरच सत्ता चालवितात. शहरातून तरुण कामगार व विरोधी पक्षीयांकडून होणाऱ्या बंद, मोर्चा, घेराव

यांची सत्ताधिशांना फारशी भीती वाटत नाही. वेळ आलीच तर या शहरी कामगार व तरुण वर्गाच्या काही मागण्या योग्य नसल्या तरी वेळ निभावून नेण्यासाठी त्या मान्य करतात. परिणामी अन्य कामगारांच्या अपेक्षा उंचावतात, यांचेही दडपण येते. सरकारी नोकरांचे त्या पाठोपाठ दडपण येते व या सर्वांच्या दडपणांचे ओझे सर्वत्र गरीब जनतेवर येते. पण गरीब जनतेचे प्रतिनिधी म्हणून त्यांच्याच पाठिंब्यावर राज्य करणाऱ्याना त्याची फारशी चिंता वाटते, असे दिसत नाही. तिकीटे देण्याची सत्ता असणाऱ्या नेत्यांचा अनुनय करून पुढच्या निवडणुकीत स्थान पक्के करणे आणि कदाचित ते न जमल्यास पुढची तरतूद करणे एवढ्यावरच बहुसंख्य प्रतिनिधींचे लक्ष दिसते.

ग्रामीण तरुणांचे कर्तव्य !

अशा या परिस्थितीत ग्रामीण भागातील तरुणांनी आतापासूनच नव्या प्रामाणिक तळमळीच्या कार्यकर्त्यांचा शोध घेऊन त्यांच्या पाठीशी जागृतपणे उभे रहावे. कार्यकर्ते निर्माण कण्याचा प्रयत्न करावा; कोणी वसंतरावदादांचा चाहता, कोणी शंकरराव चव्हाणांचा चाहता आहे अगर कोण नाईकांचा चहाता आहे, हे न पाहता अगर वरीलपैकी कोणाचे तरी नांव घेऊन लुबाडणाऱ्या कार्यकर्त्यापेक्षा जनतेचे प्रश्न सोडविणारा जनतेचा चाहता कोण हे ग्रामीण तरुणांनी पहावे. सोलापुरी तरुणांनी हा 'नामदेव' गटाचा व तो 'मोहिते' गटाचा, सांगलीतील तरुणांनी हा 'बापू' गटाचा व तो 'दादा' गटाचा अशी दृष्टी न ठेवता या सर्व नेत्यासमोर जनतेचे खरे प्रश्न घेऊन त्यांच्या सत्तास्पर्धेच्या गटबाजीला विरोध करणारे कार्यकर्ते उभे करण्यासाठी ग्रामीण तरुणांनी संघटित झाले पाहिजे.

धर्माच्या नावाखाली फसवणुकीविरूद्ध महात्मा फुले यांनी सत्यशोधक चळवळीचा उभारलेला झेंडा जनसेवेच्या, समाजवादाच्या नावाखाली जनतेला झुलवणाऱ्या व फसवणाऱ्या पुढाऱ्यांविरुद्ध तरुणांनी उभारला पाहिजे. आजच्या क्षणाची ती नितांत गरज आहे. ग्रामीण महाराष्ट्रातील नगरपालिकांच्या येत्या निवडणुकीत या दृष्टीने तरुणांनी उठाव केला पाहिजे.

(पाक्षिक समाजवाद)



● ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी कार्यधुरंधर सहकार नेते मा. रत्नाप्पा कुंभार यांच्या ७६ व्या वाढदिवस प्रसंगी सदिच्छा देताना श्री. नरेन्द्र पाटील.



● १९७५ साली कुर्ला येथील अंबिका सेवा मंडळाच्या रौप्यमहोत्सवी सामन्याचे उद्घाटन करताना.



● १९६८ साली मा. बाबुराव भापसे यांच्या 'व्यासपीठ' साताहिकाच्या पहिल्या अंकाचे प्रकाशन श्री. नरेन्द्र पाटील यांच्या हस्ते झाले.




● १९६९ साली काँग्रेस विभाजनानंतर अखिल भारतीय काँग्रेसच्या दिल्ली अधिवेशनात पंतप्रधान इंदिरा गांधी यांची कार्यकर्त्यांसह श्री. नरेन्द्र पाटील यांनी भेट घेतली.



● १९६० साली प्रीमियर ऑटोमोबाईल कंपनीच्या युनियनच्या वार्षिक सभेत अहवाल वाचन करताना मा. नानासाहेब कुंठे यांच्या समवेत श्री. नरेन्द्र पाटील.



● १९७६ साली नागरिक साह्यकारी ट्रस्टतर्फे झालेल्या समारंभात सिनेकलावंत मा. सुनिल दत्त यांच्याशी बातचित करताना श्री. नरेन्द्र पाटील.



● मा. श्री. वसंतराव नाईक मुख्यमंत्री असताना त्यांच्या वाढदिवस प्रसंगी प्रीमियर ॲटोच्या कार्यकर्त्यांबरोबर सर्वश्री श्री. प्रभाकर कुंटे, श्री. तुषार पवार यांच्या समवेत श्री. नरेन्द्र पाटील.



- कर्मवीर भाऊराव पाटील प्रबंधाच्या प्रकाशन समारंभ प्रसंगी मा. वि. स. पागे. डॉ. व्ही. जी. मेत्रस, श्री. बाबुराव भापसे आणि श्री. नरेन्द्र पाटील.



- राजश्री छत्रपती शाहूमहाराजांच्या जन्मशताब्दी निमित्ताने आयोजिलेल्या एका समारंभात प्रा. एन्. डी. पाटील, डॉ. धनंजय कीर, श्री. रायभान जाधव व श्री. नरेन्द्र पाटी



● १९७५ साली कुर्ला नागरिक सहकारी बँकेच्या रौप्यमहोत्सव प्रसंगी पद्मभूषण डॉ. धनंजय कीर यांच्याकडून शाल व श्रीफल स्वीकारताना.



● स्वातंत्र्योत्तर कालातील सांगली व मिरज येथील पहिल्या आमदार व ज्येष्ठ समाजसेविका श्रीमती कळंत्रे आक्का परदेशी दौऱ्यावर जाताना निरोप देते वेळी सौ. व श्री. नरेन्द्र पाटील.



- सांगलीच्या कॉमर्स कॉलेजमध्ये कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जयंती समारंभाचे अध्यक्ष श्री. नरेन्द्र पाटील व प्रमुख पाहुणे ॲड. तात्यासाहेब पाटील (श्री. नरेन्द्र पाटील यांचे पिताश्री), प्रा. चौगुले भाषण करताना.



- माननीय राजारामबापू पाटील उद्योगमंत्री असताना इंजिनिअरींग



● १९७७ च्या को-ऑपरेटीव्ह कॉंग्रेसच्या अधिवेशन प्रसंगी कोल्हापूरच्या सहकारी कृषी औद्योगिक क्षेत्रातील कार्यकर्त्यांनी उपराष्ट्रपती ना. बी. डी. जत्ती यांची सदिच्छा भेट घेतली. उपराष्ट्रपती ना. बी. डी. जत्ती यांच्या समवेत श्री. नरेन्द्र पाटील.



● कामगार संघटना, सहकार घरबांधणी, सहकारी बँक इत्यादी क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल श्री. नरेन्द्र पाटील यांचा १९६९ साली सत्कार करण्यात आला.
श्री. बाबुराव भापसे भाषण करीत असून, 'शिवनेर'कार श्री. विश्वनाथराव वावळे बसलेले.



● १९७० साली काँग्रेसच्या लेबर सेलच्या परिषदेत भाषण करताना श्री. नरेन्द्र पाटील.



॥ मुलाखत ॥

मुलाखत । नरेन्द्र पाटील

श्री. नरेन्द्र पाटील तसे अबोल व प्रसिद्धीविन्मुख ! सतत मागे राहून प्रोत्साहन देण्याचा त्यांचा स्वभाव ! त्यांचा माझा परिचय प्रॅक्टीकल सोशॅलिझमच्या बैठकांमध्ये झाला. या बैठकांना ते आवर्जून उपस्थित रहात असत. परंतु तेथे त्यानी स्वत:हून आपला परिचय कधीच करून दिला नाही अथवा आपल्या सामाजिक कार्याबद्दल माहितीही कधी करून दिली नाही. पुढे परिचय वाढला व त्याचे मैत्रीत रू पांतर झाले. मित्रगणांकडून श्री. नरेन्द्र पाटील यांच्याविषयी बरेच ऐकायला मिळाले. वेळोवेळी होणाऱ्या गाठीभेटीत मी त्यांना बोलते केले. त्याच दरम्यान त्यानी संपादन केलेले 'प्रीमियर कामगार,' 'नागरिक मित्र' अंक व इतर साहित्यही वाचावयास मिळाले. त्यांच्यातली निस्पृहता, सामाजिक कार्याविषयीची तळमळ व राष्ट्रहिताचा विचार यामुळे मी प्रभावित झालो. प्रस्तुत मुलाखत श्री. नरेन्द पाटील यांच्याशी वेळोवेळी झालेल्या चर्चेचे फलीत आहे.

—सुरेश नगर्सेकर

प्रश्न : तुमचे बालपण तुम्हाला आठवते का ?

श्री. नरेंद्र पाटील : माझा जन्म १९२६ सालातला. १९३६ पर्यंतच्या घटनांची फारशी स्मृती नाही. त्यावेळी माझ्या गावाची वस्ती ३००० च्या आसपास असल्याचे बोलले जाते. शाहू महाराजांनी आपले जनक वडिल श्रीमान जयसिंगरावजी घाडगे यांच्या स्मरणार्थ या गावाची स्थापना केलेली आहे. त्यांनी व्यक्तिशः लक्ष घालून गावाची आखीव रचना केली आहे. व्यापार वाढीसाठी त्यांनी खास सवलती देऊन व्यापारी पेठ वसविण्याचा प्रयत्न केला. गावाचे महत्व वाढावे म्हणून कोल्हापूर संस्थानातील शिरोळ व हातकणंगले येथील दोन तालुका न्यायालये जयसिंगपुरात ठेवण्यात आली होती. यामुळेही गावात त्याकाळी सुमारे ४० वकील प्रॅक्टीस करीत होते. त्यामध्ये ब्राह्मणेतर वकील फक्त दोनच होते. त्यापैकी एक माझे वडिल. कर्मवीर भाऊराव पाटील हे माझ्या वडिलांचे थोरले बंधू ! कर्मवीर भाऊराव पाटील यांना छत्रपती शाहू महाराज विद्यार्थीदशेपासून ओळखत असल्याने आमच्या वडिलांबद्दल त्यांना आस्था होती. माझ्या वडिलांना सामाजिक कार्याची आवड होती. त्यामुळे त्यांनी पुणे येथे शेतकी कॉलेजमधील सरकारी नोकरी सोडून एक विद्यार्थी वसतीगृह पुण्याच्या 'दैनिक प्रभातचे' संपादक कै. कोठारी यांच्या मदतीने चालविण्याचा प्रयत्न केला होता. त्यानंतर विदर्भात कारंजा येथे त्यांचे मित्र श्री. देवचंदजी चौरे (आता पुज्य गुरुदेव समंत भद्र) यानी स्थापन केलेल्या आश्रम शाळेत येण्याबाबत आग्रह केल्याने तिकडेही अनेक वर्षे काम केले होते. पण पुढे त्यांचा विचार बदलून त्यांनी वकिलीपेशा पत्करला व जयसिंगपुरात स्थायिक झाले.

वडिलांच्या या सामाजिकदृष्टीला व कार्याला जयसिंगपूरसारख्या नव्या वसाहतीत बराच वाव मिळाला. छत्रपती शाहू महाराजांच्या अपेक्षेप्रमाणे हे गाव रेखीव व स्वच्छ राहावा, गावाची वाढ चांगली व्हावी, शैक्षणिक सवलती उपलब्ध व्हाव्यात यासाठी ते क्रियाशील पुढाकार घेत असत. त्यामुळे १९४० पर्यंत गावातील सर्व सामाजिक कार्यात वडील प्रभावी असायचे. वडिलांच्या मुंबई, पुणे येथील वास्तव्यापासून आईवर झालेल्या संस्कारामुळे घरातील वातावरण सामाजिक कार्यास पूरक होते. तरीपण आई प्रत्यक्ष कार्यात पुढे पुढे कोठेच नव्हती. तिने व्यक्तिगत जीवन मात्र उच्च आचार, विचारांचे ठेवले होते. या वातावरणाचा माझ्यावर परिणाम होता. त्याकाळात प्रत्यक्ष ब्रिटिश अमलाखालील भागात राष्ट्रीय चळवळीचे वारे वाहत होते. पण ब्रिटिश सत्तेच्या अंकीत असलेल्या संस्थानी अंमलाखालील भागात राष्ट्रीय चळवळीचा प्रभाव कमी होता. त्यातही कोल्हापूर संस्थान हे शिवछत्रपतींच्या थेट वंशावळीचे राज्य असल्याने व शाहू छत्रपतींच्या

सारखे लोकाभिमानी व पुरोगामी अधिपती लाभल्याने कोल्हापुरात जवळ जवळ १९३८ सालापर्यंत राष्ट्रीय चळवळीचा प्रभाव दिसून येत नव्हता त्यापूर्वीच शाहू छत्रपतींचे निधन झाले आणि भाई माधवरावजी बागल यांच्या नेतृत्वाखाली कोल्हापुरात संस्थानी प्रजेची चळवळ सुरु झाली. १९३९ साली जयसिंगपूरातच कोल्हापूर संस्थान प्रजा समिती'ची स्थापना झाली. स्थापना झाल्याच्या दिवशी भाई माधवरावजी बागल यांच्यासह परगावच्या सर्व कार्यकर्त्यांच्या भोजनाची व्यवस्था माझ्या आईच्या पुढाकाराने आमच्या घरीच करण्यात आली होती. या सर्व वातावरणाचा माझ्यावर जो परिणाम झाला तो आज १९८६ पर्यंत टिकून आहे.

राजाराम स्वयंसेवक संघातून राष्ट्र सेवादलाकडे

प्रश्न– राष्ट्रीय चळवळीकडे तुम्ही कसे आकृष्ट झालात ?

श्री. नरेंद्र पाटील– १९३७–३८ च्या सुमारास जयसिंगपुरात राजाराम स्वयंसेवक संघ या टोपण नावाने ओळखल्या जाणाऱ्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शाखेतच मी जात होतो. सदर संघाची एक नवीन शाखा आमच्या घरानजीकच सुरू करण्यात आली.

नव्या शाखेची सुरुवात होताच आमच्या घराजवळची मुले शाखेत येऊ लागली. आमच्या घरी काम करणाऱ्या मुसलमान मोलकरणीचा मुलगा एकेदिवशी मैदानाजवळ येऊन उभा होता. त्यालाही शाखेत येऊन खेळात भाग घेण्यास मी सुचविले. एवढ्यात त्याच्या पायातील कडे पाहून शाखाप्रमुख धावत आले. व त्याला नाव विचारून मैदाना बाहेर काढले. असे का करण्यात आले ? असा प्रश्न मी शाखाप्रमुखास केला. तेव्हा त्याने उत्तर दिले की, ते तुला समजणार नाही. झाल्या प्रकाराने मी दुःखी झालो होतो. म्हणून घरी जाताच झाला प्रकार मी वडिलांच्या कानी घातला आणि त्यांना खुलासा विचारलस. वडिल हसले आणि त्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची म्हणजेच राजाराम स्वयंसेवक संघाची उद्दिष्टे सांगितली. घरी आपण महात्मा गांधी यांच्या राष्ट्रीय विचाराचे समर्थन करीत असताना त्यानी मला ही कल्पना का दिली नाही?,असे मी विचारले. त्यावर ते म्हणाले, 'तू गल्लीत उनाड पोरामध्ये विटीदांडू असे खेळ खेळण्यापेक्षा संघातल्या खेळ कवायतीत भाग घेतलेला बरा म्हणून तुझे संघात जाण्याकडे दुर्लक्ष केले.' संघ महात्मा गांधीजींच्या विरोधी विचारांचा आहे, हे समजताच त्या दिवसापासून मी संघात जाणे बंद केले. पण संघातल्या खेळ, कवायती यांचे मला आकर्षण असल्याने मी आमच्या घराच्या कंपाऊंडमध्ये मुले जमवून संघाप्रमाणेच दक्ष, आरामी कवायत व खेळ

सुरू केला. कारण मला सांगता येणार नाही पण आम्ही त्यावेळेला लाल झेंडा लावीत होतो. संस्थानी हद्द असल्यामुळे तिरंगी झेंड्याचा वापर झाल्याचा प्रसंग पाहाण्यास मिळाला नव्हता. लाल झेंड्यासह अशी कवायत चालू असतानाच प्रजा परिषदेचे त्या काळातील एक कार्यकर्ते कै. भूपाल पंडीत आमच्या घरी आले होते. त्यानी हा प्रकार पाहून मला प्रश्न केला की, हे काय चालले आहे? त्यावर मी संघात घडलेल्या प्रकारासह सर्व माहिती सांगितली. कै. भूपाल पंडीत यांनी सांगितले की, असे काही करण्यापेक्षा तुम्ही राष्ट्रसेवा दलाची शाखा सुरू करा. सांगली, कोल्हापूर, कुरुंदवाड येथे सेवादलाच्या शाखा सुरु झाल्या आहेत. मी अधिक माहिती घेतली आणि सांगली येथील राष्ट्रसेवादल प्रमुख श्री. अण्णासाहेब देवर्षि त्यांना भेटलो. कवायतीच्या हिंदी ऑर्डरची माहिती घेतली आणि आमच्या चालू असलेल्या शाखेत त्याचा वापर सुरू केला. त्याच सुमारास प्रजा परिषदेचे नेते भाई माधवराव बागल यांचा तालुक्यात दौरा होता. दौऱ्यातील त्यांच्यासह सर्व कार्यकर्त्यांच्या जेवणाची व्यवस्था आमच्या घरी होती. त्यावेळी आम्ही मुलांनी स्थानिक कार्यकर्त्यांमार्फत आम्हाला सेवादल चालविण्यासाठी एखाद्या कार्यकर्त्याकडून माहिती मिळण्यासाठी व्यवस्था व्हावी, अशी मागणी केली व परिणामी त्यांनी राष्ट्रसेवादलाच्या नेत्यांशी संपर्क साधून कोल्हापुरात दहा दिवसाच्या प्रशिक्षण शिबिराची व्यवस्था संस्थानातील ग्रामीण तरुणांसाठी केली. त्या शिबिरास मी, श्री. शंकर अकीवाटे व इसाक मुजावर असे तिघे गेलो होतो.

राष्ट्रीय चळवळीची प्रथम प्रेरणा

प्रश्न– विद्यार्थी दशेत तुमच्यावर स्वातंत्र्य लढ्याचा परिणाम कसा झाला

श्री. नरेंद्र पाटील– १९४२ मध्ये कोल्हापुरास शिक्षणासाठी गेलो. सेवादलाच्या कामाकडे ओढ होती. कोल्हापूरातील वसतीगृहाच्या नियमामुळे व सेवादल शाखा खूपच दूर असल्याने तेथील सेवादल कार्यात नियमित भाग घेता आला नाही. पण लवकरच ऑगस्ट १९४२ चे आंदोलन सुरु झाले. शालेय विद्यार्थ्यांना ज्या उपक्रमात भाग घेता येत होता अशा मोर्चे, प्रभातफेऱ्या अशा उपक्रमात भाग घेतला. त्या काळात कोल्हापुरात श्री. अे. अे. पाटील, श्री. यशवंत चव्हाण, श्री. लालजी कौलगी, श्री. बापूसाहेब पाटील इत्यादी मंडळी विद्यार्थ्यांचे नेतृत्व करीत होती. आंदोलनाचा जोर वाढताच त्यातील अनेक मंडळी पकडली गेली, तर काही भूमिगत झाली. प्रजा परिषदेच्या नेत्यांपैकी भाई बागल व अन्य नेते स्थानबद्धतेत ठेवले गेले, तर श्री. रत्नाप्पा

कुमार व त्यांचे अनुयायी भूमिगत झाले. हातकणंगले, रुकडी ही रेल्वे स्टेशने जाळण्यात आली. मिरजेजवळ एक मालगाडी पुलावरील फिशप्लेट काढून पुलावरून खाली पाडण्यात आली. अशा मोठ्या घटनांबरोबरच अनेक ठिकाणी मोर्चे, निदर्शने सरकारी कचेऱ्यांवर तिरंगा फडकविणे असे उपक्रम काही काळ चालले. मी शालेय विद्यार्थ्यांत असल्याने अशा कोणत्याही मोठ्या उपक्रमात मला व माझ्यासारख्या विद्यार्थ्यांना भाग घेता आला नाही. कारण आम्हाला लहान म्हणून दूर ठेवले जात होते. या काळात मी शाळेला दांडी मारली ती कायमचीच. विद्यार्थी चळवळीतील नेते व अन्य विद्यार्थी पुण्या-मुंबईसारख्या शहरात भूमिगत राहून काम करीत आहेत, असे ऐकल्याने आपण कोठे जायचे, कोणाकडे जायचे याचा फारसा विचार न करता घराबाहेर पडून पुण्यास आलो. सेवादलातील एक मित्र श्री. श्रीपाद चौगुले हे पुण्यात होते; त्यांचा तेवढा पत्ता बरोबर घेतला होता. त्यांच्याकडे गेलो. पण चळवळीचा जोर ओसरला होता. आणि आपणास कोणी मित्र अगर नेते भेटतील असे वाटले होते. तसे कोणी न भेटल्याने निराश झालो. गावी परत जाण्याची इच्छा नव्हती. त्यावेळी दौंड येथे माझे एक काका एक्साईज खात्यात वरिष्ठ अधिकारी होते, त्यांच्याकडे गेलो. तेही अत्यंत राष्ट्रीय-वृत्तीचे होते. सरकारी नोकरीत असूनही शक्यतो सर्व कपडे खादीचे व इतर वस्तू देशी वापरण्याचा त्यांचा आग्रह असे. त्यांना माझा निर्णय पसंत पडला नाही. पण कोणत्याही परिस्थितीत मी गावी परतण्यास तयार नसून मुंबईला जाणार असे दिसताच वालचंदनगर येथील साखर कारखान्याच्या शेती विभागात त्यानी नोकरी लावून दिली. पण मला तेथील वातावरण मानवले नाही. कारण या उद्योगाचे प्रमुख शेठ गुलाबचंद हिराचंद हे ते हिंदूमहासभावादी होते. त्यामुळे कोंडमारा झाल्यासारखे वाटले म्हणून मी मुंबईला आलो. मुंबईत येण्यापूर्वी काही पत्ते मी मिळविले होते. त्या आधारे दि इंडियन हयूम पाईप कंपनी या कंपनीत नोकरी मिळविली.

त्यावेळेला दुसरे महायुद्ध चालू होते. त्यासाठी टेलीफोनच्या आणि टेलीग्राफ तारांसाठी लागणाऱ्या जाड पत्र्यांच्या खांबाची फार मोठी ऑर्डर त्या कारखान्याला होती. या खांबांसाठी गोल केलेल्या पत्र्यांना वेल्डींगचे टाके घालण्यासाठी वेल्डर्सची फार मोठ्या प्रमाणात जरूरी होती. नोकरीवर हजर होताच केवळ सात दिवसांत या कामासाठी लागणारे जुजबी वेल्डींग ज्ञान देण्यात येवून झटपट वेल्डर तयार करण्यात आले. त्या प्रकारचा वेल्डर मी झालो. त्याकाळात मुंबईत मात्र राष्ट्रीय लढ्यासंबंधित लोकांशी गाठीभेटी झाल्या. कारण मी त्यावेळचे मुंबई राष्ट्रसेवादलाचे एक प्रमुख श्री. गजानन मिर्जे यांच्या

वसतीगृहातील जागेतच आसरा घेतला होता. त्यांच्या सांगण्यावरून भूमिगत असलेले कोल्हापूरचे नेते सवर्षी रत्नाप्पाण्णा कुंभार, आण्णासाहेब नरदे, पी. के. सावंत, डॉ. नरवणे यांच्याकडे जाण्यायेण्याचा योग येत असे. त्याकाळात खेतवाडीतील लोकमान्य पान बाजार हा सांगली, कोल्हापूरकडील भूमिगत व अन्य कार्यकर्त्यांना आसरा देणारे प्रमुख केंद्र होते. पण मुंबईत मी अल्पकाळ राहिलो- १४ एप्रिल १९४४ मध्ये मुंबईच्या गोदीत बोटीवर मोठे स्फोट होऊन अर्ध्या मुंबईला हादरा बसला व गोदी विभागाला आगीने वेढले. दुसरे युद्ध चालू असल्याने व नुकताच जपानने ब्रह्मदेशावर बॉम्ब फेकला होता. तसाच हल्ला मुंबईवर आला, अशी समजूत होऊन लोक फोर मोठ्या प्रमाणात आपआपल्या गावाकडे धावत सुटले.

स्वतंत्र व्यवसाय ते प्रीमियरच्या प्रांगणात प्रवेश

प्रश्न– स्वतंत्र व्यवसायाकडे तुम्ही कसे वळलात ?

श्री. नरेंद्र पाटील– मी गावी परतलो. आंदोलन ओसरले होते. माझा उत्साहही मावळला होता. उद्योगव्यवसाय करण्याचा विचार माझ्या मनात आला. त्याकाळात मिलमधून तयार होणारे कापड मोठ्या प्रमाणात युद्धग्रस्त देशांमध्ये जात असल्याने व अन्य कोणत्या कारणाने असेल गिरण्यातून होणाऱ्या जाड्या-भरड्या साडचांचे उत्पादन कमी झाले होते. आणि हातमागाच्या साडी व्यवसायाला तेजी आली होती. पूर्वी कधीही आमच्या गावी नसलेला व्यवसाय काही व्यापाऱ्यांनी व मध्यमवर्गीयांनी सुरु केला होता. मीही त्यात प्रवेश केला पण वर्षा-दीड वर्षांतच मी त्यातून बाहेर पडलो. पण तेवढचा अवधीत कांडचा भरणे, बीम भरण्यास मदत करणे, वैफनी करणे आणि प्रत्यक्ष हातमागावर कापड विणणे इत्यादी कामे करण्यास शिकलो होतो. काही नव्या स्वरुपाचा व्यवसाय करण्याची इच्छा माझ्या एका मित्रामुळे मला झाली. कोल्हापूर, सांगली या भागात पत्र्याच्या बॅगा, सुटकेसेस वगैरे बनविण्याचा व्यवसाय कोणी करीत नव्हते. पुण्या, मुंबईहून माल आणून विकला जात असे. माझा एक जुना मित्र पुण्यामध्ये ह्या व्यवसायात शिरला होता. त्याने कोल्हापूर, सांगली भागात येवून आम्ही दोघांनी मिळून उपरोक्त वस्तू बनविण्याचा एक छोटा व्यवसाय करण्याचा निर्णय घेवून कोल्हापुरात सुरुवात केली. या कामासाठीच मुंबईला येणे–जाणे होत राहिले.

१९४६ मध्ये मुंबईत आलो असताना मुंबईत नाविक बंडाने उडालेलीधमाल [illegible] ची संधी मिळाली. मुंबई शहरात निरनिराळ्या भागात मी पायीच [illegible] पाहाण्यासाठी [illegible] महत्वाच्या चौकात मोकळचा पिंपांचे मोठे वर्तुळ आखून एक-दोन

लष्करी गाड्या व त्या पिंपावर मशीन गन्स चारी दिशांना रोखून ठेवलेल्या दिसायच्या आणि मध्ये गोऱ्या सैनिकांची तुकडी बसलेली असायची. त्यानंतर १५ ऑगस्ट १९४७ ला स्वातंत्र्यदिनाचा सोहळा पाहाण्यास मी मुंबईत आलो. त्याचप्रमाणे राष्ट्रीय नेत्यांची सुटका झाल्यानंतर गौवालिया टँकवर झालेल्या काँग्रेस अधिवेशनासही मी आलो होतो. पुढे ३० जानेवारी १९४८ रोजी गांधीजींची दिल्ली येथे हत्या झाली. त्यादिवशीही मी मुंबईत होतो. ३१ जानेवारी रोजी काळाचौकी येथे साने गुरुजींच्या उपस्थित सेवादल सैनिकांच्या दुखवटा सभेतील त्यांचे भाषण स्मरत नाही. पण त्यांच्या चेहऱ्यावरील खिन्नता आजही डोळ्यासमोर तरळते. त्या काळातील झालेल्या भटकण्यामुळे सर्व प्रमुख नेत्यांना पाहाण्याची संधी मिळाली. अनेकांची भाषणे ऐकली. १९४५–४६ मध्ये कामानिमित्त तीन-चार दिवस पुण्यात होतो. त्यावेळेला गांधीजींचा मुक्काम पुण्यात होता. त्यांच्या सायंकाळच्या प्रार्थनेच्या प्रसंगी लागोपाठ तीन–चार दिवस त्यांचे अगदी जवळून दर्शन झाले. १९३९–४० च्या दरम्यान नेताजी सुभाषचंद्र बोस हे मुंबईहून बेळगावला जात असताना मिरजेच्या स्टेशनवर जवळ जवळ मध्यरात्री त्यांचे भाषण अगदी त्यांच्या निकट उभे राहून ऐकण्याची संधी मिळाली. आम्ही काही विद्यार्थी वसतीगृहाचे नियम मोडून भाषण ऐकण्यासाठी गेलो. त्याबद्दल आम्हाला दंडही करण्यात आला. त्या विद्यार्थ्यांत मी सर्वात लहान होतो. १९४७ च्या अखेरीस सातारा येथे राष्ट्रसेवादलाचा एक अतिभव्य मेळावा संपन्न झाला. त्या मेळाव्याला आझाद हिंद सेनेचे एक सेनापती कॅप्टन शाह नवाजखान व नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे पुतणे अरविंद बोस हे प्रमुख पाहुणे होते. त्यावेळी झालेल्या संचलनासाठी अग्रभागी राहण्यासाठी निवडलेल्या सेवादल सैनिकांच्या तुकडीत माझा व काही सहकाऱ्यांचा समावेश झाला होता. बारा हजाराहून अधिक सेवादल सैनिक साऱ्या महाराष्ट्रातून उपस्थित होते. भोवतालच्या खेड्यांतून ट्रकमधून त्यांच्यासाठी भाकऱ्या जमविल्या जात आणि गरम पिठले बनवून ते भाकरी बरोबर खाण्यास दिले जात असे. या वर्षभरात व्यवसायाकडे दुर्लक्ष झाले. त्यामुळे आर्थिक नुकसान झाले.

यामुळे १९४८ अखेर व्यवसाय बंद करून पुन्हा नोकरीसाठी मुंबईत आलो. स्वातंत्र्य मिळाले असल्यामुळे आता शासनामार्फतच जनतेचे प्रश्न सुटणार असा जो सार्वत्रिक समज पसरला, तसेच मलाही वाटले. १९४२च्या आंदोलनातील एक नेते व त्या वेळच्या मुंबई राज्याच्या विधीमंडळाचे काँग्रेस पक्षाचे आमदार एम. एच. शहा हे त्यावेळी प्रीमियर ऑटोमोबाईल्सचे डेप्युटी जनरल मॅनेजर होते. त्यामुळे मला थोड्याशा प्रयत्नानंतर प्रीमियरमध्ये नोकरी मिळाली. माझी व माझ्या सर्व

कुटुंबियांची विचारधारा मा. एम. एच. शहा यांना काहीशी माहिती असल्याने त्यांनी थोडयाच अवधीत माझ्यावर काही जबाबदारीचे काम सोपविले. त्यामुळे मला कार्यालयीन लेखन– वाचनाची सवय वाढवून व शारीरीक मेहनत करून त्या कामास पुरे पडण्याचे प्रयत्न करावे लागले. त्यांनी दिलेली संधी मला प्रयत्नशील बनण्यास उत्साह देणारी ठरून त्या काळात व पुढे केलेले प्रयत्न मला नोकरीत व पुढे सामाजिक कामात फार उपयुक्त ठरले.

कामगार चळवळीत योगायोगाने उडी

प्रश्न– कामगार चळवळीत तुम्ही कसे पडलात ?

श्री. नरेन्द्र पाटील– माझ्याकडून व्यवसायातील अपयशामुळे घरचे काही आर्थिक नुकसान झाले होते. ते भरुन काढून कुटुंबियांना उपयोगी पडण्यासाठी मी भर दिला. मात्र वैयक्तिकरीत्या माझ्या हाताखाली काम करणाऱ्या व अन्य संबंधित अशा शे-दीडशे कामगारांशी माझे आपुलकीचे संबंध होते. त्यांच्या किरकोळ आर्थिक अडचणी, औषधोपचार, त्यांची पत्रे लिहीणे अशी कामे मी करीत असे. त्यामुळे मला थोडी लोकप्रियता लाभली. या काळात एक महत्वाचा प्रसंग माझ्या नेहमीच्या कामाला जोडून आला.सुमारे दीडशे कंत्राटी कामगारांचे व्यवस्थापन माझ्याकडे होते. त्यांच्यामध्ये सुतार, गवंडी, रंगारी यांचाही समावेश होता निरनिराळ्या खात्याकडून येणाऱ्या मागणीप्रमाणे वेळ वेळी त्यांना त्या त्या खात्यात पाठवायचे व त्या संबंधीचे रेकॉर्ड ठेवून दर पंधरा दिवसांनी त्यांची पगार पत्रके तयार करावयाची, असे त्या कामाचे स्वरूप होते. या कामगारांना मिळणारी रोजंदारी व प्रत्यक्ष कंपनीच्या हजेरी पटावर असणाऱ्या, व अशाच स्वरुपाच्या कामगारांची रोजंदारी यात फार मोठी तफावत होती. हा फार मोठा अन्याय आहे असे मला वाटले. त्यामुळे मी हा प्रश्न मा. एम. एच. शहा यांच्यासमोर पोटतिडकीने मांडला. त्यांनाही सामाजिक दृष्टी असल्याने त्यांनी त्या कामगारांना चार आण्यापासून बारा आण्यापर्यंत रोजंदारीत वाढ दिली. त्यासाठी त्या कामगारांना पाहाण्यासाठी ते स्वत: खात्यात आले होते. त्या काळात सर्व क्षेत्रात कामगार संघटना आल्या नव्हत्या. कंत्राटी व माथाडी स्वरुपाच्या कामगारांना तर कोणीच वाली नव्हते. अशा परिस्थितीत मी कुणी नेता, कार्यकर्ता नसताही दीडशे कामगारांना अशी वाढ मिळवून दिली हे पाहून त्या कामगारांनाच नव्हे तर इतर सर्वच कामगारांना आश्चर्य वाटले.

मला सर्वच कामगारांमध्ये मान मिळू लागला. ही गोष्ट १९५०

साला अखेरची आहे. त्याच्याच परिणामी १९५४ मध्ये प्रीमियर कामगारांच्या पतपेढीच्या निवडणुकीत काँग्रेस पक्षास मानणारा मी एकटाच निवडून आलो. बाकी सर्व निवडून आलेले उमेदवार समाजवादी पक्षाच्या नेतृत्वाखालील इंजिनिअरिंग मजदूर सभेने पुरस्कृत होते. यामुळे स्थानिक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांकडून पक्षाच्या कामात सक्रीय भाग घेण्याचा आग्रह सुरू झाला व काही काळ मी कार्यकारिणीवर काम केले. पण १९५७ नंतर संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या काळात स्थानिक काँग्रेसमध्ये काही अपप्रवृतीचा प्रभाव वाढल्याने प्रत्यक्ष कार्यकारिणीमध्ये न जाता जेवढे काम करता येईल तेवढेच करू लागलो. याच काळात कुर्ला कामगार को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटीच्या कामाने गती घेतली. त्यात मी ओढला गेलो कार्यकारिणीवर व संयुक्त चिटणीस म्हणूनही काम केले. त्या काळातील मुंबईतील ही एकमेव कामगारांची सहकारी घरबांधणी संस्था असावी. त्याकाळात या सोसायटीने दोनशे ब्लॉकचे बांधकाम केले व ते अतिशय आश्चर्य वाटण्याजोग्या कमी किंमतीत झाले. आम्ही सर्व कमिटीचे कार्यकर्ते व निकटचे सहकारी तळमळीने, कष्टाने काटकसरीने काम करीत होतो. आणि आम्हा सर्वांना उपनगरातील ज्येष्ठ गांधीवादी नेते मा. इंद्रवदन ओझा यांचे सक्रीय मार्गदर्शन व कै. आंबेकरांचा सक्रीय पाठिंबा होता. म्हणूनच हे घडू शकले. यापाठोपाठच १९५८ मध्ये प्रीमियरमध्ये समाजवाद्यांच्या नेतृत्वाखाली इंजिनिअरिंग मजदूर सभेच्या तत्कालीन भडक नेतृत्वामुळे संप झाला. तो चार महिने चालला. त्या संपाचा शेवट करण्यासाठी काही काँग्रेस कार्यकर्त्यांनी कामगारांमधून एक समिती नेमली. त्यात इच्छा नसताना मी ओढला गेलो. त्याच सुमारास कामगार चळवळीत ज्या अपप्रवृत्ती शिरत होत्या. त्या प्रवृत्तीशी जुळवून घेणे अगर प्रतिकार संघटित करणे हे मला शक्य होईल असे वाटत नव्हते. पण संबंधित कार्यकर्त्यांच्या बरोबर मा. इंद्रवदन ओझा, माननीय नानासाहेब कुंटे, कै. आंबेकरजी, मा. पी. के. सावंत, कै. शांतीलाल शहा यांच्याबरोबर झालेल्या बैठकीत कामगार चळवळीत शिरत असलेल्या अपप्रवृत्तीना पायबंध घालण्यासाठी विचारी कामगारांनी उभे राहाण्याची, पुढे येण्याची आवश्यकता काहीशी पटली. मला याबाबत सर्व संबंधितांकडून आग्रह झाला. याचे कारण १९५८ मध्ये हा संप सुरू होताच सर्व समाजवादी प्रमुख नेत्यांना मी वैयक्तिकरीत्या लिहिलेली पत्रे, मा. एस. एम. जोशी यांना 'शिवनेर'मधून लिहिलेले अनावृत पत्र, त्याचप्रमाणे प्रीमियर संपावर 'शिवनेर'मधूनच मी प्रकाशित केलेले विस्तृत निवेदन या गोष्टी होत. या निवेदनामुळेच केंद्र सरकारने या संपाच्या चौकशीसाठी नेमलेल्या समितीसमोर माझी सुमारे दोन तासांची साक्ष झाली. या

प्रयत्नामुळेच समाजवादी नेत्यांना व या सैपाला पाठिंबा देणाऱ्या संयुक्त महाराष्ट्र समितीच्या नेत्यांना विचार करणे भाग पडून संपाचा शेवट झाला.

मी कामगार संघटनेच्या कामात ओढला गेलो व निर्माण झालेल्या प्रीमियर ऑटोमोबाईल्स एम्प्लॉईज युनियन स्थापण्यात पुढाकार घेतला.या कामामुळे कै. आंबेकरजी यांच्याशी निकट संबंध आले. १९५९ ते १९६७ या काळात संघर्षमय वातावरणातच काम करावे लागून गुंडगिरीलाही तोंड द्यावे लागले. याकाळात माझ्यावर दोन वेळा हल्ले झाले होते. या सर्व काळात जेथे काही अन्याय आहे त्यांचे निवारण करायचे व युनियनची नेहमीची पत्रके तयार करावयाची आणि आपला दृष्टीकोन निर्भीडपणे मांडता यावा यासाठी 'प्रीमियर कामगार' हे साप्ताहिक चालविले होते. लोकप्रियता मिळवावी म्हणून कामगारांतील अपप्रवृतीशी कधीही तडजोड करण्याचा प्रयत्न मी केला नाही अगर चालक-अधिकाऱ्यांची खुषामत करण्याचाही कधीच प्रयत्न केला नाही. यामुळे मला सवंग लोकप्रियता लाभली नाही. अगर चालक-अधिकाऱ्यांची सहानुभुती, आपुलकी मला कधीच लाभली नाही. पण मला त्याबद्दल कधीच खंत वाटली नाही. 'प्रीमियर कामगार' पत्रिकेच्या माध्यमातून विधायक राष्ट्रीय विचारांचा प्रचार करणे यावरच मी प्रामुख्याने लक्ष केंद्रित केले होते. याशिवाय युनियनचे आर्थिक व्यवहार काटकसरीचे राहिले पाहिजेत या बाबतीत मी फारच आग्रही होतो. पण युनियनमध्ये आलेल्या नव्या कार्यकर्त्यांबरोबर काही जुन्या कार्यकर्त्यांशी मतभेद होऊन मी युनियनच्या कार्यातून बाहेर पडलो. पाठोपाठ 'प्रीमियर कामगार' पत्रिकेचे कामही बंद करावे लागले. पण पुढे काही महिन्यातच 'नागरिक मित्र' नावाचे साप्ताहिक चालविण्यासाठी जमवाजमव करून काही महिने ते पत्रक चालविले. पण पुरेशा पाठिंब्या अभावी काही महिन्यातच बंद करावे लागले. हे होईपर्यंत १९७३ संपत आले होते.

या दरम्यान घडलेल्या महत्त्वाच्या घटनांमध्ये १९६९ सालात माझे एक जुने मित्र श्री. गणपतराव कोळी जे पूर्वी समाजवादी पक्षात होते व १९६२ नंतर केव्हातरी काँग्रेसमध्ये आले होते, त्यानी मुंबईमध्ये इंदिरा गांधींना पाठिंबा देणाऱ्या काँग्रेस जनांचा मेळावा घेण्याची योजना केली होती. त्याना याबाबत पाठिंबा देण्याचे मान्य केलेल्या काही काँग्रेस नेत्यांनी माघार घेतल्यामुळे श्री. कोळी [illegible] माझ्याशी संपर्क साधला व सहकाऱ्यांची अपेक्षा केली. त्याप्रमाणे मी काही [illegible] मेळाव्याच्या आयोजनात सहकार्य केले. तो मेळावा परेल येथे [illegible] दामोदर हॉलमध्ये [illegible] घेण्यात आला. त्या काळात मुंबई व महाराष्ट्र दोन्ही काँग्रेसवर [illegible] वसंतराव नाईक यांचा प्रभाव होता. त्यांच्या अनुयायांनी

हा मेळावा यशस्वी होऊ दिला नाही. पण पुढे 'काँग्रेस सोशालिस्ट फोरम'ची स्थापना होऊन पुण्यामध्ये फोरमचे मोठे संमेलन झाले. त्या संमेलनात काही मतभेद होऊन श्री. तुळशीदास जाधव, कोल्हापूरचे श्री. हरिभाऊ कडव यांच्या एका छोटचा गटाने वेगळा फोरम स्थापन केला. त्यांनी त्यामध्ये मुंबईचा प्रतिनिधी म्हणून मला घेतले. पण हा फोरम पूर्ण निरुपयोगी ठरला. त्यामुळे तुळशीदासजीनी त्यानंतर झालेल्या लोकसभा निवडणूकीत मुंबईत मनोहर कोतवाल या समाजवादी उमेदवाराचा प्रचार केला. पुढे १९७२ च्या विधानसभा निवडणुकीसाठी तिकीटाबाबत महाराष्ट्र काँग्रेसमध्ये खूप तणाव निर्माण झाला. शे-दिडशे असंतुष्ट कार्यकर्त्यांनी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या विरोधात दिल्लीकडे धाव घेतली. अशा उमेदवारांना पाठिंबा देण्यासाठी दिल्लीला गेलेल्या कार्यकर्त्यांत मी एक होतो. दिल्लीत काँग्रेस नेत्यांच्या निवासस्थानांकडे सैरावैरा धावणाऱ्या या उमेदवारांना पाहून मला ओळखणाऱ्या एका ज्येष्ठ काँग्रेस नेत्याने मला सूचना केली की, संध्याकाळी या सर्व नव्या उमेदवारांचा एक मोर्चा आयोजित करुन काँग्रेस पार्लमेंटरी बोर्डाच्या मिटींगवर मोर्चा घेवून जाणे योग्य ठरेल. त्या सूचनेप्रमाणे मी, पुण्याचे श्री. शिवाजी ढेरे व अन्य काही नेत्यांनी दिल्लीत निरनिराळ्या ठिकाणी उतरलेल्या कार्यकर्त्यांना कै. आनंदराव चव्हाण यांच्या निवासस्थानी म्हणजे २१, अशोक रोड येथे जमा केले. बंगल्याच्या हिरवळीवर जाजमे टाकून या कार्यकर्त्यांची अल्पोपहाराची व्यवस्था श्रीमती निर्मलकाकी चव्हाण यांनी केली होती. तेथूनच आम्ही मोर्चाने पार्लमेंटरी बोर्डाच्या मिटिंगवर गेलो व महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या उमेदवारांच्या निवडी विरोधी घोषणा दिल्या. या मोर्चामध्ये मीच पुढाकार घेतल्याने पत्रकारांनी मला काही प्रश्न विचारले. त्यात महाराष्ट्रात तुम्ही कोणाला नेता मानता, असा एक प्रश्न मला विचारण्यात आला होता. त्यावर मी मा. शंकरराव चव्हाण यांचे नाव घेतले होते. ते दुसऱ्यादिवशी तेथील वृत्तपत्रांतून प्रकाशित झाले होते. याच काळाच्या सुरुवातीस नोव्हेंबर १९६९ मध्ये विभाजित काँग्रेसपैकी श्रीमती इंदिरा गांधी यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेसचे अधिवेशन दिल्ली येथे झाले. त्यासाठी मी कार्यकर्त्यांची एक छोटीशी तुकडी घेऊन गेलो होतो. मुलत: मी श्री. मोरारजी देसाई यांच्या विचारांच्या प्रभावाखाली असलेल्या कार्यकर्त्यांतला कार्यकर्ता होतो. पण कम्युनिस्ट पक्षांतून काँग्रेसमध्ये आलेले श्री. बाबूराव भापसे यांच्याशी झालेल्या मैत्रीमुळे माझ्या विचारात बदल होत गेला. त्याचप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महात्मा गांधीजींशी असलेल्या विरोधाची केवळ वरवर माहिती असल्याने डॉ. बाबासाहेबांबद्दल मला फारसा आदर नव्हता. पण श्री. बाबूराव भापसे यांनीच खैरमोडे लिखित आंबेडकर

चरित्रांचे खंड मला वाचावयास दिले. त्यामुळे डॉक्टर आंबेडकरांच्याबद्दल काहीशी अनादराची भावना होती ती निघून जाऊन त्यांच्याबद्दल आदर निर्माण झाला.

कुर्ला नागरिक सहकारी बँकेचे अध्यक्षपद

प्रश्न– बँक व्यवसायात व्यवस्थापनाच्या कार्यात तुम्ही का पडलात? राजकीय वातावरणाला तुम्ही कंटाळला का?

श्री. नरेन्द्र पाटील– १९६९ ते १९७५ या काळात काँग्रेस कार्यात मी क्रियाशील झालो होतो. पण १९७५ अखेर कुर्ला नागरिक सहकारी बँकेची जबाबदारी माझ्यावर आल्याने मी पुन्हा काँग्रेसच्या प्रत्यक्ष कार्यापासून थोडासा अलिप्त झालो. ही जबाबदारी माझ्याकडे आली आणि या कालावधीत बँकेचे खेळते भांडवल फक्त ८८ लाखावर आले होते. आज १९८५ अखेर हे १२ कोटीपेक्षा अधिक आहे. मी माझ्या प्रीमियरमधील कामाचा वेळ सोडून उरलेला शक्यतो सर्ववेळ बँकेच्या कार्यासाठी देऊ लागलो. प्रीमियरमधील कामगार संघटना प्रीमियरमधील अंतर्गत बँक, कुर्ला कामगार को-ऑपरेटिव्ह्ह हौसिंग सोसायटी, प्रीमियर कामगार पत्रिका या सर्व माध्यमातून माझा परिचय स्थानिक लोकांना झाला होता. त्याचप्रमाणे प्रत्यक्ष बँकेच्या कामात होत असलेले परिश्रम पाहून बँकेवरचा नागरिकांचा विश्वास वाढला, असे म्हटले तर त्यात गैर ठरणार नाही. पुढे बँकेच्या कामाचा व्याप वाढल्याने १९७८ सालात वेळोवेळी मी दीर्घमुदतीच्या पगारी बिनपगारी रजा घेऊन वेळ दिला. या सर्व कामामुळे माझ्यावर आणखी काही संस्थांच्या कामांची जबाबदारी आली. सहकारी बँकेच्यासमोर असलेल्या अडीअडचणी सोडविण्यासाठी नागरिक सहकारी बँकांची एक असोशिएशन स्थापन करण्याचा विचार सुरू झाला होता. त्यात मीही पुढाकार घेऊ लागलो. आणि ती असोशिएशन स्थापन झाल्यापासून म्हणजेच गेली सहा वर्षे मी त्या असोशिऐशनच्या कार्यकारिणीचा प्रमुख सभासद आहे.

दादर येथील बेसिक ऐज्युकेशन सोसायटीतर्फे चालविल्या जाणाऱ्या सावित्रीबाई फुले मुलींच्या रात्र शाळेचे एक छोटे काम चिटणीस या नात्याने मी गेली ५–६ वर्षे पाहत आहे. कुर्ला येथील नागरिकांना डोळे तपासणे व मोतीबिंदूसारख्या ऑपरेशनसाठी घाटकोपर व सायन येथे जावे लागत होते. ती गैरसोय दूर करून अल्प मोबदल्यात ही सोय कुर्ल्यातच करण्याचा विचार मी व माझे ज्येष्ठ सहकारी श्री. मुरारजी सतरा यांनी केला. हा विचार मनात येण्याचे कारण १९७५ साली बँकेच्या रौप्यमहोत्सव प्रसंगी आम्ही बँकेच्या सर्व माजी

संचालकांचा गौरव करण्याचे ठरवून त्यांना आमंत्रित केले होते. जे हयात नाहीत त्यांच्या कुटुंबियांना आमंत्रित केले. यापैकी जे हयात नव्हते व ज्यांचे कोणी आले नव्हते त्यांच्या घरी त्यांचे सन्मान चिन्ह, शाल, श्रीफळ व चंदन हार पोचविण्यात आला. अशापैकी कै. राम अगरवाल यांच्या पत्नी श्रीमती शांता अगरवाल यांनी मला भेटण्यास बोलाविले. त्यांनी कै. राम अगरवाल यांच्या नावे एखादे छोटे स्मारक कुर्ल्यामधे करण्यासाठी ७५,००० रुपये देणगी देण्याचा मनोदय माझ्याजवळ व्यक्त केला. त्यांनी माझ्यावर एवढा विश्वास व जबाबदारी टाकण्याचा निर्णय कसा घेतला, ते मी विचारले. त्यावर त्या उत्तरल्या तुम्हाला बँकेकडून मिळणाऱ्या मानधनाचा उपयोग तुम्ही सार्वजनिक कामासाठी करीत आहात असे मला समजले. शिवाय बँकेच्या कामातही आपण तळमळीने लक्ष घालता असेही समजले. कै. अगरवाल यांचे सन्मान चिन्ह घेऊन आलेल्या बँकेच्या कर्मचाऱ्याने आपली माहिती मला दिली, असे त्यांनी सांगितले. ही माहिती माझे ज्येष्ठ सहकारी श्री मुरारजीभाई यांना मी दिली. यानंतर एक-दोन दिवसातच कुर्ल्याचे दानशूर दूध व्यापारी श्री. रामजी आम्हा दोघांना रस्त्यातच भेटले. त्याचा बराचसा पैसा सार्वजनिक कामाच्या नावाखाली गैर लोकांकडून उकळला जात होता. त्याना आम्ही विनंती केली की असा पैसा खर्च करण्याऐवजी त्यांनी एखाद्या भरीव कामाला भरीव देणगी द्यावी. ते ऐकून श्री. रामजी म्हणाले की, तुम्ही दोघे जबाबदारी घेत असाल तर मी काही करू इच्छितो. रस्त्यातूनच त्यानी आम्हाला जवळच नव्याने उभ्या राहिलेल्या इमारतीत नेले व तेथील अंदाजे दीड लाख किंमतीचे दोन ब्लॉक्स आम्हाला देऊ केले. त्यांनी आम्हाला तेथे आयुर्वेदिक दवाखाना सुरू करण्याची सूचना केली. पण आम्ही श्रीमती अगरवाल यांची देणगी व कुर्ल्यांत डोळ्यावर उपाय योजनेची कमतरता त्यांच्या नजरेस आणून डोळ्यांचे एक छोटेसे हॉस्पिटल सुरु करण्यास त्यांची मान्यता मिळविली. त्याचबरोबर श्रीमती अगरवाल यांना भेटून त्यांनी आपली देणगी रक्कम वाढवावी अशी विनंती केली. त्यांनी आपली रक्कम एक लाख रुपये केली. अशा तऱ्हेने कुर्ल्यांमध्ये 'दि कुर्ला मेडीकल वेलफेअर सेंटर' १९७८ साली सुरू झाले. आज या केंद्रामध्ये दररोज ५० ते ७५ नेत्ररोगी उपचार घेत आहेत. व दर आठवड्याला किमान ८ ते १० ऑपरेशन्स होत असतात. याशिवाय निरनिराळ्या तज्ञ डॉक्टरांचा सल्ला इतर रोगांसाठी उपलब्ध करण्यात आला आहे. पॅथॉलॉजिकल लॅबोरेटरीची सोयही करण्यात आली आहे.

मी माझ्या मानधनाचा उपयोग सार्वजनिक कार्यासाठी करायचे असे ठरविल्यावरच त्यातून या कार्याचे बीजारोपण झाले याचे मला नेहमीच समाधान वाटत

आले आहे. माझ्या या सर्व कामामुळे मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या कार्यकारिणीवर कुर्ला विभागातून जाण्याची संधी मिळाली. व पदाधिकाऱ्यांमध्ये माझा समावेश झाला. या सर्व व्यापात कुर्ला नागरिक सहकारी बँकेचे नाव हे अग्रक्रमाचे राहिले व त्याला पुरे पडण्याच्या हेतूनेच प्रामुख्याने मी प्रीमियरमधील नोकरीचा राजीनामा १९७९ मध्ये दिला. बँकेचे काम हे मुख्य कारण असले तरी माझ्या दोन बंधूंच्या सहकार्यामुळे माझ्या ज्येष्ठ मुलाने मला माझ्या आवडीच्या कामात लक्ष घालता यावे म्हणून अधिक उच्च शिक्षणाकडे जाण्याऐवजी माझ्या बंधूच्या बरोबर व्यवसायात जाण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे माझी बरीच मोठी जबाबदारी कमी झाल्याने मी नोकरी सोडण्याचा निर्णय घेऊ शकलो. नोकरी सोडण्यास प्रवृत्त होण्यासाठी आणखी एक छोटेसे कारण म्हणजे ज्यांना उपजीविकेसाठी व आवश्यक गरजा भागविण्यासाठी शेती अगर अन्य उत्पन्नांचे साधन असणाऱ्यांनी नोकऱ्या अडवून ठेवू नयेत असे मी नेहमीच मानत आलो होतो. १९७८ साली माझ्या असे लक्षात आले की आपल्या कुटुंबियांचा जो संयुक्त व्यवसाय चालू आहे त्या आधारे आपण नोकरी सोडून वाटचाल करू शकतो आणि म्हणूनच मी माझ्या मनातील नोकऱ्यात जागा न अडविण्याच्या विचाराला कृतीत आणू शकलो. अर्थात याचे श्रेय माझे बंधू व ज्येष्ठ चिरंजीव यांना प्रामुख्याने व राहणीमान न उंचावता राहण्याची मानसिक तयारी दाखविणाऱ्या माझ्या पत्नी व कनिष्ठ मुलाला आहे.

सामाजिक व राजकीय नेत्यांचा आदर्श

प्रश्न– राष्ट्रीय मिल मजदूर संघाचे संस्थापक श्री. ग. दे. आंबेकर यांच्याशी तुमचा संबंध कसा आला ?

श्री. नरेन्द्र पाटील– प्रीमियरमधील इंटक संघटनेच्या पुनरबांधणीच्या कामात भाग घेतल्यानंतर पहिली तीन वर्षे आम्ही प्रामुख्याने मा. इंद्रवदन ओझा व मा. नानासाहेब कुंटे यांचे अध्यक्षीय मार्गदर्शनाखाली काम करीत होतो. मा. नानासाहेबांची वागण्याबोलण्याची जी पद्धत होती ती कार्यकर्त्यांना मानवण्यासारखी नव्हती. तरीपण त्यातल्यात्यात ज्या कांही चार दोन कार्यकर्त्यांना त्यांच्याकडे स्थान होते त्यात मी होतो. पण आम्हाला या परिस्थितीला फार काळ तोंड द्यावे लागले नाही. मा. नानासाहेब कुंटे हौसिंग बोर्डाचे चेअरमन झाले. आम्ही मा. आंबेकरजीना भेटलो. त्यांना अध्यक्ष होण्याचा आग्रह धरला. १९५९ पासून आम्ही ज्या चिकाटीने परिस्थितीशी झगडलो होतो त्याचा विचार करून त्यांनी अध्यक्षपद स्वीकारले. कारण प्रीमियरमधले माझे काम

काही केवळ कामगारांना चार पैसे मिळवून देण्यासाठी आहे असे मी मानत नव्हतो. कामगारवर्गाचे प्रश्न एकंदर राष्ट्रीय परिस्थितीशी सांधा ठेवूनच विचारात घेतले पाहिजेत, असा माझा आग्रह होता. 'प्रीमियर कामगार' या माझ्या पत्रिकेतून व विविध पत्रकांतून मी ते विचार आग्रहाने मांडत होतो त्यांची माहिती आंबेकरजींना होती असे त्यांच्या निकट आल्यानंतर त्यांनी दिलेल्या उत्तेजनाने व आपुलकीने लक्षांत आले. त्यांनी राष्ट्रीय मिल मजदूर संघाच्या 'कामगार' या मुखपत्रातूनही लिहिण्याची सुचना मला केली होती.

प्रश्न– श्री. इंद्रवदन ओझा यांच्या व्यक्तिमत्त्वाचा तुमच्यावर कसकसा प्रभाव पडला ?

श्री. नरेंद्र पाटील– श्री. इंद्रवदन ओझा हे ज्येष्ठ व थोर गांधीवादी कार्यकर्ते ! अनेक थोर व्यक्तींबरोबर त्यांनी शिरोडा सत्याग्रहात भाग घेतला होता व रत्नागिरीच्या तुरुंगातही होते. त्यांचे वास्तव्य विलेपार्ल्याला व कार्य मुंबईच्या साऱ्या उपनगरात होते. सायन–माहीमपासून बोरीवली–मुलंड पर्यंतच्या उपनगर जिल्हा काँग्रेसचे ते अनेक वर्षे अध्यक्ष होते. पण त्यांची कर्मभूमी कुर्ला होती. कुर्ला नागरिक सहकारी बँक व कुर्ला कामगार को. ऑ. हौसिंग सोसायटी ही त्यांच्या सक्रीय मार्गदर्शनाखालीच उभी राहिली. ते १९५२ ते १९५७ कुर्ल्याचे आमदार होते. त्या काळात त्यांचा निकट संबंध आला व त्यांच्याहीकडून काही आदर्श मिळाले. पुढे १९५९ मध्ये प्रीमियरमधील इंटक संघटनेची पुनर्बांधणी करण्याचा प्रयत्न झाला. त्या काळातही ते सक्रीय मार्गदर्शन करीत होते व काही काळ अध्यक्षही होते. पण पुढे त्यांचा या भागाशी संपर्क तुटत गेला पण १९५८ साली त्यांनी मला निरोप देवून बोलावून घेतले. त्यांच्या 'रचनात्मक कार्य समिती' तर्फे सांगली जिल्ह्यात एक अंबर चरख्याचे सूत उत्पादन केंद्र चालविले जात होते. त्याचे काम बंद पडण्याच्या परिस्थितीत आले होते. त्यामुळे मी त्या भागातला म्हणून कोणीतरी माझी आठवण त्यांना करून दिली म्हणून त्यांनी मला बोलावून त्याबाबत सांगितले. मी त्या ठिकाणी जाऊन आलो. तेथील स्थानिक कार्यकर्त्यांचा निरुत्साह व एकंदर परिस्थिती पाहून ते केंद्र चालणे कठीण असल्याचे मी त्यांना सांगितले. पण त्यांनी तसे होऊ देवू नका मी तुमच्याबरोबर येतो, आपण तेथील कार्यकर्त्यांना भेटू, असे ते म्हणाले. त्यांचे वय त्यावेळी ७८ असावे. त्यांची प्रकृती व त्या गावी जाण्यासाठी होणारा त्रास हे पाहाता त्यांना नेणे योग्य नव्हते. पण ते ऐकेनात. शेवटी त्यांना घेऊन गेलो. स्थानिक कार्यकर्त्यांची नऊ लोकांची समिती होती. पूर्व सूचना देवूनही फक्त तिघे हजर होते. त्यापैकीही दोघांमध्ये थोडी चर्चा होताच काही

काम आहे म्हणून निघून गेले. प्रश्न अनेक होते. त्यांची चर्चा स्थला अभावी येथे शक्य नाही. त्या केंद्रावर काम करणारी एक सेविका व मा. ओझा या दोघांच्या चेहऱ्यांवरचे नैराश्य पाहून मन हेलावले. ती सेविका म्हणाली, 'केंद्र बंद झाले तर माझा प्रश्न आहेच. पण माझे यजमान मिळवते तरी आहेत. पण जे काही १२–१३ चरखे चालू आहेत त्यावर काम करणाऱ्या महिलांची चूल या केंद्रावरच आहे. तेव्हा काहीही करून केंद्र चालू ठेवा. किमान ३० चरखे चालल्याशिवाय केंद्राच्या खर्चाची तोंडमिळवणी अशक्य होती, मी एक तासभर फिरून माहिती घेतली. त्या माहितीच्या आधारे मला एक कल्पना सुचली. ज्या महिलांना चरखा केंद्राची जरूर होती त्यांनी गावात प्रचार करून अगदी खास गरजू महिलांना शोधून त्यांना चरखा चालवयाला शिकवायचे व आणखी किमान १५ चरखे चालतील असा प्रयत्न करायचा. त्या महिलांनी ते मान्य केले व महिनाभरातच चरख्यांची संख्या वाढू लागली. लौकरच तीस चरखे चालू लागले. महिन्यातून एकदा तिकडे जाऊन त्या केंद्राला मार्गस्थ करण्याचे व त्याचबरोबर मा. ओझाजींच्या या समितीमार्फत खादी व ग्रामोद्योगांच्या वस्तूंच्या विक्रीचे जे काम चालायचे त्यासाठी गांधी जयंतीच्या सुमारास दोन महिने खादी ग्रामोद्योगी वस्तूंचे विक्री स्टॉल्स कुर्ल्याच्या परिसरात लावायचा उपक्रमही मी सुमारे चार वर्षे केला. मा. ओझाजींच्या मार्गदर्शनाखाली काँग्रेस कार्य, कामगार संघटना कार्य, सहकारी घरबांधणी, सहकारी बँकींग अशा अनेक क्षेत्रात काम करण्याची संधी मला मिळाली. त्यांच्या आचार–विचारांचा काही प्रभाव माझ्यावर राहिला आहे.

श्री. रत्नाप्पाण्णा कुंभार यांचे कडून मोलाची भेट

प्रश्न– तुमच्यातल्या निस्पृहतेचे तुमचे नेमके गुरू कोण ?

श्री. नरेंद्र पाटील– कोल्हापूर संस्थान प्रजापरिषदेची स्थापना १९३९ च्या सुमारास जयसिंगपुरातच झाली. त्या काळातील भाई माधवराव बागल व मा. रत्नाप्पा कुंभार यांचा तालुक्यातील दौऱ्याच्या वेळी भोजनाचा कार्यक्रम समाजवादी कार्यकर्ते डॉ. आण्णा नरदे यांच्या घरी होता. डॉ. आण्णा नरदे यांचे ज्येष्ठ बंधू श्री. नागेंद्रआण्णा नरदे हे प्रजापरिषदेच्या लढ्यातील एक प्रमुख. पण या दोन बंधूच्या हालचाली त्यांच्या घरातील ज्येष्ठाना मानवत नसत. त्यांचे घराणे श्रीमंत व जमिनदार मानल्या जाणाऱ्या वर्गातले. प्रजा-परिषदेच्या चळवळीत भाग घेणाऱ्या लोकांच्या जमिनी व मालमत्ता जप्त करण्या- वार्ता चर्चेत होत्या. त्यामुळे श्री. नागेंद्रआण्णांच्या घरच्या मंडळींनी प्रजापरिषदेच्या यांच्या भोजनाच्या व्यवस्थेबाबत नाराजी व्यक्त करता ते-

आमच्या वडिलांकडे आले. कारण माझे वडीलही त्या चळवळीशी संबंधित होते व त्या काळी त्यांच्याकडे कार्यकर्ते सल्ला व मार्गदर्शनासाठी येत असत. श्री. नागेंद्र-आण्णांनी आपली अडचण माझ्या वडीलांच्या कानी घातली. वडीलही थोडे चिंतेत पडले. पण त्यानी माझ्या आईला बाहेर बोलावले व श्री. नागेंद्रअण्णांची अडचण सांगून आपल्या घरी जेवणाची व्यवस्था करू या काय ? असा आईला प्रश्न केला. आईने तत्काळ मान्यता दिली. हे पाहून बाजूला डेक्स जवळ बसलेले वडिलांचे मुनीम उठले व त्यानी सांगितले की, 'रावसाहेब आपण हे काय करता आहात ? आपली सनद रद्द होईल,' त्यावर माझ्या आईने उद्‌गार काढले की, 'सगळे लोक काय वकिली करूनच पोट भरतात काय ? आम्ही मोलमजूरी करून पोट भरू शकणार नाही काय ?' आईच्या निश्चयी उद्‌गारामुळे जेवणाची व्यवस्था आमच्या घरी झाली. भाई माधवराव बागल, मा. रत्नाप्पाण्णा कुंभारांसह सर्व कार्यकर्त्यांचे भोजन आमच्या घरी झाले. त्यावेळी जवळून मा. रत्नाप्पाण्णांना मी पाहिले. या घटनेच्यावेळी आमच्या आईने दाखविलेल्या धैर्याची माहिती व महत्व आम्हाला तीन-साडेतीन वर्षापूर्वी तिच्या निधनानंतर मा. नागेंद्रआण्णा दरदे यांच्या तोंडूनच ऐकायला मिळाली. वरील घटनेपाठोपाठ आई प्रत्यक्ष शेतीच्या कामात प्रवेश करती झाली.

भूमिगत असतांना मा. रत्नाप्पाण्णा मुंबईच्या त्याकाळच्या राष्ट्रसेवादलाचे प्रमुख डॉ. गजानन मिरजे यांच्याकडे ताडदेव वसतीगृहात येत असत व इतर भूमिगत कार्यकर्तेही येत असत. मी तेथेच त्याकाळात वर्षभर राहिलो होतो.

पुढे मा. अण्णांना सरंजामशाहीला विरोध करून कोल्हापुरात कार्य करणे कसे कठीण गेले याची माहिती मला जवळून मिळत असे. त्यांची साधी रहाणी, उच्च विचारसरणी, आपल्या संस्थांचा कारभार काटकसरीने रहावा, अनुत्पादक कामात गुंतवणूक करू नये, सत्तेसाठी लाचारी स्वीकारू नये तसेच नेता, कार्यकर्ता सत्तेसाठी लाचार झाला तर समाजाला तेच शिक्षण मिळेल म्हणून कार्यकर्त्यांने स्वसामर्थ्यावर स्वतःचे स्थान निर्माण करावे हे विचार व त्याप्रमाणे त्यांची कृती यामुळे मला नेहमीच त्यांचे आकर्षण राहिले आणि मी त्यांच्या जीवनाकडे, कार्याकडे चिकित्सक दृष्टीने पहात राहीलो. जेवढे आत्मसात करता येईल तेवढे करीत राहीलो.

एखाद्या नेत्याच्या निवडणुकीत अगर त्याच्या गौरवार्थ कांही काम करणे म्हणजे आपण त्या नेत्यावर काही उपकार करतो अशी भावना ब-याच कार्यकर्त्यांत असते, व त्या नेत्याने आपल्यासाठी कांही केले पाहिजे असे त्याला वाटते.

पण मला तसे कधी वाटले नाही. कारण जी थोर मंडळी व्यापक असे समाजकार्य करतात त्या कार्यासाठी केलेला सहभाग म्हणजे समाजकार्यच आहे व आपण केलेले ते कार्य समाजासाठी असते त्या नेत्यासाठी नसते, असे निस्पृह कार्यकर्त्यांनी मानले पाहिजे. आपल्याला निस्पृह नेते हवे असतील तर तरुणांनी निस्पृहपणे काम करून निस्पृह 'नेत्यामागे' खंबीरपणे उभे राहीले पाहीजे. मा. शंकरराव चव्हाण यांच्याकडेही मी १९७२ पासून त्याच दृष्टीने पहात आलो. पण १९८५ मध्ये फक्त दोन तीन मिनिटांची त्यांची भेट झाली मी त्यांच्या विचारांचा, निस्पृहपणाचा अनुयायी आहे व तसा वागत आलो आहे.

डॉ. धनंजय कीर आणि सावित्रीबाई फुले रात्रशाळा

प्रश्न– सावित्रीबाई फुले रात्रशाळेची जबाबदारी तुम्ही का स्विकारली ?

श्री. नरेन्द्र पाटील– डॉ. धनंजय कीर याना मी प्रथम पाहिले व ऐकले ते म्हणजे त्यांच्या ग्रंथाचे प्रकाशन व त्यांचा गौरव करण्यासाठी परळच्या सेंट झेवियर मैदानावर झालेल्या समारंभात ! त्या समारंभात कै. ना. यशवंतराव चव्हाण, माधवरावजी बागल, आचार्य अत्रे यांची भाषणे झाली. भाई माधवरावजी बागल यांनी तर त्या प्रसंगी डॉ. कीर यांना गुडघे टेकून नमस्कार केला. त्या प्रसंगाने डॉ. कीर यांच्याबद्दल जी आदराची भावना निर्माण झाली ती कायमचीच. मध्यंतरी कांही वर्षे गेली पण त्याना भेटण्याचा, बोलण्याचा, पहाण्याचा योग आला नाही. पण पुढे सत्यशोधक कार्यकर्त्यांना एकत्रित करून त्या चळवळीचे पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न कै. ना. बाळासाहेब देसाईंच्या प्रोत्साहनाने झाल्या सारखा दिसला त्यांच्या निवासस्थानीच त्यासाठी बैठका होत. अशा एक दोन बैठकाना डॉ. कीरही हजर होते.

कै. कर्मवीर भाऊराव पाटील हे माझ्या वडिलांचे थोरले बंधू ! त्यांच्यामुळे व कै. राजर्षी शाहुछत्रपतींच्या कोल्हापूर संस्थानात त्यांचे जनक वडील कै. जयसिंगराव घाटगे यांच्या स्मरणार्थ राजर्षिनी वसविलेल्या जयसिंगपुरातच आमचे वडील स्थाईक झाल्याने सत्यशोधक चळवळीचा प्रभाव आमच्या सर्व घरावर होता. त्यामुळे सत्यशोधक चळवळीच्या पुनरुज्जीवनाच्या प्रयत्नाकडे मी आकर्षिला गेलो. शिवाय 'शिवनेर'चे संपादक श्री. विश्वनाथराव वाबळे हे माझे ज्येष्ठ मित्र ! कामगार चळवळीतल्या अपप्रवृत्तीविरुद्धच्या माझ्या लिखाणाला त्यानी विस्तृत प्रसिद्धी दिली व सत्यशोधक चळवळीच्या विचारांचा त्यांचा आमचा दुवा जमल्याने त्यांची आमची मैत्री घनिष्ठ झाली.

एकदा डॉ. धनंजयराव कीर हे आमच्या कामगार नगरमधे एका मुलाला कडेवर घेऊन रस्त्यावर दिसले. मी त्याना नमस्कार केला. ते मला फक्त चेहऱ्याने ओळखत असावेत, नांवही माहीत असावे असे मला वाटले. मी त्यांना विचारले, 'आपण इकडे कसे?' त्यांनी त्यांची मुलगी कामगार नगरमध्ये काही दिवसांकरीता रहात असल्याचे सांगितले. मी त्यांना माझ्या घरी नेले. घरी दिवाणखान्यात कर्मवीर भाऊराव पाटील यांचा सोवियत रशियाचे अध्यक्ष व पंतप्रधानांबरोबरचा फोटो पाहून त्यांनी विचारले की, 'तुम्ही त्यांच्या शिक्षण संस्थेचे विद्यार्थी आहात काय?' मी त्यांना कर्मवीर भाऊराव पाटील माझे काका असल्याचे सांगताच त्यांना आश्चर्य वाटले. कारण ना. बाळासाहेब देसाई यांच्या घरी थोडासा परिचय झाला त्यावेळी ही ओळख आपण दिली नसल्याचे ते उद्गारले. मोठ्या माणसाचे नाते सांगून मोठेपणा मिरविणे योग्य नसल्याचे मी सांगताच माझे विचार ऐकून त्यांना आनंद झाला. आपण सत्यशोधक म्हणवून घेतो पण त्यासाठी तळमळीने काही करत नाही याबद्दल बोचणी असल्याचे मी बोलताच ते म्हणाले, 'अहो ना. बाळासाहेबांच्याकडे या चळवळीचे पुढारपण करण्यासाठी येणारे तरी कोठे तळमळीने काम करतात. त्यांचा उद्देश दुसराच आहे.' पुढे ते म्हणाले, 'तुम्ही असे करा; तुम्ही कोल्हापूरचे आहात. मी राजर्षि शाहु छत्रपतींचे चरित्र लिहितोय, त्यासाठी मी माहिती गोळा करतोय. त्या कामात मला थोडी मदत करा. म्हणजे तेथे जमणाऱ्या सत्यशोधक नेत्यापेक्षा तुमचे काम महत्वाचे ठरेल.' मी ते मान्य केले व काही अल्पशी मदत स्वखर्चाने करून माहिती दिली. त्या अल्पशा कामाबद्दल डॉ. कीर यांनी या ग्रंथाबाबत मनोगत लिहिताना त्यात आवर्जून माझा उल्लेख केला. माझी प्रामाणिक तळमळ पाहून त्यांनी मला त्यांच्या अध्यक्षतेखाली चाललेल्या सावित्रीबाई फुले मुलींच्या रात्र शाळेच्या कार्यकारिणीवर घेतले व पुढे त्यांच्या निधना अगोदर दोन-तीन वर्षे त्यांनी मला चिटणीस केले. आपल्या पाठीमागे ही संस्था चालली पाहिजे, ती जबाबदारी तुमची आहे; असे ते शेवटच्या काही दिवसांत मला म्हणाले. अन्य कामांच्या दडपणामुळे शाळेच्या कामाला न्याय देवू शकलो नाही म्हणून तेथून बाहेर पडणार होतो. पण त्यांच्या त्या उद्गारापुढे मला ते काम सोडता आले नाही. पण विशेष काही करता आले नाही याबद्दल संकोच वाटतो.

त्यांच्याबरोबर काम करताना त्यांच्याबरोबर कोल्हापूरला व जवळपासच्या ठिकाणांना जाण्याचा योग आला. त्यांच्या निगर्वी पण करारी स्वभावाचे जवळून दर्शन झाले. कोणाच्याही दबावाखाली दडपणाखाली, न राहाण्याची वृत्ती पाहून त्यांच्याबद्दलचा आदर वाढला. आपल्यासारख्याला लिखाण करायचे झाले तर

थोडा निवांतपणा, आजुबाजूला शांतपणा असावा लागतो पण डॉ. कीर चाळीत अडचणीच्या जागेत राहून व मुलेबाळे भोवती खेळत असलेल्या चाळीच्या लांबलचक व्हरांड्यात बसून राष्ट्रीय महत्त्वाचे लिखाण करीत असत हे पाहून अचंबा वाटायचा. कामाच्या सतत व्यापात असूनही येणाऱ्या जाणाऱ्या सामान्य कार्यकर्त्यांशी, सामान्य साहित्यिकांशीही ते थोडावेळ बोलत बसत. चहा घेऊनच परतवीत असत.

आपल्या गरजेपेक्षा अधिक कपडे, साहित्य याचा संग्रह असू नये अशा विचाराच्या माझ्या अल्पशिक्षीत आईचा विचार व आपल्या गरजेपेक्षा मोठ्या आकाराचे निवासस्थान शासनाने देऊ करूनही न घेणारे डॉ. धनंजयराव कीर यांच्यात मला बरेच साम्य दिसले. मात्र पुढे त्यांच्या चिरंजीवाचा विवाह झाल्यावर मात्र त्याना जागेची गरज पडली. पण त्यासाठी ते कोणासमोर गेले नाहीत. मात्र त्यांच्या चाळीशेजारीच शासनाच्या ताब्यात असलेल्या चाळीतील एक जागा मिळावी अशी त्यांची अपेक्षा होती. त्यासाठी त्यांच्या मित्रांनीच प्रयत्न केले. मीही माझ्या परीने प्रयत्न केले व ती मिळाली. डॉ. कीर यांनी सोपविलेल्या कामाकडे मी फारसे लक्ष देऊ शकलो नाही याचा मनाला सतत बोचणी आहे. येत्या वर्षभरात कांही भरीव काम करण्याचा विचार आहे.

सत्यशोधनाचा विचार मृत नाही

प्रश्न– सत्यशोधक चळवळीच्या पुनर्बांधणीची प्रक्रिया का थांबली ?

श्री. नरेंद्र पाटील– १९६५ ते १९७२ या दरम्यान कै. बाळासाहेब देसाई यांच्या प्रेरणेने सत्यशोधक समाजाची पुन्हा बांधणी करण्याच्या हेतूने सत्यशोधक चळवळीतील जुन्या कार्यकर्त्यांना एकत्र आणून ॲड. रामराव आदिक यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली. या समितीच्या उपाध्यक्षपदी माझे नाव घेण्यात आले होते. पण या समितीने सत्यशोधक समाजाच्या फेरबांधणीच्या दिशेने काही जिद्दीचे प्रयत्न केले नाहीत, असे माझे मत आहे. दोन तीन वर्षे काही सभा, संमेलन, परिषदा असे उपक्रम झाले. मा. नानासाहेब गोरे यांनी या प्रयत्नांची उपयुक्तता मान्य केली होती. परिषदेच्या व्यासपीठावर हातात ज्योतिरावांच्या समग्र वाङमयाचे जाडजूड पुस्तक उंचावून ते बोलले होते की, 'ज्यो[illegible]रावांचे विचार म्हणजे धगधगता अंगार आहे. हा विचार हातात घेणे म्हणजे हाते [illegible] भाजणार याची जाणीव ठेऊन काम करू शकणाऱ्या कार्यकर्त्यांचेच ते काम आ[illegible] असा हा विचार त्यांनी गेल्या शतकात मांडला आणि

आग्रही वाटचाल केली. म्हणून आज समाजाला त्यांची आठवण होत आहे.'

१९६७ पासून मतभेदामुळे मी युनियनच्या वादातून दूर झालो. आणि त्या काळातच या कामात पुढे हालचाल केली. प्रत्यक्ष सत्यशोधक समाजाच्या कामाला गती देण्याइतके तळमळीचे नेतृत्व नसल्यामुळे या कामाबद्दल तळमळ असूनही माझ्यासारख्या कार्यकर्त्याला फारसे काही करता आले नाही. पण यानिमित्त या चळवळीतले एक जुने शिक्षक कार्यकर्ते मुंबईत आले होते. त्यांना जवळपास आठ-दहा महिने कुर्ल्यात ठेवून घेऊन त्यांच्या सर्व गरजांची पुर्तता करून सत्यशोधक चळवळ व ज्योतिरावांचे विचार समजावून देण्यासाठी अभ्यासवर्ग चालविण्याचे प्रयत्न मी केले होते. आज बँकेच्या कामात त्या वर्गाच्या माध्यमातून संबंध निर्माण झालेले अगदी सामान्य कार्यकर्तेच मला उपयोगी पडत आहेत.

पुढे ॲड. रामराव आदिक ॲडव्होकेट जनरल झाले, मंत्री झाले व सत्यशोधक समाजाचे फेरबांधणीचे हाती घेतलेले काम त्यांनी सोडून दिले. सत्यशोधक समाजाच्या फेरबांधणीच्या या प्रयत्नात श्री. विश्वनाथराव वाबळे हे अग्रभागी होते. जर ॲड. रामराव आदिक यांनी चिकाटी थोडी अधिक काळ दाखविली असती तर कदाचित या प्रेरणेतून काही अल्प तरी निष्पन्न होऊ शकले असते.

याच काळात श्री. विश्वनाथराव वाबळे यांनी 'महाराष्ट्र महामंडळ' या नावाची संस्था ॲड. रामराव आदिक यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केली होती. या मंडळाच्या कार्यकारी मंडळावर श्री. मुकुंदराव पाटील, श्री. भाऊसाहेब नेवाळकर, मुंबई ब्राह्मण सेवा संघाचे चिटणीस श्री. सप्रे, श्री. जयसिंगराव भोर इत्यादी मंडळी होती. मीही त्या कार्यकारिणीचा सभासद होतो. ॲड रामराव आदिक यांच्या लालबाग येथील निवासस्थानात या समितीच्या सात-आठ तरी बैठका झाल्या. शिवनेरी किल्ल्याच्या परिसरात उच्चदर्जाची सैनिकी शिक्षण संस्था काढणे हा या मंडळाचा मुख्य उद्देश होता. या हेतूने मेजर जनरल थोरात यांच्याशी काही पत्रव्यवहारही झाला होता. या कामाच्या हेतूने आम्ही जनरल थोरात यांच्यासह 'शिवनेरी'च्या परिसराची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी गेलो होतो. नागरिकांना पूर्वसूचना नसताही ऐनवेळी झालेल्या जुन्नर येथील सभेला प्रचंड गर्दी झाली होती. त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे कोरीयन युद्धातील कामामुळे जनरल थोरात यांचे नाव त्यावेळी गाजत होते. पण तेही काम अपुरेच राहिले. रचनात्मक कार्याला सातत्य नसेल तर ते कार्य होऊच शकत नाही. सत्यशोधक विचार मृत झाला असे मला वाटत नाही. प्रयत्न अपुरे पडतात हे मात्र खरे आहे.

* * *


REFBK-0025214

। आव्हान आणि आवाहन । नरेन्द्र पाटील । संप

। नरेन्द्र पाटील । आव्हान आणि आवाहन ।

श्री. नरेन्द्र पाटील यांनी स्वातंत्र्यानंतरच्या काळात वेळोवेळी लिहिलेल्या लेखांचा हा संग्रह आहे. नरेन्द्र पाटील जसे आहेत तसेच त्यांचे लेख आहेत. त्यांचा पारदर्शक प्रामाणिकपणा आणि सामाजिक हिताची तळमळ या लेखांत आरपार उतरली आहे. त्यांनी बिघडत चाललेले राजकारण आणि समाजकारण सुधारावे यासाठी रहावत नसल्याने लेखणी चालविली आहे.

त्या लेखांचा संग्रह आता योग्यवेळी प्रसिद्ध होत आहे. कारण नरेन्द्र पाटील यांनी इषारा दिलेले दोष आता भयानक स्वरूप धारण करून सामान्य माणसाला भरडत आहेत. अर्थातच हे लेख वाचकांच्या मनाला सरळ भिडतील.